
म. ग्रं. सं ठाणे
विषय
सं. क्र. 869

# परशु… क्षेत्र

…पुर




REFBK-0025068

…डबोले

संभ्र भूप

८८१
२५०६८
३१०७८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

12 OCT 1986

30 NOV 1986

16 JAN 1991

(क्र. मा. पद्दा)

५०००—३—८४

# आद्य श्रीपरशुरामक्षेत्र निर्मळ सुरपूर

निर्मळ-शूर्पारक (सोपारे)

## धर्मक्षेत्र, तीर्थक्षेत्र

विश्वाच्या इतिहासात अखड ६६०० वर्षे धर्मक्षेत्र, तीर्थक्षेत्र, व्यापार-क्षेत्र, राजधानी, भारताचे प्रवेशद्वार म्हणून अखंड गाजत राहिलेल्या, भगवान परशुराम निर्मित, अतिप्राचीन नगरीची यशोगाथा ऐतिहासिक पुराव्याने सागणारा पुण्यपावन माहात्म्य ग्रथ


लेखक

विवेकानंद गोडबोले

बी ए टी डी

('सुभेकल्याण' कर्ते)



REFBK-0025068



इतिहास संशोधन मंडळ, कल्याण.

# अनुक्रमणिका

१ परिचय

२ प्रास्ताविक

| | | |
|---|---|---|
| (१) | देवनगरी-सुरपूर-शूर्पारक | १ |
| (२) | ऐतिहासिक संदर्भ-विशेष | ११ |
| (३) | श्री निर्मळेश्वर-विमलेश्वर | २५ |
| (४) | श्री निर्मळ विमलक्षेत्र निर्मिती—कथा | ३४ |
| (५) | श्री चक्रेश्वर महादेव मंदिर व चक्रतीर्थ | ४२ |
| (६) | श्री तुंगारेश्वर महादेव मंदिर | ५८ |
| (७) | श्री सांब सिद्धेश्वर मंदिर | ६४ |
| (८) | श्री सुरेश्वर मंदिर | ६५ |
| (९) | श्री रेणुकामाता मंदिर | ६७ |
| (१०) | श्री देवी सरस्वती मंदिर | ६९ |
| (११) | निर्मळ-शूर्पारक परिसरातील मंदिरें | ७४ |
| (१२) | सुरपूर परिसरातील पर्वत राजी वगैरे | ७६ |
| (१३) | श्री निर्मळ परिसरांतील पावन तीर्थ-तलाव-कुंडें | ८५ |
| (१४) | संदर्भ ग्रंथ | १०६ |


---

प्रकाशक विवेकानंद गोडबोले, इतिहास संशोधन मंडळ, मॉडर्न व्हीं स्कूल, टिळक चौक, कल्याण

© विवेकानंद गोडबोले

मुद्रक ' म. बा. जोशी, ज्ञानविलास प्रेस, २७ बुधवार पुणे २

किंमत १२ रुपये.



माझी आई

कै सौ गगाबाई गोविंद गोडबोले

हिच्या पूज्य स्मृतीस सादर समर्पण

卐 卐 卐

ग्रंथालय ठाणे
दा. क्र.

# परिचय

श्रीब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली व श्रीविष्णूने तिचे पालनपोषण, रक्षण करून विश्व व्यवस्थित नांदावे म्हणून दशावतार धारण केले. भगवान श्री परशुरामांची सहाव्या अवतारात गणना होते. तसेच संपूर्ण मानवरूप असलेला हा पहिलाच अवतार आहे

श्रीपरशुरामांचा काळ हा इतका प्राचीन आहे की पुराणात सुद्धा फारच बेताची माहिती उपलब्ध आहे परशुराम हा मातृ–पितृभक्त होता त्याला तीने भाऊ होते परशुराम हा अत्यंत आज्ञाधारक होता आपल्या पित्याचा वध करणाऱ्या व जनतेला त्राही भगवान करून सोडणाऱ्या उन्मत्त बलात्कारी क्षत्रियांचा बहुजनरक्षणासाठी त्याने एकवीस वेळा पराभव केला. त्यानें त्या वेळची पृथ्वी निःक्षत्रिय केली, अशी नोंद पुराणात आहे परंतु त्या वेळी खरोखर चातुर्वर्ण्य समाज–व्यवस्था होती का ? हाच विवाद्य प्रश्न आहे

श्रीपरशुरामाने जिंकलेली सारी पृथ्वी कश्यपांना दान करून टाकली व ‘ दान केलेल्या पृथ्वीत राहणार नाही ’ अशी प्रतिज्ञा करून तो महेंद्र पर्वतावर जाऊन तपश्चर्या करू लागला. परशुराम अत्यंत थोर शिवभक्त होता. भगवान शंकराने त्याच्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन, ‘ परित्राणाय साधूनाम् ’ आपला परशु त्याला भेट दिला होता म्हणून त्याना परशुराम असे नाव होते तसेच ‘परित्राणाय तु साधुनाम् ’ हे त्यांचे श्रीशिवआज्ञापित कार्य होते.

परशुराम तपश्चर्या करीत असता खवळलेल्या सागराने मर्यादा सोडली आणि ऋषिमुनी, बहुजन ह्यानी आर्तपणे परशुरामांची रक्षणासाठी करुणा भाकली. त्यांचे संकट निवारण्यासाठी परशुरामानी तत्काळ धनुष्याला बाण लावला आणि आपल्या शस्त्र व मंत्रसामर्थ्याने, पुढे पुढे सरकू लागलेल्या सागराला शूर्पारक बंदरापर्यंत हटविले हेच ते हल्लीचे वसईजवळचे सोपारा बंदर होय

ह्या परशुरामनिर्मित नवभूमीला नवकोंकण असे नाव पडले ही भूमी लागवडीस आणून नववसाहत निर्माण करण्याच्या पवित्र तपश्चर्येला सुरुवात केली. सज्जनांचे संकटनिवारण हेच त्यांचे कार्य, हाच त्याच्या ज्ञानाचा उपयोग. सामर्थ्यशाली असूनही संयमी, वैराग्य असूनही औदार्य, इत्यादी अलौकिक गुणानी त्यांची कीर्ती दशदिशात दुमदुमली ही भूमी सुजलाम् सुफलाम् करताच त्यानी आपले शस्त्र खाली ठेवले

श्रीपरशुरामाचे सामर्थ्य अलौकिक, वृत्ति निःस्वार्थी, राज्यलोभ नसलेली, मन कष्टाला, संकटाला सदैव तोंड देणारे, कडकडीत वैराग्य, कल्पनातीत औदार्य, कमालीचा सयम, असे हे अतिमानवी गुण त्यांचेजवळ होते म्हणूनच त्यांना परमेश्वराचा पहिला मानवी अवतार मानतात.

आपल्या असामान्य ज्ञानाचा श्रीपरशुरामानी लोककल्याणाकरिता उपयोग केला तसेच आपली अलौकिक बुद्धी व शक्ती सत्कार्यार्थ उपयोगांत आणणे हेच त्यांचे थोर कार्य, हेच श्रेष्ठत्व आणि हेच त्यांचे खरे चिरजीवित्व, म्हणूनच लोक त्यांना चिरजीव मानतात

श्रीपरशुरामनिर्मित ही नवभूमी 'सुरपूर,' ह्याचे पुढे शूर्पारक झाले परतु बौद्धकालीन शिलालेखात 'सुरपक्क' असेच आढळते सुर म्हणजे देव व पक्क म्हणजे नगर अशा अर्थाने अभिप्रेत असलेल्या प्रदेशाला सुरपुर–देवनगरी अथवा आद्यपरशु-राम क्षेत्र निर्मळ सुरपूर (शूर्पारक) ह्याच नांवाचे ह्या प्रदेशाचे माहात्म्य वर्णन करणारे हे पुस्तक ऐतिहासिक पुराव्यासहित लेखक श्री विवेकानद गोडबोले ह्यानी प्रसिद्ध केले आहे

ही देवांची नगरी म्हणजे खरोखर देवाची वसाहत असलेली पवित्र भूमी. अनेक ऋषिमुनींनी तपःसाधना करून पावन झालेली, अनेक पवित्र तीर्थे असलेली, सर्व तीर्थक्षेत्रामध्ये परममगलकारी धर्मक्षेत्र म्हणून जिची गणना होते अशी ही पुण्यनगरी आहे ह्या भूमीवरील पवित्र तीर्थक्षेत्रे, श्रीशकराची मदिरे, त्यातील श्रीपार्वतीसह असलेली पवित्र श्रीशिवलिंगे प्राचीन काळातच स्थापन झालेली आहेत शिलाहारांचे काळातील, सातवाहनाचे काळातील, निरनिराळी प्रेक्षणीय, व अतिशय सुदर व भावपूर्ण अशी शिल्पे ह्या मदिरांतून ठेवलेली आढळतात. श्रीब्रह्मदेवाची हसावर आरूढ झालेली अशी एक भव्य उदात्त मूर्ती आहे तसेच हत्तीनी आपल्या शुडांनी कमान करून वदिलेली श्रीगजलक्ष्मीची सुदर कोरीव-काम व नक्षी असलेली मूर्ती, एका प्रचड शिल्पयुक्त मदिराच्या दरवाजाची कमान, श्रीचक्रेश्वर मंदिराचे प्रांगणांत ठेवलेली आहेत त्या सर्वांचे सविस्तर वर्णन श्री विवेकानंद गोडबोले ह्यानी आपल्या ह्या पुस्तकात केलेलेच आहे

श्री निर्मल–सुरपुर ह्या प्रदेशाचे परशुरामकाळापासून ऐतिहासिक महत्त्व कसे वाढत गेले, तसेच ते बौद्ध काळात व नतरही किती भरभराटीला आले होते, एक व्यापारी बंदर म्हणून परदेशाशी व्यापार करून ह्या प्रदेशाने देशाला सुवर्णभूमी हे नामाभिधान मिळवून दिले हे श्री. विवेकानद गोडबोले ह्यानी अनेक शिलालेख, ग्रथ, पुराणे, ऐतिहासिक संशोधने ह्याचे आधारे सुसगत रीतीने सुरपूर–शूर्पारकचे महत्त्व अतिशय सुदर व ज्ञानात भर टाकणारे असे वर्णन करून सांगितले आहे

ह्या शहरात एक बुरुड राजा राज्य करीत असे. स्थानिक लोकांना ज्ञात असलेली त्याची एक लोककथा श्री गोडबोले ह्यानी मनोरंजक व लालित्यपूर्ण भाषेत मांडली असून ती तितकीच बोधप्रदही झालेली आहे श्री चक्रेश्वर मंदिर, चक्रेश्वर तलाव, बुरुड राजाचा कोट ह्या सुरपूर शहरातील स्थळांचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व व सुरपूर शहराचे सौंदर्य लेखकाने ह्या पुस्तकांत विस्तारपूर्वक वर्णन केले आहे.

निर्मळ-सुरपूर नजिकची गावे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र म्हणून समजली जातात. एकट्या गास गावात सुमारे २४ तीर्थं आहेत तेथे एक तीर्थ-तलाव एवढा मोठा आहे की संपूर्ण जिल्ह्यात तरी क्षेत्रफळाने एवढा मोठा तलाव कोठेच नाही. ह्या सर्व तीर्थांत-तलावांत निरनिराळ्या देवताच्या मूर्ती, शिल्पे, मूर्तिभंजक फिरंग्यांनी फेकून दिलेली असावीत, असा अंदाज आहे कारण काही देवांच्या मूर्ती अशा तलावांतून सापडलेल्या आहेत श्री विवेकानंद गोडबोले ह्यानी प्रत्यक्ष प्रत्येक तीर्थावर जाऊन, व पाहून परिश्रमपूर्वक संशोधन करून, फोटोग्राफ घेऊन, मगच 'चक्षुर्वैसत्यम्' वर्णन ह्या पुस्तकात केले आहे त्यामुळे वाचकाला प्रत्यक्ष स्वत तेथे गेल्याचे व अनुभूतीचे दिव्य समाधान ह्या ग्रथाच्या वाचनाने मिळेल, असा भरवसा वाटतो

संशोधनाचे कार्य किती जिकिरीचे, कष्टाचे, त्रासाचे, परिश्रमाचे व खर्चाचे असते हे लेखकाने केलेल्या प्रत्यक्ष प्रयत्नावरून दिसून येते. निर्मळ-सुरपूरच्या ह्या सर्व भागात खेड्याखेड्यातून फिरून लेखकाने अनेक लोकाच्या भेटी घेऊन, माहिती मिळवून, पारखून हे संशोधन केले आहे, हे पुस्तक वाचताच समजून येते.

ह्या भागातील मुख्य तीर्थक्षेत्र निर्मळ, येथील निर्मळेश्वर व विमलेश्वर महादेव, जगद्गुरु श्रीशंकराचार्य, श्रीविद्याशंकर भारती ह्याचे समाधिमंदिर, श्रीविठ्ठल मंदिर, तसेच ह्या सर्व भागाचा निर्माता भगवान् परशुराम, काळ, काम, जमदग्नी व रेणुका ह्याचे छोटे मंदिर वगैरे आहेत श्रीविमलतीर्थाच्या प्रदक्षिणा मार्गावर श्रीसांबसिद्धेश्वर मंदिर, श्रीसुरेश्वर महादेव मंदिर व श्री सुरेश्वरीदेवी, वगैरे आहेत तेथेच सतीचा पार असून श्रीब्रह्मदेव व रेणुकामाता ह्याची मूर्ती-शिल्पेही आहेत ह्या विमल तीर्थक्षेत्री श्रीशिवभक्त परंतु दुष्ट विमला-सुराचे कसे निर्दालन केले ह्याचे प्रत्यतर आपल्याला श्री विमलतीर्थनिर्मिती कथा वाचल्यानंतर समजेल

श्रीपरशुरामाने ह्या तीर्थक्षेत्रात आपली सहासष्ट कुळे आणून वसाहत केली. ऋषिमुनी, तपस्वी, देवदेवता ह्यांना ह्या ठिकाणी निवास करण्यास सांगून त्याना संरक्षणाचे आश्वासन दिले परंतु काही काळाने ह्या भागात एक विमला-सुर दैत्य उन्मत्त झाला व त्याने त्याच्या धर्मकृत्यात, तपस्येत, यज्ञयागांत व्यत्यय

आणून त्रास देण्यास सुरुवात केली, तेव्हा त्याला कैलासाला पाठवण्यासाठी भगवान् परशुरामाना पुन्हा शस्त्र हाती घ्यावे लागले श्रीपरशुरामाने आपल्या बाणाने त्याचे मस्तक उडवले व शरीराचे जागी विमल तीर्थ निर्माण केले ही निर्मळ-महात्म्यांतील कथा श्री. गोडबोले ह्यानी आपल्या ह्या पुस्तकात कल्पकतेने, रजकतेने व लालित्यपूर्ण भाषेत वर्णन केली आहे श्रेष्ठ व थोर अशा ह्या विभूतीचे म्हणजेच श्री भगवान् परशुरामांचे कार्य किती महान व उदात्त होते ह्याची ओळख पटते

श्री विवेकानद गोडबोले ह्यानी अत्यत परिश्रमपूर्वक तयार केलेला हा ग्रंथ– 'आद्य परशुरामक्षेत्र, निर्मळ सुरपूर' (शूर्पारक), धार्मिक व सद्विचार-प्रधान तर आहेच परतु ग्रथाची भाषाशैली सुबोध, लालित्यपूर्ण व मनोरजक अशी आहे. पुस्तकातील स्थळाची वर्णने म्हणजे जणू त्यांचे प्रत्यक्ष जिवत चित्रणच वाटते व लेखक त्याचे प्रत्यक्ष आपल्याला दिग्दर्शन करीत आहे असा भास होतो. हे बोलके चित्रण असलेला हा भरीव ग्रथ सर्वांना आवडेल अशी मला अशा आहे.

मी काही कोणी एखादी शिक्षण-तज्ञ किंवा इतिहासाची प्रगाढ पडिता नाही किंवा अधिकारी व्यक्तीही नाही इतिहासाची विद्यार्थिनी जरूर आहे; परतु इतिहास सशोधन मडळ, कल्याण ह्या सस्थेची सभासद ह्या नात्याने मडळाने परिचय लिहिण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली म्हणून व व्यक्तिगत सदिच्छा-शुभेच्छा व्यक्त कराव्या म्हणून मी परिचय लिहिण्याचा प्रयत्न केला आहे

इतिहास सशोधन मडळाने प्रकाशित केलेले व श्री विवेकानद गोडबोले ह्यानी लिहिलेले हे दुसरे पुस्तक पूर्वीचे 'सुभेकल्याण' हा ग्रथ व आताचे हे 'आद्य परशुरामक्षेत्र निर्मळ–सुरपूर (शूर्पारक)' हा दुसरा ग्रथ ह्याशिवाय मंडळाचे चिटणीस श्री मुकुदराव शंकर ह्यानीही 'असे वीर किती वर्णावे' ह्या नावाचा ऐसिहासिक कथासग्रह लिहिला आहे. हे सर्व कार्य आमच्या छोटचाशा ह्या इतिहास सशोधन मडळास अभिमानास्पद व भूषणावह आहे अशीच मडळाच्या सभासद–लेखकांना सशोधन करून ऐतिहासिक, धार्मिक व सामाजिक ग्रथ लिहिण्याची प्रेरणा परमेश्वर निरतर देवो व ती बहुजनसुखाय, बहुजन-हिताय पावन होवोत हीच शुभेच्छा

— सौ लीला दवळे

# प्रास्ताविक

४ जून १९७४ शिवशके ३०१ ह्या पुण्यपावन दिवशी, श्री शिवछत्रपती शिवाजीमहाराज यांच्या ३०० व्या राज्यारोहणवर्षी आम्ही आमचे 'सुभे कल्याण' ह्या प्रांताचा सुमारे ७००० वर्षांचा इतिहास सांगणारा इतिहास ग्रथ श्रीशिव-छत्रपतींच्या सातारा येथील राजस्नुषा सौ. अरुणाराजे भोसले ह्यांचे परममगल हस्ते कल्याण मुक्कामी प्रसिद्ध केला अवघ्या साडेतीनशे पानाच्या पुस्तकात एका विस्तृत भागाचा व एवढ्या प्रदीर्घ काळाचा इतिहास सकलित करताना अशी जाणीव झाली, की ह्या भागातील कित्येक स्थानाना एवढा मोठा इतिहास आहे की त्यांतील एकाएका नगरावर, एकाएका विषयावर ५००/५०० पानाचे सुमारे पचवीस तरी ग्रथ तयार होऊ शकतील. अर्थात हे प्रदीर्घ कार्य खर्चाचे, अखड श्रमाचे व दीर्घ कालावधीचे आहे. म्हणून अत्यत महत्वाच्या घटना, प्रसग व केंद्र लक्षात घेऊन तो ग्रथ पूर्ण केला तो महत्त्वाच्या घडामोडीचा व सामाजिक बदलाचा धावता इतिहास म्हणावा लागेल म्हणून ते पुस्तक पूर्ण झाल्यावर आपल्याला जमेल त्याप्रमाणे जेवढे शक्य होईल तेवढे प्रसिद्ध करून ठेवायचे असा निश्चय करून आम्ही कार्यास प्रवृत्त झालो

मधल्या एकबोन वर्षांत 'साष्टी बेट हीच लंका' ह्या आमचे सशोधनाचा विषय घेतला होता परतु रामायण, त्यातील प्रसंग, काही स्थळे ह्या अनुषगाने सशोधनही करून वेळोवेळी मासिक, पुस्तकांतून प्रसिद्ध करून आमची प्रगती चालू असता असे लक्षात आले की ह्या सशोधनाला कांही जबरदस्त धक्का देणारे काही विवाद्य प्रश्न आहेत; ते सिद्ध करणे व सोडवण्यास हजारो वर्षे तरी पुरी पडतील की नाही हे सांगणे कठीण आहे असे आढळले. म्हणून ते दीर्घावधीचे व विवाद्य काम बाजूला ठेवून आमचे लक्ष आद्य परशुराम क्षेत्र निर्मळ–सुरपूर इकडे वळवले

ह्या आद्य परशुराम क्षेत्राचा देखील इतिहास एवढ्या प्रदीर्घ कालाचा आहे की तो शोधून काढणे व्यक्तीगत ताकदीबाहेरचे आहे विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे ह्या सात हजार वर्षांच्या प्रचड कालखडात हे शहर अखड गाजत राहिलेले आढळते एवढेच नव्हे तर ह्या देवनगरीचा इतिहास म्हणजे भारताच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक स्थित्यतराचा प्रातिनिधिक इतिहास होऊ शकेल कारण ह्या एकमेव शहराने भारताला साऱ्या विश्वाशी जोडून टाकले होते त्यामुळे केवळ ह्या देवभूमीचा संपूर्ण इतिहास जर उपलब्ध होऊ शकला तर भारताच्या व विश्वाच्या आर्यपूर्व इतिहासावरही प्रखर प्रकाश पडेल. आमचे मते, मोहेंजोदारो, हराप्पा, इत्यादी आर्यपूर्व संस्कृतीच्याही आधीचा किंवा ह्या सस्कृतीच्या आरंभ काळापासूनच्या विकासाचा इतिहासही उपलब्ध होण्याची शक्यता आहे परंतु हे

काम एवढे प्रचंड आहे की त्यासाठी प्रचड खर्चाची एखादी राजकीय योजनाच राबवावी लागेल पुरातन शास्त्रज्ञांचे तार्केच्या तार्फे ह्या कार्याला निदान दोन तपे तरी जुपावे लागतील असख्य माणसाची, तज्ज्ञांची, विद्वानाची एक महान संघटना कार्याला जुपावी लागेल एवढे केले तर त्यातील प्रयत्नांतून कितीही कमी यश आले तरी अतिप्राचीन भारतीय भाषा, त्याची शास्त्रीय प्रगती, ज्ञानभांडार, वगैरे अभिमानास्पद अद्वितीय रत्ने ह्या प्रचड ज्ञानसागरमथनातून बाहेर येऊन परिणामी भारतीय जनतेच्या मानसिक व ऐहिक प्रगतीला पराकोटीला पोचवण्यास उपयुक्त ठरतील

परंतु हे होईल तो भारताच्या भाग्यचक्राचा प्रारंभ बिंदू असू शकेल एवढा प्रचड आशावाद धरून ह्या प्रयत्नांची कास आम्ही धरणे म्हणजे टिटवीने म्हणावे 'मी समुद्र ओलांडून जाईन' हे आम्ही जाणून आहोत परतु ह्यामुळे खचून न जाता आपले हातून होईल तेवढा रेणूएवढा का होईना, प्रयत्न करून ठेवावा ह्या कर्तव्यभावनेने आम्ही ह्या उद्योगास प्रवृत्त झालो, व जेवढे जमेल तेवढे, असलेल्या तुटपुंज्या सामर्थ्याने, बद्धीने. ह्या देवनगरीचा इतिहास सकलित करण्याचा प्रयत्न केला आहे ह्यामध्ये पूर्व सूरींनी जे केले आहे त्याचा पुष्कळच उपयोग जरूर केला आहे गेल्या कित्येक वर्षांत म्हणजे सुमारे ७० वर्षांत तरी ह्या भागावर कोणी फारसे लिहिण्याचा प्रयत्न केलेला नसावा निदान आमचे तरी वाचनात आलेला नाही म्हणून ह्या देवभूमीची निदान सामान्य भारतीयाला ओळख राहावी. जाणीव राहावी, एवढ्याच अल्पश हेतूने हे छोटेखानी पुस्तक आम्ही प्रदीर्घ कष्टाने संकलित करून प्रसिद्ध करीत आहोत. ह्यात काही विचार आम्ही मांडले आहेत ते विवाद्य असतील किंवा आमचे म्हणण्याला पुष्टीदायक भरपूर पुरावे नसतीलही, परतु ते विचार आपणास – सशोधकांना, सर्वांनाच विचार करावयास लावणारे ठरतील असा विश्वास वाटतो

ह्या स्थळाचे मा हितीसबधी एक धार्मिक पोथी श्रीशंकराचार्य समत 'निर्मळ माहात्य' ही कोणा हरिदास कवीने सुमारे एक हजार ओव्यांची प्राकृतात लिहिली होती ती प्रथम इ स १९०० पूर्वी प्रसिद्ध झाली असावी व नंतर मुबईचे आर्यन एज्युकेशन सोसायटीचे एक क्लार्क श्री. काशिनाथ नारायण आठवले यानी जुलै २०, सन १९०३ आषाढ शु ११ शालीवाहन शके १८२५ साली प्रसिद्ध केली होती त्यानतर आजतागायत कोणीही ती प्रसिद्ध केलेली नाही सदर पोथी लिहिणारे हरिदास कवि कोण ह्याची माहिती मिळण्यासारखा काहीही संदर्भ पोथीत आढळून येत नाही. फक्त त्यात एवढेच म्हटलेले आहे की "एकनाथानी ज्याप्रमाणे प्राकृतात रचना करून सामान्य जनतेला भागवत उपलब्ध करून दिले, त्याप्रमाणे मी हे निर्मळ–माहात्म्य श्री जगद्गुरु शकराचार्यांच्या समतीने पद्मपुराणांचे व इतर पुराणाचे आधारे प्राकृतात लिहिले आहे"

ह्यावरून ही पोथी एकनाथानंतर केव्हातरी लिहिली गेली असावी तसेच ती हस्तलिखित स्वरूपात नकला होऊन प्रदीर्घ काळपर्यंत लोकाचे वाचनात असावी व आठवले ह्याजकडे ती उपलब्ध होऊन कोठल्यातरी प्रेरणेने श्री आठवले यांनी मोठ्या खर्चाने छापून प्रसिद्ध केली हे त्यांचे या क्षेत्रावर फार मोठे उपकारच म्हणावे लागतील; कारण नंतर निदान ५० वर्षांत तरी ही पोथी निर्मळ वसई परिसरातील सर्वसामान्य ग्रामीण बहुजनांपासून तें ब्राह्मण वर्गापर्यंत सर्वांचे दैनंदिन वाचनात असावी असे आम्हांस खेडोपाडी ह्या कार्यासाठी फिरत असता आढळून आले आहे ह्या भागातील बहुतेक वृद्ध माणसांना किंवा पन्नाशीच्या पुढील व्यक्तींना ह्या पोथीसंबंधी माहिती आहे त्यातील सांगितलेल्या काही तीर्थ-स्थानांची थोडीफार तरी माहिती आहे, तसेच निर्मळची जत्रा अजूनही कार्तिक वद्य एकादशीस फार मोठ्या प्रमाणावर व सुमारे पंधरा दिवसांची भरते व त्या प्रसंगी ह्या भागातील सुशिक्षित हिंदू समाज जरी प्रत्यक्ष यात्रा, क्रियाकर्मांतर करीत नसला तरी एकदा येऊन श्रीविमलेश्वर–निर्मळेश्वराचे दर्शन घेऊन जातातच. परंतु सर्वसामान्य अशिक्षित बहुजनसमाज अजूनही ह्या तीर्थावर स्नान, दान, क्रियाकर्मांतर करताना बहुसंख्येने आढळतो ही सर्व परंपरा, धार्मिक वृत्ती, श्रद्धा टिकवून धरण्याचे बरेचसे श्रेय ह्या निर्मळ-माहात्म्य ग्रंथाला जाते ह्यात संशय नाही. कारण हे प्रसिद्ध झाल्यामुळे ते जनतेच्या वाचनात राहिले, त्याच क्षेत्राचा इतिहास लक्षात राहून ह्या सुधारणेच्या व नवविचारांच्या आधुनिक युगातही श्रद्धा व परंपरा जोपासण्यास ह्या ग्रंथाने प्रेरणा दिलेली आहे.

श्री आठवले ह्याच्यानंतर पुन्हा हे माहात्म्य प्रसिद्ध न झाल्यामुळे नष्ट होण्याच्या पथाला लागले आहे परंतु आमचे सुदैवाने तेथील अनेक ग्रामस्थांनी, जर आम्ही हा ग्रंथ प्रकाशित केला तर त्याची प्रत मिळवून देण्याचे अनेकांनी आश्वासन दिले परंतु निर्मळचे 'वैभव स्टोअर्स'चे मालक श्री रामचंद्र जनार्दन पाटील ह्या गृहस्थानी आस्थेवाईकपणे आमचे प्रयत्नांची चौकशी करून, अत्यंत मेहनतीने आम्हांस त्याची संपूर्ण सुव्यवस्थित एक प्रत मिळवून दिली तसेच श्री जांभेकर गुरुजी व श्री साळवी वैद्य ह्यांनीही त्यांचेजवळ जशा मिळाल्या त्या स्थितीतील दोन प्रती मिळवून दिल्या त्यामुळे आमचे संशोधनास प्रचंड गती मिळून आम्ही उत्साहाने ह्या पुस्तकाचे काम पूर्ण केले

श्रीशंकराचार्य संमत 'श्री निर्मळमाहात्म्य' ह्या हरिदास कवीच्या ग्रंथाचा आम्ही भरपूर उपयोग केला आहे, सदरहू ग्रंथ मिळाला तेव्हा आम्ही ही पोथी प्रसिद्ध करण्याचे आश्वासन दिलेले आहे. त्याप्रमाणे ह्या ग्रंथाचे अगोदर ही पोथी प्रसिद्ध केली आहे, व नंतर हे ऐतिहासिक माहितीचे पुस्तक प्रसिद्ध करीत आहोत

ह्या पुस्तकात प्रथम प्रकरणात हल्लीचे सोपारे हे पूर्वीचे शूर्पारक क्षेत्र म्हणून असले तरी त्याचे मूळ नाव सुरपूर कसे होते, व त्याचा अपभ्रंश कसा झाला हे

सांगून, हे शर्पारक नसून सुरपूरच आहे हे मांडले आहे ह्या स्थळाचे माहात्म्य किती दीर्घ काळ प्रसिद्ध आहे व कोणत्या थोर पुरुषांनी ह्या स्थळाला भेटी दिलेल्या आहेत, तसेच ही शिलाहाराची विवाद्य राजधानी, घारापुरी नव्हे, दंडाराजपुरीही नव्हे, तर सुरपूरच असावी असाही एक नवीन विचार आम्ही संशोधकांसाठी मांडला आहे ही देवांची नगरी, आद्य तीर्थक्षेत्र होते हे सांगितले आहे

दुसऱ्या प्रकरणात ह्या स्थलासंबंधी ऐतिहासिक संदर्भ संकलित करून दिले आहेत त्यामुळे पुरावा ह्या दृष्टीने तर उपयोग होईलच, परंतु काही प्राचीन घटनांचा इतिहास ज्ञात होईल.

तिसरे प्रकरणात श्री निमळेश्वर-विमलेश्वर महादेव ह्या स्थानासंबंधी सर्व वर्णनात्मक माहिती दिली आहे त्यातच जगद्गुरु श्रीशंकराचार्य श्रीविद्याशंकर भारती ह्यांची समाधी व जीर्णोद्धार ह्यासंबंधीही माहिती संकलित केली आहे

चवथे प्रकरणात श्रीनिर्मळ-विमल क्षेत्रनिर्मितीची पौराणिक कथा दिलेली आहे.

पाचवे प्रकरणात श्रीचक्रेश्वर महादेव मंदिर व चक्रतीर्थ ह्यासंबंधी माहिती दिली असून त्या भागात उत्खननात सापडलेले मंदिराचे अवशेष तेथे ठेवलेले आहेत त्याचेही वर्णन केले आहे तसेच चक्रतीर्थ व बुरुड राजाची राणी ह्यांच्या संबंधीची एक अत्यंत बोधप्रद कथा तेथील जनमानसात परंपरेने आलेली आहे ती दिलेली आहे.

सहावे प्रकरणात श्रीतुंगारेश्वर महादेव मंदिर, पर्वत व त्यावरील तीर्थे ह्यांचे सविस्तर वर्णन केलेले आहे

सातवे प्रकरणात श्रीसांब सिद्धेश्वर मंदिर, आठव्या प्रकरणात श्रीसुरेश्वर मंदिर, नववे प्रकरणात श्री रेणुकामाता मंदिराचे वर्णन. दहावे प्रकरणांत श्री सरस्वतीमंदिर शूर्पारक व कवि प्रदीप सोढ्ढलाची कथा दिली आहे. अकरावे प्रकरणात अन्य शिव मंदिरे व इतर मंदिरासंम्बधी माहिती दिली आहे

बाराव्या प्रकरणात देवनगरी सुरपूर (शूर्पारक-सोपारे) ह्यामधील डोंगर, टेकड्या, पर्वतराजी वगैरेसंबंधी सर्व धार्मिक व ऐतिहासिक माहिती दिली आहे. तसेच बुद्धाचा स्तूप, ऐतिहासिक उत्खननातील गोष्टी, बुरुडराजाचा कोट व वाडा, तसेच प्रतिबुद्ध मैत्रेयीबुद्ध पूर्ण ह्यासंबंधी कथा दिलेली आहे

तेरावे प्रकरणात निर्मळ सुरपूर ह्या परिसरातील तीर्थे व त्याचे वर्णन दिले आहे, तसेच त्यांचे धार्मिक माहात्म्य व तीर्थस्नान वगैरेची फलश्रुती इत्यादी संपूर्ण दिलेले आहे

थोडक्यात हा निर्मळ-सुरपूर परिसराचा इतिहास व धार्मिक माहात्म्य सांगणारा सध्याचे परिस्थितीत तरी परिपूर्ण ग्रंथ म्हणावा लागेल, एवढी माहिती

आम्ही उपलब्ध करून ठेवलेली आहे. हा ग्रंथ धार्मिकांना, श्रद्धाळूना, इतिहास संशोधकाना, अभ्यासूना, सामान्य जिज्ञासूना, देशाभिमानी व्यक्तीना व नास्तिकांना सुद्धा प्रेरणादायक ठरेल असा विश्वास वाटतो हयातील उद्देश अल्पांशाने जरी सफल झाला तरी आम्हास धन्यता वाटेल हयात शंका नाही

हया पुस्तकाचे कामी ज्यानी आम्हांला मदत केली, सहानुभूती दाखवली, प्रेरणा दिली, निराशावस्थेत चैतन्य दिले त्या सर्वांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत हया सर्वांचा नामनिर्देश करणे कठीण आहे कित्येकाना तो केलेला आवडणारही नाही हे माहीत असूनही काही ऋणनिर्देश नांवनिशीवार केल्यावाचून आम्हास राहवत नाही

(१) आमचे मंडळाचे चिटणीस श्री मुकुंद शंकर टुमकर, श्री लीला ढवळे, श्री त्र्य. र. दाणेकर व इतर सदस्य हयांनी सतत आमचे पाठीशी राहून हे कार्य करून घेतले (२) निर्मळचे रामचंद्र जनार्दन पाटील, श्री साळवी वैद्य व श्री. जांभेकर गुरुजी हयानी आम्हाला दुर्मिळ पोथ्या मिळवून दिल्या (३) सोपारा ग्रामपंचायतीचे सभापती श्री खलीद इस्माईल चिंधे (४) सोपारा ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी श्री नारायण भागोजी पवार (५) गास हया ग्रामपंचायतीचे सरपंच श्री सजाव आलेक्स फिगेर (६) रानगाव-वासळी ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. दामोदर वैती व त्यांचे बंधू (७) अचोळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच श्री. किसनराव चौधरी व त्यांचे चुलते श्री महादेव रामा चौधरी हयांनी तर वयोवृद्ध असूनही आम्ही त्यांचेकडे माहिती मिळवण्यासाठी गेलो असता भर दुपारचे उन्हात आमचेबरोबर येऊन काही तीर्थे मोठ्या उत्साहाने दाखवली व पुनर्भेटीत आणखीही दाखवण्याचे आश्वासन दिले हया सर्वांनीच आम्हाला शक्य तेवढे सहकार्य दिले आहे व त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत श्रीतुंगारेश्वराचे मॅनेजर श्री. चावक हयांनीही आम्हाला काही तीर्थे दाखवली व माहिती सांगितली त्यांचेही आम्ही ऋणी आहोत वसई रोड एस्. टी स्टँडचे प्रमुख व उपप्रमुख, सहाय्यक, वाहतूक निरीक्षक श्री अनंत गजानन वर्तक, राहणार उमेळे हयांनी देखील हया परिसरातील बहुमोल माहिती आम्हास देऊन मार्गदर्शन केले हयाबद्दल आम्ही त्यांचेही ऋणी आहोत मंडळाचे सदस्य श्री. डॉ रायकर हयानी तर वेळोवेळी भेटून चौकशी करून प्रोत्साहन दिले हे आम्हास कधीही विसरता येणार नाही पापडी येथील स्थाईक श्री लक्ष्मण हरी पुरोहित उर्फ नाना पुरोहित हे वयोवृद्ध असूनही आमचे विनतीवरून वेळात वेळ काढून आम्हास बहुमोल माहिती दिली त्यांचेही ऋण आम्हास कधीही विसरता येणार नाही.

कल्याणांतील पत्रकार श्री बा. ना. उपासनी, श्री अण्णा वेटावदकर, श्री. अरविंद केसकर हयांनी वेळोवेळी आमच्या कार्याची चौकशी करून योग्य वेळी

योग्य तेवढी प्रसिद्धी देऊन आम्हास सहकार्य केले तेही आम्हास कधीही विसरता येणार नाही

इतिहास सशोधन मडळ, मुबई ह्या सस्थेचे कार्यवाह श्री. डॉ. खोबरेकर एम् ए पीएच्. डी ह्याचे आम्हाला नेहमीच प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळालेले आहे मुबई मराठी सग्रहालय, दादर, व कल्याण सार्वजनिक वाचनालय-ह्याचा-ही आम्हास पुष्कळच उपयोग झाला आहे वरील सर्वाचे आम्ही ऋणी आहोत. ' मधुराश्रम ' गोरेगाव, मुबई ह्या सस्थेचे प. पू श्री ब्रह्मचारी विश्वनाथजी याचे आशीर्वाद व मार्गदर्शनावाचून हा ग्रथ कधीच पुरा झाला नसता हे नोंदवण्यास आम्हाला अभिमान वाटतो. त्यांचा आशीर्वाद हेच आमचे सामर्थ्य त्यांचे ऋण मान्य केल्यावाचून ही प्रस्तावना पूर्ण होत नाही त्यांना त्रिवार वंदन.

हे पुस्तक सुदर करण्यासाठीं आमचे स्नेही व एक वेळचे विद्यार्थी श्री सदाशिव देवळेकर, कोळसे वाडी, कल्याण यानी अल्पवेळात कव्हरसाठी अतिशय सुदर चित्र काढून दिले त्याबद्दल त्यांचेही आम्ही ऋणी आहोत

पुस्तकाची आतील सर्व छायाचित्रे, वसत फोटो स्टुडिओ, टिळक चौक कल्याण ह्याचे मालक श्री हिंमतभाई ठक्कर ह्यानी आमचे बरोबर निर्मळ सुरपूर भागात उन्हातान्हात फिरून सर्वांगसुदर छायाचित्रे काढून दिली, त्याबद्दल आम्ही त्याचे ऋणी आहोत

पुस्तकातील छायाचित्रांचे नितांत सुदर ब्लॉक्स प्रकाश प्रोसेस पुणे ह्यानी अल्प वेळात व माफक दराने करून दिले त्यांचेही आम्ही ऋणी आहोत

सरते शेवटी ह्या सर्व साहित्याची सुदर जुळणी व मोहोरेदार छपाई आमचे स्नेही श्री जोशी, मालक, ज्ञानविलास प्रेस, पुणे ह्यानी व त्यांचे कर्मचारी यांनी अल्प वेळात अत्यत जबाबदारीने करून हे पुस्तक सर्वांगसुदर केले, ह्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत, म्हणून आम्ही त्याचेही ऋणी आहोत

ह्या पुस्तकाची खरी योग्यता वाचक वर्ग ठरवणार आहे तेव्हा नम्र विनंती की त्यांनी हे पुस्तक मन·पूर्वक वाचून आपला प्रामाणिक अभिप्राय जरूर कळवावा. आम्हाला तो मार्गदर्शक होईल धन्यवाद !

शिवशक ३०६, कार्तिक शुद्ध ८<br>
श्रीदुर्गाष्टमी, शके १९०१<br>
दिनाक २९-९-१९७९

आपला नम्र,<br>
**विवेकानंद गोडबोले**<br>
मॉडर्न व्ही स्कूल टिळक चौक,<br>
कल्याण

## श्री निर्मळ-सुरपूरमाहात्म्य (सह्याद्री खंड-स्कंदपुराण)

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे

### अध्याय १ ला

ब्राह्मणेभ्यश्च सकला पृथ्वी दत्ता यथाविधि
नवीन निर्मित क्षेत्रम् शूर्पारकमनुत्तमम् ।। २३ ।।
क्षेत्र जवाधिकं काश्या सर्वतीर्थानि तत्र वै
विमल निर्मल चैव खादिर तीर्थमुत्तमम् ।। २६ ।।
एव क्षेत्रं महादेवी भार्गवेण विनिर्मितम्
तन्मध्ये च कृत वासः पर्वते चातरगके ।। ३० ।।
चतुर्दश गोत्रकुला. स्थापिताश्चातरगके
सर्वे च गौरवर्णाश्च सुनेत्राश्च सुदर्शना. ।। ४० ।।

### अध्याय २० वा

क्षत्रसहारकारेण त्रिलोकस्थितिकारिणा
बलेन तपसा रुद्रशिष्येणामिततेजसा ।। १ ।।
निर्मितं चेषुपाताख्य क्षेत्र शूर्पारक शुभम् ।
नाकाधिकतर नित्य सदा सर्वर्तुसेवितम् ।। २ ।।
तत्र हरिहरौ साक्षात् गुरुशिष्यौ परस्परम् ।
यत्र पद्मोमासहितौ स्वगणै परिवेष्टितौ ।। ३ ।।
स्थितावतो वय सर्वे तिष्ठाम सुचिर सुखम्
तथ्य तं शरण चैतत् यूय चादिपुरुषम् ।। ४ ।।

### अध्याय २२ वा

**भगवान परशुरामाने देवांची स्थापना केली**

तानागतान्समालोक्य प्रफुल्लनयनोऽब्रवीत्
" मया निर्मित क्षेत्र समुद्रान्तर्गतम् महत् ।। १० ।।
भवदागमनाज्जातं सर्वतीर्थोत्तमम् ।
युष्माश्च प्रार्थयामेक सर्वान् देवर्षिसत्तमान् ।। ११ ।।

शंभो त्वमुमया सार्धं गणैः स्कंदादिभिः सह
विष्णो त्वं रमयासार्धं सनकाद्यैः श्वापश्वगै ॥ १२ ॥
ऋषिभिर्देवगधर्वैरप्सोभिश्च किन्नरै.
सदैव सर्वे स्थातव्य व्याप्त क्षेत्रमिद शुभम् ॥ १३ ॥

## विमल-निर्मल तीर्थ महिमा

### अध्याय २४ वा

### परशुराम उवाच

" ये म्रियन्ते चाब्धिगर्भे क्षेत्रे रामविनिर्मिते ।
सत्यलोकमुषित्वान्ते मुच्यन्ते सर्व किल्बिषै. ॥ ७ ॥
पुलिने ये प्रम्रीयन्ते दह्यन्ते पुलिने च ये ।
साक्षात् मोक्षो भवेत्तेषा सत्य सत्य वदाम्यहम् " ॥ ८ ॥
जामदग्न्यो वदत्येव आकाशात् अभवत् ध्वनि
" मा कुरुष्वात्र सदेहं श्रुतिरेषा सनातनी " ॥ ९ ॥

卐 卐 卐

# १. देवनगरी निर्मळ - सुरपूर उर्फ सोपारे

भगवान परशुरामांनी आपली क्षत्रियसंहाराची प्रतिज्ञा पूर्ण करून तत्कालीन साऱ्या विश्वाचे चक्रवर्तीपद मिळवले त्या काळी ज्ञात असलेल्या संपूर्ण पृथ्वीचे सम्राटपद भूषविण्याचा पहिला मान जसा भगवान परशुरामाचा आहे, तसाच साऱ्या पृथ्वीचे ब्राह्मणांना दान करून दान-सम्राटपदाचा पहिला मान त्यानीच मिळवला आहे अनेक चक्रवर्ती झाले असतील, पुढेही कदाचित् होतील, परतु पृथ्वीसम्राट आणि पृथ्वी दान-सम्राट होणे कुणालाही साधले नाही, साधणार नाही "झाले बहु, होतील बहु, परतु ह्यासम हा" हा काव्यालकार सत्यार्थाने फक्त भगवान परशुरामानाच शोभून दिसतो परतु एवढ्यानेच त्यांचे अलौकिकत्व सपत नाही पृथ्वी दान केल्यावर स्वतःच्या व इतरांच्या निवासासाठी समुद्रापासून नव पृथ्वी मिळवून नव वसाहत-सस्थापकत्वाचा अग्रमान भगवान परशुरामांनीच मिळविला आहे दुष्टसंहाराकरिता अनेक अवतार झाले असतील; कर्ण, रघू ह्यासारखे दानशूरही अनेक झाले असतील, परतु नव विश्व-वसाहत-जनकत्वाचा आद्य व अंतिम मान केवळ भगवान परशुरामांचाच आहे "परित्राणाय साधूनाम्, विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसस्थापनार्थाय सभवामि युगे युगे ॥" ही भगवान श्रीकृष्णाची गीतेतील उक्ती सत्यार्थाने सिद्ध करून दाखवली भगवान परशुरामांनी

नवविश्वजनक भगवान परशुरामांनी निर्माण केलेल्या ह्या भूप्रदेशाचे नाव देवनगरी-निर्मळ-सुरपूर त्याची राजधानी सुरपूर त्याचा अपभ्रंश होत होत झाले शूर्पारक व त्याचाही अपभ्रंश होऊन झाले सोपारे भगवान परशुरामानी सहासष्ट कुळे आणून त्यांची वसाहत केली त्यांना गोत्रे दिली वेद विद्या, व इतर चवदा विद्या-चौसष्ट कला शिकवल्या कैलासातून पवित्र पुण्यपावन वैतरणी गगा आणून प्रदेश समृद्ध करून सोडला असंख्य पवित्र तीर्थे निर्माण करून देवाच्या वसाहती निर्माण केल्या परशुरामकाळापासून आतापर्यंत सुमारे सात हजार वर्षे भारताला समृद्धीचे महाद्वार उघडून देणारे भारताचे एकमेव वैभवशाली नगर म्हणजे देवनगरी-निर्मळ-सुरपूर परदेशांतून सुवर्णाचा ओघ भारतात खेचून आणून भारताला सत्यार्थाने सुवर्णभूमी बनवली ती ह्याच नगराने भारतीय संस्कृतीची सुवर्णकिरणे पश्चिमेपासून पूर्वेपर्यंत साऱ्या भूतलावर पसरवली व भारताची कीर्ती दशदिशांत पसरवली ती ह्याच देवनगरी-निर्मळ-सुरपूरने सुमारे सहा हजार सहाशे

वर्षे विश्वाच्या इतिहासात धर्मक्षेत्र--तीर्थक्षेत्र—समृद्धीक्षेत्र म्हणून अखंड गाजत राहणारे एवढे प्राचीन व अजूनही अस्तित्वात असणारे महत्त्वाचे शहर पृथ्वीच्या इतिहासात नाही

एका काळी वैभवशाली असलेले हे नगर आज एक खेडेगाव झाले आहे; आणि सध्याचे त्याचे प्रचलित नाव सोपारे. वेस्टर्न रेल्वेवरील विरार ह्या स्टेशन अलीकडील स्टेशन नाला-सोपारा असे आहे तेथून दीड किलो मीटरवर हे स्थान आहे ह्या नगराची प्राचीन नोंद महाभारत, रामायण, पद्मपुराण वगैरे पुराणग्रंथातून आढळते. ती म्हणजे 'शूर्पारक' परंतु हे नाव अर्थबोधक नाहीच व इतर कोणत्याही घटनेचे सूचकही नाही. परंतु महाभारतासारख्या ग्रंथातून ते आल्यामुळे अधिक विश्वसनीय मानले जाऊन विद्वानांनी तर्कवितर्क करून अर्थ लावण्याचा प्रयत्न केला उदा काही विद्वानांचे म्हणणे असे की परशुरामाने सह्याद्रीच्या शिखरावरून बाण मारून समुद्रापासून मिळवलेल्या ह्या भूमीचा आकार सुपासारखा दिसतो म्हणून ह्याचे नाव शूर्पारक. तर काही विद्वानांनी ह्या नावाचा संबंध रावणाची बहिण शूर्पणखा हिच्याशी जोडण्याचा प्रयत्न केला

वास्तविक वरील दोन्ही संगती तर्क-दुष्ट आहेत, हे सहजच लक्षात येईल कारण शूर्पारक हें राजधानीचे गावाचे नाव पुढे सर्व कोकणपट्टीलाच अनेक ठिकाणी वापरले गेले असले तरी कित्येक वेळी राजधानीचे नावावरूनही प्रांतबोध केला जातो, व केवळ आकाराचा विचार केला तर तो सुपासारखा नाहीच त्याचप्रमाणे शूर्पणखेचे नाक कापल्यामुळे ज्या स्थानाला ते नाव पडले ते गाव नाशिक आहे, हे प्रसिद्ध आहे परंतु शूर्पणखेसंबंधी कोणतीही घटना ह्या भागात घडल्याचे रामायणात नाही म्हणून शूर्पणखेचे नावावरून शूर्पारक नाव पडले हेही धादांत असत्य मानावे लागेल

मग महाभारत, रामायण ह्या ग्रंथात शूर्पारक असा उल्लेख कसा आ. असावा ? ह्याचा विचार करता असे लक्षात येईल की परशुराम-काल व महाभारत काल ह्यांमध्ये सुमारे २००० वर्षाचे अंतर आहे. एवढ्या प्रदीर्घ काळातील इतिहास, नामे देखील केवळ लोककथा-दंतकथा स्वरूपातच लोकमानसात राहणार व त्याच स्वरूपाचे माहितीची नोंद महाभारत - रामायणादि ग्रंथातून केली गेली असणार हे एक, व दुसरे म्हणजे महाभारतासारखे ग्रंथ सूत वगैरे निरनिराळ्या लेखकांनी वेळोवेळी भर टाकून वाढवलेले आहेत व हस्तलिखितावरून प्रतिलिप्या झालेल्या आहेत त्यामध्ये शूर्पारक हे मूळ नावाचे अर्थहीन अपभ्रष्ट रूपच समाविष्ट झालेले असावे असे दिसते.

ह्या अपभ्रष्ट रूपाच्या विधानाला पुष्टिदायक पुरावा बुद्ध वाङ्मयावरून मिळण्यासारखा आहे. तसाच जैन वाङ्मयावरूनही मिळण्यासारखा आहे व त्याचे

वाङ्मयातील ह्या राजधानी–शहराचे नाव अधिक विश्वसनीय मानावे लागेल कारण महाभारतकाळी उत्तर हिंदुस्थानातील लोकाची दक्षिणेकडील वाहतूक एवढी सवग नव्हती कारण वाहतुकीच्या मार्गाची कष्टप्रदता, धोके इत्यादी होत महाभारतात वर्णन केलेले ह्या तीर्थावरचे प्रवास हे फक्त राजे-रजवाडे, त्यांचे बरोबरच ऋषीमुनी इत्यादींचे आहेत, व ते मर्यादित आहेत या उलट बौद्धकाळी ह्या बदरापर्यंत उत्तरेकडून दक्षिणेकडे फार मोठ्या प्रमाणावर वाहतुक-सबध प्रस्थापित झाले होते व त्यामुळे ह्या नगरीचे नाव प्रत्यक्ष परिचयाने त्यांचे लिखाणात असख्य उल्लेखाने आढळते. त्यांचे सर्व लिखाणात ह्या नगराचा ‘ शूर्पारक ’ असा उल्लेख नसून ‘ सुरपक्क ’, ‘ सुरपारक ’ ‘सूर्यपरक ’ असा आढळतो. बौद्ध काळातील ह्या बंदराचे धार्मिक, राजकीय व व्यापारी महत्त्व लक्षात घेता त्यांच्या अतिपरिचयाने ह्या गावाच्या सत्य नावाचीच नोंद अस्सल असणे अधिक सभवनीय आहे

बौद्ध वाङमयाप्रमाणेच भारतात येऊन गेलेले ग्रीक, फिनिशिअन व्यापारी, असिरियन लोक, चिनी प्रवासी ह्याचे प्रवासवृत्तातही प्रसिद्ध आहेत त्यांनी ह्या शहराच्या नावाचे केलेले उल्लेखही विचारात घेतले पाहिजेत शिवाय ठिकठिकाणी सापडलेले शिलालेखातील ह्या नगराच्या नावाचे उल्लेख विचारात घेतले पाहिजेत. त्यापैकी एकाच असिरिअन शिलालेखाचा उल्लेख केला असता सर्वच कोडे उलगडणार आहे. म्हणून त्याचा उल्लेख करतो असिरिआमध्ये एका प्राचीन वाड्याचे उत्खनन चालू असता त्यात काही प्राचीन शिलापट्टिका मिळाल्या. त्या विटांवर काही लेख कोरलेले होते पैकी एका शिला-पट्टिकेवर कोरलेले होते ‘ सुरपक्क ’ अधिक विलक्षण गोष्ट म्हणजे ह्या नावाचे स्पष्टीकरणही दिलेले होते ‘ देवांचे नगर ’ सुर म्हणजे देव व पक्क म्हणजे नगर म्हणजे देवनगरी ही विलक्षण हकीगत शूर्पारकाचे नावाचा स्पष्ट उलगडा करण्यास समर्थ आहे कारण ज्या लोकाचा ह्या बदराशी व्यापारानिमित्त सबध होता, प्रत्यक्ष जा–ये होती, त्यानी तेथील लोकांच्या प्रत्यक्ष तोंडून ऐकून माहिती करून घेऊन त्यावेळचे ह्या बदराचे परंपरागत प्रचलित नाव अर्थासह नोंदवून ठेवले त्यामुळे त्यावर कोणतीही शका काढण्यास जागा राहिली नाही त्यांनी हे अनुभूत सत्य नोंदवून कोरून ठेवून भारतीय इतिहासाला फार मदत केली आहे देवनगरी–‘ सुरपूर ’ हेच ह्या सोपाऱ्याचे परशुरामकालापासून परपरागत नाव असले पाहिजे व कोणत्याही राजाने ते बदलण्याचा प्रयत्न केला नसला पाहिजे, ह्यात शका नाही ‘ सुरपूर ’– देवनगरी हे नाव ह्या नगराचा सस्थापक भगवान परशुराम ह्याने केलेल्या नववसाहतीच्या भरीव कामगिरीला पोषक असेच आहे, हे निरनिराळ्या पुराणांनी परशुरामाच्या भरीव कामगिरीचे जे वर्णन केले आहे त्यावरूनही दिसून येते. भगवान परशुरामानी ही नवीन भूमी निर्माण करुन तेथे देव, ऋषी, मुनी, तपस्वी, यती, संन्यासी,

गृहस्थ, ब्राह्मण ह्यांची स्थापना केली अशी नोंद आहे त्यांचेसाठी पवित्र वैतरणी गंगा त्या भागात आणली निरनिराळी पवित्र तीर्थे निर्माण केली, व ते एक पुण्यक्षेत्र, धर्मक्षेत्र, तीर्थक्षेत्र निर्माण केले असे पुराणे सांगतात परशुरामकालानंतर २००० वर्षांनी होऊन गेलेल्या पंच पांडव, भगवान श्रीकृष्ण, रुक्मिणी, धौम्य ऋषी, लोमहर्षण ऋषी, वशिष्ठ, नारद, भीष्म, कर्ण, इत्यादि थोर मंडळींनी ह्या स्थळाला तीर्थयात्रा निमित्ताने भेटी दिल्या व स्नानदान, श्राद्ध-तर्पणादि विधी केले अशा नोंदी महाभारत, भागवत, पुराणे वगैरे सर्व प्राचीन इतिहाससाहित्यात तपशीलवारपणे आढळतात त्यापैकी लोमहर्षण ऋषीसारखे काही येथे स्थाईकच झाले होते. तसेच इंद्रादि देव, यक्ष, गंधर्व, कुबेर ह्यानी भेटी देऊन वास्तव्य केले होते. ब्रह्मदेव, वरुण इत्यादींनीही वास्तव्य केले होते. कालांतराने अवतार स्वरूप झालेल्या भगवान श्रीकृष्णाने स्वत ह्या ठिकाणची तीर्थयात्रा करून हे ठिकाण अत्यंत पुण्यपावन तीर्थक्षेत्र होते हे आपल्या कृतीनेच सिद्ध केले आहे.

भारतीय युद्धाचा काळ इ स. पूर्व ३१०० असे बहुतांशी विद्वानांनी आता मान्य केले आहे आणि भगवान परशुरामाचा काल त्याहीपूर्वी सुमारे २००० वर्षे अगोदरचा होता हेही पिढ्यांच्या कालगणनेवरून मोजता येते. भारतीय युद्धकाळापर्यंतच्या २००० वर्षे अगोदर स्थापन झालेल्या देव नगरी - सुरपूरची कीर्ती भगवान श्रीकृष्ण, पांडव, व्यास ह्यांच्या कालापर्यंत दोन हजार वर्षे, हे परमपावन तीर्थक्षेत्र म्हणून परंपरेने गाजत असली पाहिजे म्हणूनच वरील सर्व श्रेष्ठ व्यक्तींनी वाहतुकीचे मार्ग अडचणीचे धोक्याचे असतानाही दक्षिण-पश्चिम सागरापर्यंत मजलमारून ह्या तीर्थात स्नान करून पावन होण्यात धन्यता मानली व तशी नोंदण्यास महर्षीनी त्यांच्या ' जय ', नावाच्या इतिहासग्रंथात म्हणजेच महाभारतात करून ठेवली ह्यापेक्षा ह्या क्षेत्राच्या श्रेष्ठतेचा अधिक मान्यवर पुरावा कोणता असू शकेल ? जे स्वतःच देवस्वरुप झाले त्यानाही पुण्यपावन करणारी ही नगरी पवित्र-पुण्य-पावन देवनगरी सुरपूर पवित्रतमच असली पाहिजे

एवढ्या प्रदीर्घ काळ धर्मक्षेत्र-तीर्थक्षेत्र, समृद्धिक्षेत्र असलेल्या सुरपूर-देवनगरीचे काही प्रमाणात तरी अवशेषरूपानें श्रेष्ठत्वाची, पावित्र्याची, धार्मिकतेची साक्ष सापडणे आवश्यक वाटेल कारण जरी हें नगर आज पूर्वीएवढे वैभवशाली राहिले नसले तरी निरनिराळ्या/वाड्या, खेडेगावे ह्यात विभागून अजूनही अस्तित्वात आहे. मोहेंजदारो–हरप्पा प्रमाणे जमिनीखाली गाडून नष्ट झालेले नाही मोहेंजदारो, हराप्पापेक्षाही प्राचीन संस्कृतीचे प्रतीक असलेले हे पुण्यक्षेत्र अनेक आघात सहन करूनही अबाधित राहिले आहे आधुनिक औद्योगिक विस्तारानेही ते गाडले गेलेले नाही म्हणून वस्तुत ह्या भागात विद्वान् तज्ज्ञांच्या नेतृत्वाखाली

पुराणवस्तु-सशोधन-खात्याने उत्खनन कार्य हाती घेतल्यास प्राचीन भारतीय सस्कृतीचा अमोल ठेवा उपलब्ध होण्याची अजूनही शक्यता आहे

एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश सरकारने ब्रिटिश सशोधक व काही भारतीय सशोधक ह्याजकडून तुरळक उत्खनन केले होते, त्यात अत्यत अमोल असे अवशेष सापडले होते, असे गॅझेटिअर मध्ये नमूद केले आहे परंतु स्वातत्र्यानतर ह्या कार्याकडे कुणाचेही अद्याप लक्ष गेलेले नाही परन्तु आम्हाला असा विश्वास आहे की येथे आर्यपूर्व संस्कृतीचेही अवशेष फार मोठ्या प्रमाणावर सापडतील

पुराणे,लोककथा, इत्यादीमधून सत्य इतिहासाचे पाझर फार मोठ्या प्रमाणावर आढळतात व त्याची सत्यता अजमावण्यासाठी त्या त्या विशिष्ट भागातील गावाची नावे, तेथील तलाव, मदिरे, प्राचीन अवशेष इत्यादीचा सूक्ष्म अभ्यास केला तर त्या भागाचा फार मोठा सांस्कृतिक इतिहास आपणाला समजण्याची शक्यता असते. आम्ही त्या दृष्टीने ह्या सुरपूर भागात बहुतेक खेड्यांत हिंडून तेथील जुन्या जाणकार लोकांना प्रत्यक्ष भेटून व तेथील स्थळे, अवशेष, मंदिरे, तलाव, डोंगर, प्राचीन वास्तू इत्यादीसबंधी माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला

गावाची नावे ही शब्दार्थाने काही वेळा इतिहासघटना सांगतात, तर काही ज्यांनी नगरे वसवली त्यांची नावेच धारण करतात. काही नावे विशिष्ट घटना दर्शक असतात उदा , नासिक हे नाव ज्याप्रमाणे शूर्पणखेच्या नाक-कान कापण्याच्या घटनेवरून पडले किंवा पाटली-पुत्र हे नाव जसे पाटली व पुत्रक ह्या राजा राणीच्या सस्थापकाच्या नावे पडले, तसा प्रकार ह्याही भागात आढळतो. अर्थात् ग्रामनामे, स्थलनामे, तीर्थनामें, डोंगर-टेकड्याची नावे वगैरेही ह्याच सदरात मोडतात; व ह्या स्थळाचा सामाजिक व सास्कृतिक इतिहास सागून जातात

सुरपूर हे आद्य परशुरामक्षेत्र असल्यामुळे व तीर्थक्षेत्र धर्मक्षेत्र म्हणून पुराणात नोंद असल्यामुळे त्या दृष्टीने निरीक्षण केले तर त्या सर्व विधानाना पुष्टिदायक पुरावा अजूनही सापडतो पुराणात वर्णन केले आहे की ह्या भागात सुमारे १०८ तीर्थे आहेत प्रत्यक्ष पाहणीत आढळले की खरोखर ह्या लहानशा क्षेत्रांत १०८ पेक्षा अधिक तलाव आहेत प्रत्येक खेड्यात एक दोन तरी तलाव आहेतच गास हे गाव तेथील लोकसमजुतीप्रमाणे मूळ शूर्पारक म्हणजे परशुरामकालीन क्षेत्र व्यापार-वृद्धीनतर जे झाले ते हल्लीचे सोपारे ह्या नावाने प्रसिद्ध असलेले खेडे ह्या गास गावात एकूण २६ (सव्हीस) तलाव आहेत. लोकवस्ती अवघी दोन हजार विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे ह्या तळ्यांना फार प्राचीन काळापासून चालत आलेली तीर्थनामे आहेत अपभ्रंशामुळे भाषाबदलामुळे काही भ्रष्ट रूपात आढळतात. परतु त्याची मूळ नांवे ओळखू येतातच. उदा. इदानी तलाव हे

सध्याचे नांव हे इद्राणी तीर्थ आहे हे उघड आहे विनायक तीर्थ हे गणेश तलाव हृया नावाने ओळखले जाते कोळबाव हा तलाव कोळवापी तीर्थ हृया नावाने नमूद आहे उत्पल बाव हा तलाव उत्पलतीर्थ हृया नावाने नमूद आहे खुटलाई तलाव हे सध्याचे त्यांचे भाषेतील नाव त्रुटी तीर्थ हृया नोंदलेल्या नांवाचे द्योतक आहे हे सहज समजण्यासारखे आहे काकलई तलाव हे काककुड हृया नावाने नोंदलेले आहे चक्रेश्वर तलाव हे चक्रेश्वर तीर्थ-चक्रतीर्थ हृया नावानेच नोदलेले आहे. धर्मेश्वर कुड हा तलाव सध्या धर्मकुड हृयाच नावाने ओळखला जातो वसईतील तामतलाव हे ताम्रतीर्थ म्हणून पुराणातरी नोंदलेले आहे, विमल तलाव व निर्मल तलाव हे तर परशुरामाने विमलासुराला मारून त्या जागी त्याचे विनतीवरून निर्माण केले, हृया हकीकतीचे प्रतीकच आहेत व ते त्याच नावाने नोंदलेले आहेत कनखल तीर्थ सध्या पडखल तीर्थ हृया नावाने ओळखले जाते हे अचोले येथे आहे रामकुड हे परशुरामाचे स्मरण देणारे कुड आहे हेही सध्या गास हृद्दीत आढळून आले आहे. देव तलाव तर स्पष्टच मदिराचा तलाव म्हणून निर्देश करते व ते देवकुड-तीर्थ म्हणूनच नोंदलेले आहे ब्रम्हकुड हा तलाव गास हृद्दीत ब्रम्ह टेकडीजवळ आहे परतु सध्या तेथील जनमानसात ते प्राचीन नाव राहिले नाही परतु ब्रम्हटेकडी हे नाव स्मरणात आहे व प्रसिद्ध आहे. तेव्हा तेथील तलावाचे नाव ब्रम्हकुड, ब्रम्हालय असावे हे समजणे फारसे कठीण नाही. भद्रकुड, यागकुड म्हणून एका तलावाची नोंद आहे व पुढे कृष्ण-रुक्मिणीने तेथे स्नान केले म्हणून त्याला रुक्मिणीकुड असे नांव पडले असेही नोंदलेले आहे हा तलाव सोपारे गावातच होता व तेथे दर श्रावण मासात लोक स्नानाकरिता जात असत अशी नोंद गॅझेटिअरनेही केली आहे आज हे तळे बहुतेक बुजले असावे असे वाटते गॅझेटिअरच्या नोंदीप्रमाणे ते सोपारा दादराच्या आसपास होते. नाला हृया गावी असलेला तलाव नालिका तीर्थ म्हणून नोंदलेला आढळतो वसईजवळ होळी भागात दिघे येथील तलाव दिघेतीर्थ म्हणून नोंदलेला आढळतो बोळिंज येथे देवहरा तळे आहे वठार सत्पाळे येथे तलाव आहे. ते गोंदवती तीर्थ म्हणून नोंदलेले आहे हृया ठिकाणी सध्या मायावती देवीचे मदिर आहे चुळणे येथे एक तलाव आहे; तेथे सुलभा देवीचे मदिर होते, शिवाय एक भैरवनाथाचे देवालय होते. खादिरकुड म्हणून नोंद असलेले तीर्थ अचोळे ग्रामपचायत हृद्दीत गावराई पाडा येथे आहे. येथे लोमहर्षण ऋषींचे वास्तव्य होते अशी नोंद आहे. अचोळे हृद्दीतच नागकुंड म्हणून नोंदलेला तलाव आहे व त्याच नावाने प्रसिद्ध आहे कुड आता बुजत आले आहे. उन्हाळयात कोरडे पडते हृयाच हृद्दीत सउर्ली नावाचे तळे आहे, तेही बुजत आले आहे त्याचे जवळच एक विहिर आहे, त्याला तेथील लोक कोकणदिवा कुड म्हणतात रानगाव येथे एक तलाव आहे त्याला लोक नवतीर्थ म्हणतात परंतु पुराण नोंदीप्रमाणे ते पिंडारक तीर्थ आहे शीळा-तीर्थ उर्फ रभातीर्थ हे तुगार पर्वतावर आहे तसेच जखेश्वरी कुड, केतडीकुड

हेही तुगारवरच आहेत. भाइदर व वसई खाडी ह्यामध्ये पाणजू नावाचे गाव आहे तेथे एक तलाव व मदिर आहे हा तलाव म्हणजे तीर्थ नामावळींत नोंदलेले पाडूनदी तीर्थ असावे उमेळे येथे साखई देवीचे मदिर आहे व एक तलाव आहे जूचद्र येथे चडिका देवीचे मदिर आहे. चडिकातीर्थं तेथेच असावे

ही सर्व तीर्थे उत्तर हिंदुस्तानात असलेल्या तीर्थांपेक्षा निराळ्या नावांची आहेत म्हणजे त्या तीर्थांची नक्कल म्हणून ही नावे दिलेली नाहीत, हे स्पष्ट होते. ही सर्व नावे येथील घटना, वैशिष्ट्ये ह्यांची द्योतक आहेत

या बहुतेक तीर्थांचे जवळ मदिरे आहेत किंवा मदिराचे अवशेष तरी आढळतातच त्या बहुतेक अवशेषात शिवलिंग, नदी हे प्रामुख्याने आढळतात सामान्यत शिव मंदिराजवळ तलाव असण्याची प्रथा आहे किंवा तलावाजवळ शिवमदिरे असतात वरील सर्व तीर्थांकाठी असलेल्या मदिरात शिवमदिराची सख्या मोठी आहे काही ठिकाणची शिवमंदिरे वगैरे पोर्तुगीज आक्रमकांनी मोडून फोडून त्याचे अवशेष सुद्धा किल्ला व गढचांना वापरले व गावेच्या गावे बाटवून ख्रिस्ती केली हा इतिहास आहे चुळणे, गास, आगटन, सांडोर, वासळी अशी काही गावाची नावे नमुन्यादाखल सागता येतील. ह्याच भागात अनेक शिलाशिल्पे, मूर्ती, शिवलिंगे, तळ्यात फेकून दिलेली उपलब्ध झाली आहेत अजूनही उपलब्ध होत आहेत कित्येक मूर्ती खाडीतही सापडल्या आहेत भगलेल्या मूर्ती जागोजागी लोकांनी श्रद्धेने जपून मदिरांच्या आवारात ठेवून दिल्या आहेत चक्रेश्वर मदिराजवळ एक ब्रह्मदेवाची ७॥ फूट उचीची प्रचड मूर्ती ठेवलेली आहे ही गास खेड्यातील एका शेतात मिळाली तेथेच ब्रह्मटेकडी आहे ब्रह्मकुड आहे म्हणजे ब्रह्मदेवाचे मदिरही तेथेच पूर्वी असले पाहिजे असे अनुमान काढले तर ते चूक होणार नाही. अचोळे खेड्यात पूर्वी महाकालेश्वर नावाचे शिवमदिर होते आज तेथे त्याच चौथऱ्यावर मदिराचे शिल्पयुक्त दगड वापरून एक विठ्ठलमदिर उभे केलेले आहे शिवलिंग कुठे तरी गायब झाले असावे

चुळणे गावी एक देवीचे मंदिर होते नाव सुलभा देवी त्या मदिराच्या पायऱ्या आता पाच वर्षांपूर्वीपर्यंत अस्तित्वात होत्या आज सपाट जागा झालेली आहे तेथेच काळभैरवाचे मदिर होते आज त्याचे अस्तित्व नाही गॅझेटीअरच्या इतिहास सशोधकानी तर स्पष्ट लिहून ठेवले आहे, की तुगार पर्वत व भोवतालच्या भागांत जेवढे तलाव व कुडे आहेत तेवढीच शिवमदिरेही आहेत. पेशव्यांनी वसई प्रात जिंकल्यावर जेवढी मदिरे पुन्हा बाधून काढणे शक्य झाले, तेवढी बांधून काढली जीर्णोद्धार केला काही ठिकाणी मारुतीची स्थापना केली मारुती मदिरे महाराष्ट्रात रामदास काळात प्रचलित झाली जेवढी मारुतीची मदिरे स्वतंत्रतेने स्थापन झालेली दिसतात, ती पेशवे काळातील असून मूळ मदिरातील मूर्ती नष्ट

झाल्यामुळे व जीर्णोद्धारास अवधी नसल्यामुळे मारुती स्थापून मोकळे झाले असले पाहिजेत असे स्पष्ट दिसते उदा रानगाव येथील मोठे मारुतीचे मदिर देवतलाव-जवळचे मोठे मारुती मदिर, गिरीज येथील मारुती मदिर वगैरे. ह्या सर्व मदिरा-जवळील तलावांत प्राचीन मदिरांचे काही अवशेष, शिवलिंगे, देवीच्या मूर्ती मिळालेल्या आहेत त्यावरून तेथे पूर्वी शिवमदिरे अनेक मूर्ती शिल्पांनी युक्त असलीच पाहिजेत हा सहज पटण्यासारखा तर्क आहे रानगाव मदिराजवळच्या तलावात अष्टभुजा देवीची ६ फुटी मूर्ती मिळाली असून ती मराठी शाळेसमोर झाडाला टेकून ठेवलेली आहे लोक त्या देवीचा उत्सव करू लागले आहेत मारुती मदिराबाहेर दोन हत्तीनी सोंडेने कमान केलेल्या पोकळीत लक्ष्मी बसलेली आहे, अशी मूर्ती ठेवलेली आहे ही उत्कृष्ट शिल्पे तेथील एखाद्या मदिराचीच असली पाहिजेत, यात शका नाही

विमल तलावासमोरील सुरेश्वर मदिराचे प्रांगणात दोन शिल्पे सतीचे समाधीला टेकून ऊनपावसात पडलेली आहेत एक देवीचे शिल्प आहे व एक ब्रह्मदेवाचे आहे. ब्रह्मदेवाचे शिल्प एकामुखाने भगलेले आहे, पाय वगैरे मोडलेले आहेत; तरीही ते शिल्प ६ फुटांपेक्षा कमी उचीचे नसावे हे एकूण आकारमानावरुन ठरवता येते देवी बहुधा रेणुका असावी तेही शिल्प तेवढेच आहे बहुधा ही शिल्पे विमल तलावामध्ये मध्यावर परशुरामाने जे विमलेश्वर मदिर बाधले होते त्यातील असावे कारण विमलेश्वर मदिराचे वर्णन निर्मळ माहात्म्यांत दिले आहे की एका दिशेला ब्रह्मदेव, एका दिशेला इद्र, एका दिशेला वरुण व एका दिशेला कुबेर अशी त्याने शिवमंदिरात स्थापना केली होती आज विमल तलावाचे मध्यभागी मदिरच नाही, फक्त एका उचवटयावर कोणी तरी पादुका ठेवलेल्या आहेत. परतु ब्रह्मदेवाची मूर्ती जवळच पडलेली आहे ती त्याच मदिरातली असावी हे समजण्यास हरकत नाही! सोपारे येथील चक्रेश्वर मदिरात मारुतीचे मदिराचे मागील ओटयावर एक शिवपार्वतीची सुमारे २॥ फूट उचीची मूर्ती, हत्तीचे सोंडेच्या कमानीमधील लक्ष्मी, एक ढेरपोटया वाद्य-वादक, एका मदिराची दरवाजाची वरची पट्टी दीड फूट रुद सहा फूट लांब शकरपाळेवजा भौमितीक शिल्पयुक्त असून मध्यभागी सात घोडयाच्या रथात बसलेला सूर्यनारायण कोरलेला आहे ह्या मूर्ती थोडयाफार भंगलेल्या आहेत परतु हे शिल्पावशेष प्रचड मदिराचे असावेत बाजूचे अगणात एक भव्य शिवलिंग असून जमीनीत पुरलेले आहे लिंगाचा व्यास निदान १। फूट असावा व समोर एक नदीही ठेवलेला आहे ह्याही मूर्ती कोठल्या तरी शिवमदिरातील आणून ठेवलेल्या आहेत चक्रेश्वर मदिरात सुमारे पाच फूट उचीची एक मीनाक्षी देवीची मूर्ती अत्यत सुदर कोरलेली असून तिच्या हातात एक पोपट आहे पोपटाशी बोलण्याच्या मुद्रेत मीनाक्षीचे मुख आहे व भाव एवढे बोलके आहेत, की ही शिल्पे खरोखर सजीवच वाटतात.

विष्णूची एक सुंदर कोरीव मूर्ती सुमारे पांच फूट उंचीची आहे व शेजारीच धनुर्धारी मुकुटयुक्त परशुराम मूर्ती आहे त्याची उंची ५॥ फूट आहे पायथ्याशी एकूण तीन शिवलिंगे आहेत ह्या सर्व असंख्य अवशेषावरून, तलावावरून, त्यांचे प्राचीन नावावरुन हा सर्व विभाग मंदिरांची नगरी, देवनगरी होती हे सिद्ध करीत नाही काय ? मुसलमान व पोर्तुगीझ मूर्तीभंजकांनी ह्या देवनगरीचा नाश केला असला तरी देवनगरीच्या निशाण्या संपूर्ण नष्ट होण्याआधीच परशुरामकृपेने त्याचाच विध्वंस झाला व देवनगरीचे रक्षण झाले.

ह्या भागात असणाऱ्या टेकड्यांची पाहणी केली तरीदेखिल देवनगरीचा इतिहास व प्राचीन संस्कृती बोलकी होऊन उभी राहिल्याशिवाय राहात नाही गास गांवात ब्रह्मटेकडी आहे टेकडीचे हे प्राचीन नाव सांपडलेली ब्रह्मदेवाची प्रचंड मूर्ती, जवळचा ब्रह्मतलाव हे तर प्राचीन वैदिक ऋषीमुनीच नव्हे, बुद्ध, सन्यासी; तापसीचे निवासस्थान होते हे शिलालेखानीच सिद्ध केले आहे नील टेकडी व त्यावरील नीलेंद्र कुंड ही नांवे ही प्राचीन संस्कृतीची द्योतक असून हजारो वर्षांपासून आजतागायत चालत आलेली आहेत नालासोपारा स्टेशनचे पूर्व बाजूला एक राक्षी नावाचा डोंगर आहे राक्षी हा शब्द कोठल्या राक्षसाचा वाचक नसून परशुरामाने केलेल्या किंवा इतर कोणी ऋषीमुनींनी केलेल्या यज्ञाचे प्रतीक आहे. एवढेच नव्हे तेथे यज्ञ-रक्षा सापडते म्हणून त्याला राक्षी डोंगर नाव पडले आहे व ते सार्थ आहे ह्या डोंगराला आणखी एक नाव आहे ते म्हणजे तुलिनी डोंगर ह्यावर एक तीर्थ आहे त्याचे नांव तुळातीर्थ ह्या तीर्थाचे नावावरून ह्या डोंगराला तुलिनी डोंगर म्हणतात तुळा म्हणजे सुवर्णतुला–दान-कोणीतरी, बहुधा परशुरामच किंवा अन्य राजाने या ठिकाणी स्वतःचे वजनाचे भारंभार सुवर्णदान केले म्हणून तुलिनी डोंगर व ज्या तीर्थावर ही सुवर्णतुला केली ते तुलातीर्थ

अशीच अनेक नावे फार अर्थवाहक आहेत उदा. द्रोणतीर्थ, कर्णतीर्थ, उतळेश्वर तीर्थ, सूर्यकुंड, वगैरे परंतु आज मुसलमान व पोर्तुगीझ ह्यांच्या जुलूम व धर्मांतराने व हिंदु समाजाच्या औदासिन्याने बऱ्याच गोष्टी विस्मृतप्राय झाल्या आहेत तरी ही सर्व पौराणिक नावे, हजारो वर्षे चालत आलेली असून हा इतिहास सांगतात की, हे एक स्वर्गतुल्य, समृद्ध, धर्मक्षेत्र, पुण्यपावन व पवित्र धर्मक्षेत्र होते अनेक ऋषीमुनी, तापसी, देव इत्यादींनी वास केलेली पवित्र भूमी देवनगरी होती- ' सुरपूर ' होते व पुढे मूर्तीकला निर्माण झाल्यावर ही स्मृती प्रचंड, भव्य, सुंदर शिल्पयुक्त मंदिरे निर्माण करून ह्या भागातील राजकर्त्यांनी मूर्तीभंजकांचे आक्रमण होईपर्यंत तिचे रक्षण केले ह्या वस्तुनिष्ठ पुराव्यावरून व असिरिआंतील शिलापट्टीकेवरील ' सुरपक्क ' म्हणजे देवनगरी ह्यावरून ह्या भागाचे अत्यंत प्राचीन नाव शूर्पारक नसून ' सुरपूर ' होते हे निर्विवाद सिद्ध व्हावे

ह्या पुण्यपावन देवभूमीची माहिती जनमानसात आज राहिलेली नाही निर्मळ कोठे आहे ? माहित नाही काय आहे माहित नाही सुरपूर-शूर्पारक-सोपारे ? कुणास ठाऊक ? वेस्टर्न रेल्वेवर वसईचे पुढे नाला सोपारा नावाचे स्टेशन आहे, असे म्हणतात एवढीच माहिती ठाणे जिल्ह्यातील सामान्य माणसाला आहे मग साऱ्या भारतातील जनतेला ह्याचे ज्ञान तें काय असणार ? पवित्र तीर्थक्षेत्र म्हणजे फक्त काशी, प्रयाग हे जगप्रसिद्ध परंतु त्याहून जळाने श्रेष्ठ अशा तीर्थांची माहिती आजच्या भारताला नाही. इ स. पूर्व ५००० ते इ स. १४०० पर्यंत सुमारे सहा हजार चारशे वर्षेपर्यंत विश्वाच्या इतिहासात पुण्यपावन धर्मक्षेत्र, पवित्र तीर्थ, समृद्ध राजधानी म्हणून गाजत राहिलेल्या ह्या निर्मळ-सुरपूर पवित्र देवनगरीचे नावही भारतीयांना माहित असू नये हा दैवदुर्विलास आहे. म्हणून ह्या फिरलेल्या कालचक्राला गती देऊन परत उर्जितावस्था आणणे जरूर आहे. त्या प्रयत्नांतील हा एक वाळूचा कण

卐 卐 卐

# २. सुरपूर ( शूर्पारक ) संबंधी ऐतिहासिक संदर्भ व माहितीविशेष

(१) **स्कंद पुराण** ह्या पुराणात सांगितले आहे की हे ठिकाण अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र असून येथे जो व्रत, तप करतो व पापापासून अलिप्त राहतो त्यास सप्तकोटी फळ मिळते हे ठिकाण पापी लोकांकरिता नसून केवळ पवित्र व तापसी पुण्यात्मे ह्यांचेकरिताच आहे

(२) **त्र्यंबकेश्वरमाहात्म्य** ह्यांत म्हटले आहे की, स्वर्गीय सुख मिळवण्यासाठी निर्मळ हे उत्कृष्ट तीर्थ आहे

(३) **महाभारत** धौम्य ऋषी, लोमहर्षण ऋषी, पांच पांडव वगैरे थोर व्यक्तींनी तीर्थयात्रेसाठी ह्या क्षेत्राला भेट दिली होती या ग्रंथात म्हटले आहे की, जो रामतीर्थांत स्नान करील त्याला अपार सुवर्णप्राप्ती होईल. जो एक पंधरवडा सुरपूरच्या पवित्र पाण्यात स्नान करतो तो राजपुत्र होतो.

(४) **रामायण** (IV 47/526) आता आपण शूर्पारक, प्रभास वगैरे ठिकाणी पश्चिमेला जाऊ असा उल्लेख आहे

(५) **बदरी केदार-माहात्म्य** सर्व तीर्थांत अत्यंत श्रेष्ठ निर्मळ हे क्षेत्र आहे

(६) **भविष्य पुराण** वैतरण्यां सिंधूसंगमे कल्क्यावतारः ।

कल्की अवतार वैतरणा-सिंधू संगमक्षेत्री होणार आहे.

(७) **हरिवंश** . सुरपूर ह्या देवनगरीची लांबी ३००० फूट व रुंदी १५०० फूट आहे असे वर्णन केलेले आहे. हे ठिकाण पश्चिम किनाऱ्यावरील असून परशुरामाने समुद्राकडून कोंकण जिंकून घेतला तेव्हा ह्या नगरीची स्थापना केली अशी त्यात नोंद आहे.

(८) **सुपारगजातक** : ह्या नावाचे पुस्तक पाली भाषेत प्रसिद्ध असून त्यात बुद्धाच्या पूर्व जन्मांपैकी एका जन्माचे ठिकाण म्हणून नोंद केलेली आहे

(९) सिलोन विजेता लाटराजकुमार ' विजय ' ह्याने सिलोन विजयास जाताना ह्या स्थानाला भेट दिली होती. ही भेट इ स पूर्व ५४० च्या सुमारास दिली व आज ह्या घटनेला २५२० वर्षे होऊन गेली

(१०) जैन धर्मियानी आपल्या पौराणिक वाङ्मयात सुरपूर (सोपारा) ह्या नगराचा पुष्कळ उल्लेख केलेला आहे. सुरपूरचा राजा महासेन ह्याची कन्या तिलकसुंदरी हिचा विवाह पौराणिक जैन राजा श्रीपाल ह्याजबरोबर झालेला होता ही घटना बुद्ध कालापूर्वीची आहे म्हणजे इ स पूर्व ५०० च्याही

पूर्वीची आहे. म्हणजे ह्या घटनेला आज २५०० वर्षापेक्षा अधिक काल होऊन गेलेला आहे. (श्रीपालचरित्र प्रकरण २ रे)

(११) प्रसिद्ध जैन साधू व लेखक जिन प्रभ सुरी ह्या 'सुरपूर' नगराचा जैनांच्या ८४ पवित्र तीर्थस्थानांपैकी एक म्हणून निर्देश करतो, व म्हणतो की त्याचे स्वत चे काळी पहिला तीर्थंकर 'ऋषभदेव' ह्याचे येथे एक मदिर होते

(१२) जैनाच्या ८४ गाछच्छापैकी (तीर्थस्थाने) एकाचे नाव सोपारा (सूरपूर) असे होते, असे भागवत पुराणात म्हटले आहे

(१३) यादव कोष : ह्या नावाच्या सस्कृत कोषात म्हटले आहे की अपरान्तातील सोपारा (सुरपूर) हे प्रमुख स्थान आहे

(१४) अशोकाचा ८ वा शिलालेख सोपारा (सुरपूर) येथील उत्खननात सापडला त्यात म्हटले आहे की, इ स पूर्व २५० ह्या काळी सोपारा (सुरपूर) ही अपरान्ताची राजधानी होती. तसेच अशोकाचा धर्मप्रचारक 'यवनधर्मरक्षित' येथे येऊन प्रचारकार्य करीत असे

(१५) गुजराथी कथा : ह्या कथेप्रमाणे इ स पूर्व ५६ साली आपला संवत् चालू करणारा उज्जैनचा राजा विक्रम ह्याला न्यायदानासाठी पाच जादूच्या कांड्या सोपारा (सुरपूर) येथेच मिळाल्या होत्या

(१६) नासिक (गोवर्धन) येथील पाडव लेण्यातील गुफेत इ स. पहिले शतकात कोरलेल्या शिलालेखात म्हटले आहे की, क्षत्रप राजा नहपानाचा जावई उषावदत्त ह्याने सोपारा (सुरपूर) येथे विहीर व अन्नछत्र बाधले तेथील ब्रह्म-टेकडीवर राहणाऱ्या सन्याशांसाठी नारगोळ खेड्यातील ३२००० नारळाची झाडे दान म्हणून दिली ह्याच लेखात रामतीर्थ (परशुराम कुड) ह्याचा उल्लेख असून तेथे राहणाऱ्या चरकानुयायी बौद्ध भिक्षूचा त्याच दानात समावेश केला आहे हे रामतीर्थ म्हणजे परशुराम कुड होय.

(१७) सोपारा (सुरपूर) येथील श्रीमान व्यापारी वर्गाने, कान्हेरी गोवर्धन येथील पांडव लेणी, कोंडाणा, कार्ले येथील लेणी वगैरे महाराष्ट्रातील असख्य लेण्यात दाने देऊन सुरपूरची व स्वत ची कीर्ती शिलालेखातून नोंदवून ठेवली आहे.

(१८) एप्रिल १८८२ च्या सुमारास इतिहासमहर्षी कै पडित भगवानलाल इंद्र ह्यानी व त्याचे काही ब्रिटिश सहकारी सशोधक ह्यानी सुरपूर ह्या ठिकाणी उत्खनन केले, तेव्हा बुरुड राजाचा कोट व राजवाडा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाड्यात एक बौद्धिक स्तूप आढळला त्याचे उत्खननात जे बुद्धावशेष सापडले त्यांत काही सुवर्णालकार, काही सुवर्णनाणी सापडली ते वाचल्यावर दिसून आले की इ. स १६० च्या मध्यावर गौतमीपुत्र यशश्री सातकर्णी (सातवाहन) हा

कोकणचा राजा होता सुरपूर (सोपारा) हे त्या वेळी बुद्धाचे धार्मिक क्षेत्र होते. तसेच त्यावेळी येथे उत्कृष्ट तावट, गवडी व सुवर्णकार राहात होते.

(१९) प्रसिद्ध ग्रीक राजा सालोमन याची जहाजे तांबड्या समुद्रातून ह्या बंदरात येत असत व परत जात. त्यांना येण्याजाण्यासाठी सुमारे दोन वर्षांचा काळ लागे ह्या बदरातून ती जहाजे आपल्या देशाला सोने. मूल्यवान रत्ने, चंदन, हस्तीदंत, मोर व माकडे घेऊन जात असत.

(२०) Egypt under the Pharahos—इजिप्तमधील प्रसिद्ध पिरॅमिडचे जनक फेरोह राजे ह्याची कारकीर्द ह्या पुस्तकात म्हटले आहे की सुरपूर (सोपारे) ह्या भारतीय बदरातून सोने हीच मुख्य निर्यात असे

(२१) अनेक उतान्यावरून दिसून येते की हिंदुस्तान सी सुवर्णानें समृद्ध भूमी होती. मरुतांचे जिने सोन्याचे केलेले असत (ऋग्वेद) घोड्याना सुवर्णाची आभूषणे असत त्याच्या नाला सोन्याच्या असत येथे सुवर्णाची नाणी चलनात होती व अलंकारही सुवर्णाचे असत

(२२) रामायणात वर्णन केले आहे की रावणाच्या वाड्याला सोन्याचे जिने, दरवाजे, कमानी सोन्याच्या होत्या आसने सोन्याची होती खिडक्यांना सुवर्णाच्या जाळ्या होत्या सुवर्णांच्या घंटा, सुवर्णाची पात्रें, ताटे, वाट्या, वगैरे भांडी असत.

(२३) हिरोडोट्स् ह्या इतिहास लेखकाने लिहून ठेवले आहे की, हिंदुस्तानातून अरब प्रवाशामार्फत ग्रीसमध्ये आयात केली जात असे इराणचा राजा दारिअस्ने हिंदुस्तानातून एवढे सुवर्ण नेले की स्वतःच्या राज्यात त्याने सुवर्णाची नाणी चालू केली. ही घटना इ स पूर्व ५१५ ते ५०९ ह्या काळातील आहे म्हणजे आज ह्या घटनेला २५०० वर्षे होतात

(२४) मेघास्थेनिसने लिहून ठेवले आहे की हिंदुस्तानात सुवर्णाचा फार मोठा साठा आहे येथून सोने स्वस्तात परदेशी न्यावे

(२५) पेरीप्लस नांवाचा प्राचीन जलपर्यटक लिहितो की चादीच्या मोबदल्यात स्वस्त सुवर्ण भारतातून नेता येते

(२६) बौद्ध वाङमयात इ स ४ थ्या व ५ व्या शतकांत होऊन गेलेल्या सुरपूरच्या 'पूर्ण' नांवाच्या व्यापाऱ्याची कथा दिली आहे त्यात वर्णन केले आहे की सोपारा (सुरपूर) हे राजधानीचे शहर आहे. येथे काही लाख प्रजाजन राहतात. ह्या शहराला अठरा दरवाजे आहेत येथे एक बुद्ध मंदिर असून चंदनी लाकडाच्या कलाकुसरीने युक्त कमानीने सुशोभित आहे. उत्तर प्रदेशातील श्रावस्तीपासून सुरपूरपर्यंत साऱ्या हिंदुस्तानातून लमाणांचे तांडे माल परदेशी पाठवण्यासाठी आणीत असत सुमारे ५०० व्यापारी येथून परदेशाशी व्यापार करीत. ह्या जलपर्यटनात फार धोके असत म्हणून सुरक्षित परत येणे हा उत्सव

मानला जात असे दोन तीन जलपर्यटने केलेला व्यापारी म्हणजे फार मोठा नशीबवान व महत्वाचा मानला जात असे एक मजबूत व्यापारी संघटना व्यापाराचे नियत्रण करीत असे या भागातील बहुसख्य लोकाचा धर्म ब्राह्मणीधर्म होता, बौद्ध नव्हे

(२७) प्रसिद्ध मुसलमान इतिहासकार मसूदीने इ स. ९१५ मध्ये लिहून ठेवले आहे की सुरपूर (सोपारा) हे ठाणे व चौल ह्या किनारपट्टीवरील बदर असून तेथे लाट भाषा बोलली जाते

(२८) इ स ९५५ च्या सुमारास मुसलमान लेखक इब्न हौकल व अलूइष्टकी ह्यांनी सोपारा (सुरपूर) हे ठिकाण सजाण व कॅलने (कल्याण) ह्यामध्ये आहे असे लिहून ठेवले आहे

(२९) इ. स १०३० मध्ये अल्बेरूनी ह्या इतिहासकाराने लिहून ठेवले आहे की सुरपूर हे शहर सजाणपासून दक्षिणेला ४० मैलांवर व ठाणे शहरापासून उत्तरेला ४० मैलावर आहे

(३०) इ स १०६४ मध्ये शिलाहार राजे ह्या भागात राज्य करीत होते त्यांच्या एका दानपत्रात सुरपूर हे बदर आहे असा उल्लेख आला आहे

(३१) ११३५ ते ११४५ ह्या काळात शिलाहार राजाने (अपरादित्य ह्याने,) सोपारा (सुरपूर) येथील तेजकठ नांवाच्या विद्वान ब्राह्मणाला काश्मीर येथे भरलेल्या सस्कृत धर्मवाङ्मयाच्या धर्मपरिषदेसाठी आपला प्रतिनिधी म्हणून पाठवले होते त्यापूर्वी तेजकठाने तेथील विद्वान प्रख्यात पडितांचा वादविवादात पराभव केला होता म्हणून त्याची निवड केली होती धर्मपरिषदेतून आल्यावर त्याला इ स. ११३८ मध्ये कांही दान दिल्याचे दगडावर कोरलेले दानपत्र सापडले आहे

(३२) शिलाहार राजांची राजधानी पुरी नांवाची नगरी सागरकिनारी होती, एवढाच उल्लेख त्याचे बहुतेक लेखांत सापडतो त्यामुळे विद्वानाची मोठी दिशाभूल होऊन त्यांचे राज्यातील टोकाचे बदर दडाराजपुरी ही राजधानी असावी असे कांहीचे म्हणणे आहे. तर कांहींचे म्हणणे असे आहे की मुबईजवळील घारापुरी ही राजधानी असावी परतु आमचे मत असे झाले आहे की दडाराजपुरी हे राज्याचे एका टोकाचे ठिकाण आहे तर घारापुरी हेही दुसऱ्या टोकाला बेट-वजा आहे परतु नंतरच्या काळात शिलाहारांनी आपली राजधानी हलवून ठाणे येथे नेली असा उल्लेख आहे त्यावरून शिलाहाराची पूर्वीची राजधानी आमचे मते दडराजपुरीही नव्हे व घारापुरीही नव्हे, ती सुरपूरीच असावी कारण त्यांचे कारकीर्दीचे अगोदरचे कालापासून ठाण्याजवळच असलेली सागरी नगरी सुरपुरी हे फार प्राचीन काळापासून राजधानीचे ठिकाण व्यापारी बदर म्हणून प्रसिद्ध होते. ते बदर शिलाहारांचे ताब्यात होते ह्याचा उल्लेख साडोर (वसई)

येथील एका ज्योतिषाला दिलेल्या दानपत्रात नागपूर ठाण्यातील साडोर येथील ज्योतिषाला एक भाग दान दिल्याचा उल्लेख आहे. हे नागपूर ठाणे नायगांव असावे असे विद्वानांचे व गॅझेटिअर पडितांचे मत आहे म्हणजे सुरपुरी ही बदरी राजधानी त्याचेच ताब्यात होती, व तीच त्यांची प्रथमची राजधानी असावी नंतर त्यांनी ती जरा आतील बाजूस सुरक्षिततेच्या दृष्टीने व राज्यव्यवहाराचे दृष्टीने हलवली असावी. सुरपुरीपासून ठाणे येथे राजधानी हलवणे सोयीचे व सयुक्तीक वाटते तसेच राजधानी ह्या दृष्टीने सूरपूर (सोपारे) ही राजधानी म्हणून दडाराजपुरी किंवा घारापुरीपेक्षा अधिक अनुकूल योग्य अशी वाटते म्हणून आमचे असे मत आहे की शिलाहाराची पहिली राजधानी सुरपुरी (सोपारे) हीच असावी.

(३३) ११५३ मध्ये अलइद्रसी ह्या लेखकाने लिहून ठेवले आहे की सोपारे (सुरपूर) ही फार मोठी व्यापारी पेठ असून तेथील किनाऱ्यावर मोती काढण्याचा धंदा चालतो तसेच जवळच्या बारा बेटावर (बारदेश) नारळाची झाडे व कॉकटस नावाची सुदर फुलझाडे वाढतात

(३४) १४ व्या शतकाचे सुरवातीला ठाणे हे व्यापाराचे प्रमुख केंद्र झाले होते; परतु सोपाराचे (सुरपुर) महत्त्व कमी झाले नव्हते

(३५) सुरपूर (सोपारे) ही जगप्रसिद्ध फिनिशिअन व्यापाऱ्यांची प्रख्यात बाजारपेठ होती हिचा सीरियातील दमास्कस शहराशी व्यापार चालत असे बौद्ध काळी ह्याला शूर्पारक असे म्हणत त्यावेळी हा किनारा नारगोळपर्यंत प्रख्यात असे. असिरिआंतील उत्खनन केलेल्या एका वाड्याच्या तळघरात काही विटा सापडल्या आहेत. त्यांत सोपाऱ्याच्या प्रख्यातीची मजेदार हकीगत दिलेली आहे. त्या विटांवरील लेखात ह्या नगरीला 'सुरिपक्क' असे म्हटलेले असून त्याचा अर्थ देवाचे नगर असाही त्या लेखातच दिलेला आहे. ह्या विलक्षण हकीगताने, अर्थासहित लिहिलेल्या प्राचीन परदेशी पुराव्याने, ह्या नगरीचे प्राचीन नाव सुरपूर म्हणजे देवांचे नगर होते असा स्पष्ट निर्वाळा दिलेला आहे. त्यामुळे त्या भूमीवर असख्य देवळे असावीत हे देवळाचे नगर असले पाहिजे हे प्रख्यात धर्मक्षेत्र पवित्र तीर्थक्षेत्र असून अनेक देव-देवता, ऋषीमुनी, तापसी, योगी, सिद्ध ह्याचे वस्तीस्थान होते असे जे पुराणांनी म्हटले आहे, त्या वर्णनाला ह्या लेखाने सत्याचा आधार देऊन हे क्षेत्र धर्मक्षेत्र, पुण्यपावन तीर्थक्षेत्र, देवक्षेत्र होते हे निर्धारित केले आहे, तसेच ह्याचे नाव सुरपूर होते शूर्पारक नव्हे हेही सिद्ध केले आहे

(३६) कौरव-पांडवांचे भारतीय महायुद्ध हे इ. स. पूर्व ३१०० च्या सुमारास झाले असे लोकमान्य टिळक ह्यासारखे अनेक भारतीय इतिहासपडित

व पाश्चात्य संशोधकांनी ठरवले असून आता त्याला मान्यता प्राप्त झाली आहे म्हणजे आज घटकेपासून ह्याला सुमारे ५१०० वर्षे, पाच हजार शभर वर्षे झाली; ह्या काळी भगवान श्रीकृष्ण, धर्मराज पांडव, भीष्म पितामह होऊन गेले परशुराम काळ ह्या काळापूर्वी सुमारे २००० वर्षे होऊन गेला तरी देखील भीष्म, द्रोण, कर्ण हे परशुरामाला आपला धनुर्वेदगुरु मानीत होते ह्याचा अर्थ भगवान परशुरामांनी त्याना धनुर्वेद शिकवला असा अवास्तव जरी घेतला नाही, तरी भगवान परशुराम हा साऱ्या जगातील अद्वितीय योद्धा होता, नि स्वार्थी होता, सज्जनांचा त्राता होता, साक्षात् भगवान होता ही गोष्ट परशुराम काळापासून भारतीय युद्धकाळापर्यंत तरी सर्वमान्य होती भगवान् श्रीकृष्ण, पांडव, भीष्मपितामह, द्रोण, अर्जुन, कर्ण इत्यादी महान् युद्धधुरंधरांना, तत्कालीन महत्तम व्यक्तींना मान्य होती, क्षत्रियाना मान्य होती ह्यांत शंका नाही. म्हणूनच देवस्वरूप, त्र्यैलोक्य-विजयी, गरिबांचा, सज्जनांचा त्राता, भगवान परशुरामाने नवनिर्माण केलेल्या पावनतम पुण्यभूमी सुरपूर ह्या पवित्र क्षेत्राला भेट देऊन, तेथे स्नान दान करून, पावन होण्यात त्यांनी धन्यता मानली व आपला भगवान परशुरामांबद्दलचा आदर व श्रद्धाभाव प्रकट केला. त्यांच्या तीर्थयात्रांची हकीगत महाभारतात भगवान व्यासानी तर नोंदवलीच, परंतु इतर पुराणांनीही तपशीलवार नोंदवली आहे ह्यावरून भारतीय युद्धापूर्वी २००० + ३१०० वर्षे इ स पूर्व + इ स. १९७९ म्हणजे सात हजार एकवीस वर्षांचे हे प्राचीन नगर असून वाराणशीप्रयागपेक्षा श्रेष्ठ असे पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून निदान इ स १४०० पर्यंत तरी गाजत होते. ह्यात शंका नाही. एवढी ख्याती असलेले, दीर्घ इतिहास असलेले व दिव्यतीर्थ जगाच्या पाठीवर दुसरे कोणतेही असणे शक्य दिसत नाही

(३७) आर्यसूरी नावाच्या बौद्ध लेखकाने लिहिलेल्या जातक मालेत सुप्पारग जातक नावाची कथा लिहिली आहे सुप्पारग हे एका जहाजाच्या निर्यामकाचे नाव असून तो कुशल निर्यामक होता व त्याच्याच नावावरून ह्या बंदराला सुपारग (सोपारे) हे नांव पडले असे म्हटले आहे. अर्थात ही कल्पना चुकीची आहे हे सिद्ध केलेलेच आहे उलट सुरपूर ह्या नावावरूनच ह्या श्रेष्ठ जलपर्यटकाला नाव प्राप्त झाले असावे ह्यात शंका नाही

(३८) सोपारे (सुरपूर) ह्या बंदरात निर्यामकाला ' निर्यामक सूत्र ' शिकवण्याची व्यवस्था होती. सागरी प्रवासाबद्दल या ग्रंथात जितकी माहिती आली आहे तितकी दुसऱ्या कोणत्याही ग्रंथात एकत्र संग्रहित केलेली नाही

(३९) सुमारे ४००० वर्षे भारतीय व्यापारी जगतात, ह्या देवनगरी सुरपूरने सोन्याची शेती पिकवली व भारतात सुवर्णयुग निर्माण केले

(४०) सुरपूर (सोपारे) व तत्सम बदरे म्हणजे विदेशातील रागरग मजेने पाहता येणाऱ्या ह्या देशाची खिडक्या दारे होत ह्याच प्रवेशद्वारातून भारतीय व्यापारी परदेशी जात व परदेशी व्यापारी भारतात येऊन परस्पर देवाण घेवाणीचा क्रम चालू ठेवीत असत भारतातील माल बाहेर नेणारे व भारताबाहेरील माल भारतात आणणारे व्यापारी केवळ व्यापारी म्हणून चालणार नाही. तर ते एक प्रकारचे प्रचारक होते स्वत च्या फायद्याचे काम करीत असता ते सामाजिक दृष्टीकोन विशाल करून व भौगोलिक सीमा उल्लघून मानव समाजाच्या उन्नतीला हातभार लावीत होते व त्याचबरोबर भारतीय सस्कृतीची तेजस्वी सुवर्णकिरणे पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत दशदिशांत पसरवीत होते

(४१) अपरान्तात अविरुद्धपुर नावाचे एक नगर होते.

(४२) सुरपूरला वायुपुराणात सूर्पारक, मत्स्यपुराणात सुर्प्यारक, मार्कण्डेय पुराणात सूर्पारक, ब्रह्मपुराणात सूर्पारक, वामनपुराणात शूर्पारक, गरुड पुराणात स्त्रीराज्य, कूर्म, विष्णु पुराणात स्त्रीराज्य, महाभारतात शूर्पारक, व बौद्ध साहित्यांत राजधानी व प्रमुख बदर सूर्पारक असे म्हटले आहे

(४३) रघुवशाच्या मल्लीनाथ टीकेत अपरान्ताची राजधानी शूर्पारक होती, असे म्हटले आहे

(४४) कान्हेरी गुफा लेख क्रमांक २३ मध्ये म्हटले आहे की अपरान्त देशाचा राजा भोजक असून राणीचे नाव दामिला असे होते व ती कल्याणच्या राजाची मुलगी होती

(४५) बुरुड राजाचा कोटाचे ठिकाणाला वाकळ टेकाड असे नाव होते. पुढे त्याला बकुलस्तूप म्हणू लागले नतर त्याचे बुद्ध मदिरात रूपांतर झाले

(४६) बोलींज येथे देवहरा नावाचे तळे असून त्यामधून देवनागरी लिपीतील एक शिलालेख काढला गेला होता तो जोसेफ मॅन्युअल लोपेझ ह्या ख्रिस्ती व्यक्तीच्या घराच्या पायरीला लावला होता देवहरा तळ्यामध्ये अजूनही काही शिल्पे आहेत. बोलीज हे प्राचीन काळी मोठे नगर होते व तेथे अनेक सुदर मदिरे होती, परतु आज काही अवशेष दिसत नाहीत

(४७) सातिवली येथे गरम पाण्याची कुडे आहेत एका हिंदू देवळाचे अवशेष आहेत कोरीव कामाचे दगड आहेत. दोन भगलेले नदी आहेत दोन भंगलेली शिवलिंगे आहेत, यावरून येथे पूर्वी दोन सुदर शिवमदिरे होती व आज ती नष्ट झालेली आहेत

(४८) विरारजवळील जीवधनदेवीच्या मदिरापासून उत्तरेला १ मैलावर पाडव डोंगरी होती तेथे असलेल्या गुफेवरून तसे नाव पडले होते. परतु रेल्वे तयार करताना ती सर्व डोंगरी फोडून टाकण्यात आली

...२

व पाश्चात्य संशोधकानी ठरवले असून आता त्याला मान्यता प्राप्त झाली आहे म्हणजे आज घटकेपासून ह्याला सुमारे ५१०० वर्षे, पाच हजार शभर वर्षे झाली; ह्या काळी भगवान श्रीकृष्ण, धर्मराज पाडव, भीष्म पितामह होऊन गेले परशुराम काळ ह्या काळापूर्वी सुमारे २००० वर्षे होऊन गेला तरी देखील भीष्म, द्रोण, कर्ण हे परशुरामाला आपला धनुर्वेदगुरु मानीत होते. ह्याचा अर्थ भगवान परशुरामांनी त्यांना धनुर्वेद शिकवला असा अवास्तव जरी घेतला नाही, तरी भगवान परशुराम हा साऱ्या जगातील अद्वितीय योद्धा होता, निःस्वार्थी होता, सज्जनांचा त्राता होता, साक्षात् भगवान होता ही गोष्ट परशुराम काळापासून भारतीय युद्धकाळापर्यंत तरी सर्वमान्य होती भगवान् श्रीकृष्ण, पाडव, भीष्मपितामह, द्रोण, अर्जुन, कर्ण इत्यादी महान् युद्धधुरधराना, तत्कालीन महत्तम व्यक्तींना मान्य होती, क्षत्रियाना मान्य होती ह्यात शका नाही. म्हणूनच देवस्वरूप, त्र्यैलोक्यविजयी, गरिबाचा, सज्जनाचा त्राता, भगवान परशुरामाने नवनिर्माण केलेल्या पावनतम पुण्यभूमी सुरपूर ह्या पवित्र क्षेत्राला भेट देऊन, तेथे स्नान दान करून, पावन होण्यात त्यांनी धन्यता मानली व आपला भगवान परशुरामाबद्दलचा आदर व श्रद्धाभाव प्रकट केला. त्याच्या तीर्थयात्राची हकीगत महाभारतात भगवान व्यासांनी तर नोंदवलीच, परतु इतर पुराणांनीही तपशीलवार नोंदवली आहे ह्यावरून भारतीय युद्धापूर्वी २००० + ३१०० वर्षे इ स पूर्व + इ स. १९७९ म्हणजे सात हजार एकवीस वर्षांचे हे प्राचीन नगर असून वाराणशीप्रयागपेक्षा श्रेष्ठ असे पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून निदान इ. स. १४०० पर्यंत तरी गाजत होते. ह्यात शका नाही. एवढी ख्याती असलेले, दीर्घ इतिहास असलेले व दिव्यतीर्थ जगाच्या पाठीवर दुसरे कोणतेही असणे शक्य दिसत नाही

(३७) आर्यसूरी नावाच्या बौद्ध लेखकाने लिहिलेल्या जातक मालेत सुप्पारग जातक नावाची कथा लिहिली आहे सुप्पारग हे एका जहाजाच्या निर्यामकाचे नाव असून तो कुशल निर्यामक होता व त्याच्याच नावावरून ह्या बदराला सुपारग (सोपारे) हे नाव पडले असे म्हटले आहे अर्थात ही कल्पना चुकीची आहे हे सिद्ध केलेलेच आहे उलट सुरपूर ह्या नावावरूनच ह्या श्रेष्ठ जलपर्यटकाला नाव प्राप्त झाले असावे ह्यात शका नाही

(३८) सोपारे (सुरपूर) ह्या बदरात निर्यामकाला 'निर्यामक सूत्र' शिकवण्याची व्यवस्था होती. सागरी प्रवासाबद्दल या ग्रथात जितकी माहिती आली आहे तितकी दुसऱ्या कोणत्याही ग्रथात एकत्र सग्रहित केलेली नाही.

(३९) सुमारे ४००० वर्षे भारतीय व्यापारी जगतात, ह्या देवनगरी सुरपूरने सोन्याची शेती पिकवली व भारतात सुवर्णयुग निर्माण केले

(४०) सुरपूर (सोपारे) व तत्सम बदरे म्हणजे विदेशातील रागरग मजेने पाहता येणाऱ्या ह्या देशाची खिडक्या दारे होत ह्याच प्रवेशद्वारातून भारतीय व्यापारी परदेशी जात व परदेशी व्यापारी भारतात येऊन परस्पर देवाण घेवा-णीचा क्रम चालू ठेवीत असत भारतातील माल बाहेर नेणारे व भारताबाहेरील माल भारतात आणणारे व्यापारी केवळ व्यापारी म्हणून चालणार नाही. तर ते एक प्रकारचे प्रचारक होते स्वतःच्या फायद्याचे काम करीत असता ते सामाजिक दृष्टीकोन विशाल करून व भौगोलिक सीमा उल्लघून मानव समाजाच्या उन्नतीला हातभार लावीत होते व त्याचबरोबर भारतीय संस्कृतीची तेजस्वी सुवर्णकिरणे पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत दशदिशात पसरवीत होते

(४१) अपरान्तात अविरुद्धपूर नावाचे एक नगर होते

(४२) सुरपूरला वायुपुराणात सूर्पारक, मत्स्यपुराणात सूर्प्यारक, मार्कण्डेय पुराणात सूर्पारक, ब्रह्मपुराणात सूर्पारक, वामनपुराणात शूर्पारक, गरुड पुराणात स्त्रीराज्य, कूर्म, विष्णु पुराणात स्त्रीराज्य, महाभारतात शूर्पारक, व बौद्ध साहित्यात राजधानी व प्रमुख बदर सूर्पारक असे म्हटले आहे

(४३) रघुवशाच्या मल्लीनाथ टीकेत अपरान्ताची राजधानी शूर्पारक होती, असे म्हटले आहे

(४४) कान्हेरी गुफा लेख क्रमाक २३ मध्ये म्हटले आहे की अपरान्त देशाचा राजा भोजक असून राणीचे नाव दामिला असे होते व ती कल्याणच्या राजाची मुलगी होती

(४५) बुरुड राजाचा कोटाचे ठिकाणाला वाकळ टेकाड असे नाव होते. पुढे त्याला बकुलस्तूप म्हणू लागले नतर त्याचे बुद्ध मदिरात रूपांतर झाले

(४६) बोलींज येथे देवहुरा नावाचे तळे असून त्यामधून देवनागरी लिपी-तील एक शिलालेख काढला गेला होता तो जोसेफ मॅन्युअल लोपेझ ह्या ख्रिस्ती व्यक्तीच्या घराच्या पायरीला लावला होता देवहुरा तळ्यामध्ये अजूनही काही शिल्पे आहेत बोलींज हे प्राचीन काळी मोठे नगर होते व तेथे अनेक सुदर मंदिरे होती, परतु आज काही अवशेष दिसत नाहीत

(४७) सातिवली येथे गरम पाण्याची कुंडे आहेत एका हिंदू देवळाचे अवशेष आहेत कोरीव कामाचे दगड आहेत दोन भगलेले नदी आहेत दोन भंगलेली शिवलिंगे आहेत यावरून येथे पूर्वी दोन सुदर शिवमंदिरे होती व आज ती नष्ट झालेली आहेत

(४८) विरारजवळील जीवधनदेवीच्या मदिरापासून उत्तरेला १ मैलावर पांडव डोंगरी होती तेथे असलेल्या गुफेवरून तसे नाव पडले होते. परंतु रेल्वे तयार करताना ती सर्व डोंगरी फोडून टाकण्यात आली

...२

(४९) जैन वाङ्मयात सुरपूरचा सोपारक, सोपारय, सोपर असा उल्लेख असून कोकण भागातील एक भव्य नगर असे लिहिले आहे ह्या ठिकाणी जैन गुरू वज्रसेन (इ स ६० ते ८०) ह्याने जीवदत्ताचे चार पुत्र, ह्यांना जैन धर्माची दीक्षा दिली हे चौघे चार कुळाचे प्रवर्तक झाले

(५०) प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ व ज्योतिषी वराहमिहिर (इ स ५००) ह्याने आपल्या ग्रथात हिरे प्रकरणात म्हटले आहे की सूर्पारक येथील हिरे काळसर झाकेचे असतात

(५१) उत्तन येथे केशीदेव, हरिपालदेव व अनंतदेव ह्या राजांचे प्रत्येकी एक असे एकूण तीन शिलालेख सापडले हे शिलाहार वशीय राजे होते

(५२) वाघोली येथे एक शिलालेख ३ फूट ८ इच × १ फूट १ इच X ७ इंच जाड असा सापडला होता. परतु सर्व मजकूर झिजून दुर्बोध झाला आहे त्यामुळे त्यातील मजकूर काहीही समजत नाही.

(५३) वसईच्या उत्तरेला ३ मैलांवर साडोर येथे एक लेख ३ फूट ४ इच X २ फूट ८ इच व १॥ इच जाड तेथील एका नळघ्यात सापडला होता लेख वीस ओळींचा असून जुन्या मराठीत आहे लेखाचे साल हिजरी सन ९६६ (इ स १५५८) ह्याच्या तिसऱ्या ओळीत म्हटले आहे, 'नायक लारोच्या वैभवशाली कारकीर्दीत पश्चिम समुद्राधिपती.' बाकीचा लेख स्वच्छ नसल्यामुळे वाचला येत नाही.

(५४) वरील तळ्याच्या जवळच रेलबाव नावाचे दुसरे तळे आहे तेथे (सांडोर) एक शिला ४ फूट ४ इंच लाब, १ फूट १ इच रुद व ८ इच जाड अशी सापडली. त्यावर वरच्या बाजूला मध्यभागी एक कलश, उजव्या बाजूस सूर्य व डाव्या बाजूस चद्र कोरलेले आहेत शिलालेख वीस ओळींचा आहे शेवटच्या चार ओळी झिजलेल्या आहेत व पुन्हा कोरलेल्या आहेत राजाचे नाव जेतुगी असे आहे ते पाचव्या ओळीत आहे त्याला रायपितामह म्हटलेले आहे व पदवी लावलेली आहे 'कोकण चक्रवर्ती' ह्यावरून हा शिलाहार राजा असावा. त्यावर बुधवार माघ वद्य १५ शके ११७७ (सन १२५५) असा काळ कोरलेला असून मत्र्याची नावे दिली आहेत उदयप्रभू, मायीनायक, दादाप्रभू व जसमिनायक हा लेख 'खेईदेव' नावाच्या ज्योतिषाला दिलेले दानपत्र आहे त्यामध्ये त्याला साडोर खेड्यातील नियायी बाग दान दिली आहे एका राजपथाचा उल्लेख आहे खेईदेव ज्योतिषाबद्दल आणखी काही सांगितले आहे. नागपूर ठाण्याचा उल्लेख आहे बहुधा हे नागपूर म्हणजे सध्याचे नायगांव असावे शेवटच्या ओळी वाचता येत नाहीत

(५५) वरील लेखापासून सुमारे १० यार्डावर एक भंगलेला नदी आहे. नदी-

पासून ९० यार्डावर एक कोरीव लेख आहे. ३ फूट २ इंच लांब व १ फूट ९ इंच रुंद व ७ इंच जाड त्यावरील अक्षरे झिजून गेली आहेत खाली गरदेगाळी आहे

(५६) शिलाहार नृपतीच्या दरबारी सोड्ढल नावाचा लाट देशातील एक कवी आला, त्याला राजाश्रय मिळाला, व कविप्रदीप ही पदवी मिळाली. त्या वेळी लाट देशचा राजा वत्सराज शिलाहार नृपती मुम्मुणीच्या दरबारी मित्र म्हणून आला होता त्याने सोड्ढलच्या श्लोकावर एक श्लोक म्हणून दाखवला त्याचा आशय सोड्ढलला लाक्षणिक वाटला व त्याने बाणभट्टासारखे एक सुंदर काव्य लिहिले ते घेऊन तो ठाण्याहून लाट देशाच्या राजाकडे जाण्यास निघाला वाटेत शूर्पारक येथे रात्री एका सरस्वतीच्या मंदिरात मुक्काम केला, तेथे रात्री दिव्यदेहधारी बाणभट्ट व तालक असे दोन पुरुष खांबातून प्रकट होऊन त्याला म्हणाले, " तुझे काव्य वाचून दाखव " तेव्हा त्या तिलकसुंदरी काव्याचे प्रथम वाचन त्या सरस्वती मंदिरात झाले. नंतर तो लाट देशाच्या राजाकडे गेला तेथे त्याची वत्सराजाने फार प्रशंसा केली हे दिव्य सरस्वती मंदिर शूर्पारक गावात लाट देशाला जाण्याच्या मार्गांत होते ते भगवान परशुरामाने स्थापिले होते असे सोड्ढलाने लिहून ठेवले आहे

(५७) शिलाहार नृपती छद्वैदेवाच्या सर्वात प्राचीन ताम्रपटात त्याने आपल्या वंशनामाची व्युत्पत्ती दिली आहे त्यात म्हटले आहे, परशुरामाच्या बाणाने त्रस्त झालेल्या पश्चिम समुद्राचे रक्षण सिलार नामक वीराने केले म्हणून त्याच्या वंशाला सिलार वंश नाव पडले

(५८) ब्रह्मांडपुराणात (३,५७, श्लोक ४७ मध्ये) परशुरामाच्या बाणाने उत्पन्न झालेल्या भीतीचे वर्णन आहे वरुणाने शेवटी परशुरामाला शरण येऊन शूर्पारक क्षेत्रातून समुद्रातून हटविले असे वर्णन आहे पण ह्या संदर्भात शिलार ह्या वीराचा उल्लेख नाही

(५९) शके ९४८ चा छित्त राजाचा एक प्रसिद्ध ताम्रपट भांडुप येथे सापडला. तो भांडुप ताम्रपट या नावाने प्रसिद्ध आहे त्यात छित्त राजाने वोडणिक भट्टाचे नोऊर (नवघर) गावातील शेत विकत घेऊन सामवेदी पराशर गोत्री नोडमैय्याचा पुत्र आमदेवैय ह्या ब्राह्मणाला षट्कर्म, पंचमहायज्ञ अनुष्ठान व कुटुंबपोषण ह्या-साठी दान दिले हे गाव षट्षष्ठी विषयात येते ह्या शेताच्या पूर्वेला गोवणि ग्राम सीमा, दक्षिणेस गोवली, पश्चिमेस राजमार्ग आणि उत्तरेस गोवणी ग्रामसीमा येते. डॉ बुल्हर ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे ह्या नोऊर गावाला सध्या नोवहर (नवघर) असे म्हणतात बहुधा वसई स्टेशन रोडचे गावाचे नाव नवघर असे आहे, तेच हे असावे.

(६०) सुरपूरचे इ ४९० च्या सुमाराचे नाव अनिरुद्धपूर असे होते व्याघ्र-सेन राजाचा इ स ४९० मधील एक ताम्रपट सुरत येथे सापडला. त्यामध्ये

ग्रं. सं.

म्हटले आहे की अपरान्ताची राजधानी अनिरुद्धपूर येथील त्रैकूटक राजा त्याचा (व्याघ्रसेनाचा) माडलीक आहे. (कॉर्पस्ट शन्स्कि. ४–१–२७.)

(६१) सेंद्रक राजा अल्लशक्ती ह्याच्या बगुम्रा ताम्रपटात ह्या नगरीचा (सुरपूर–शूर्पारक) निर्देश 'अविरुद्धपुरी' ह्या वैकल्पिक नावाने केला आहे

(६२) डॉ हुल्टस् ह्यांच्या मते 'अविरुद्धपूर' हे अपरान्ताची राजधानी शूर्पारक (सुरपूर) ह्याचे नामांतर असावे

(६३) प्राचीन स्थलकोश ले. डॉ सिद्धेश्वरशास्त्री चित्राव ह्यानी लिहिले आहे की 'अनन्तेश्वर' हे पश्चिम समुद्रकिनाऱ्यावरील रजतपीठ क्षेत्रातर्गत परशुरामद्वारा स्थापित शिवलिंग स्थान असून श्री मध्वाच्यार्यांनीही ह्या शिवलिंगाची उपासना केली होती हे शिवलिंग म्हणजे विमल तलावातील परशुरामस्थापित श्रीविमलेश्वर महादेव होय

(६४) श्री मध्वाचार्यांनी शृगेरी पीठाचे श्री शकराचार्य श्री विद्याशकर भारतींचा वादात पराभव केला त्या श्री विद्याशकर भारतींनी देखील ह्याच क्षेत्रात येऊन सध्या असलेल्या निर्मळ टेकडीवर विमलसरोवरासमोर समाधी घेतली. हा विलक्षण योगायोग आहे.

(६५) प्रथम अनन्तदेवाचा शके १०१६ चा ताम्रपट खारेपाटण येथील गृहस्थांच्या सग्रही मिळाला त्यात म्हटले आहे की, वलीपत्तन येथील दोन मोठे अधिकारी व व्यापारी 'महाप्रधान भाभणश्रेष्ठी' व त्याचा भाऊ 'महासान्धि-विग्रहिक' 'धणामश्रेष्ठी' यांची जहाजे स्थानक (ठाणे), नागपूर (नायगाव), शूर्पारक व चेमूल्य (चौल) ह्या बदरात जातील तेव्हा त्यांना व त्यांच्यावरील खलाशांना जाण्यायेण्यावर जकात द्यावी लागणार नाही वलीपत्तन म्हणजे आगाशी अर्नाळ्याजवळील बोलींज होय एके काळी हे मोठे व्यापारी शहर म्हणून प्रसिद्ध होते, तेथे अनेक मदिरे होती

(६६) रट्ट राजाचा ९३२ चा बलीपत्तन येथून दिलेला ताम्रपट सापडला आहे रट्ट राजाची ही बहुधा राजधानी असावी. ह्यात म्हटले आहे, नागमैय ब्राह्मणाचा पुत्र सकमैय ह्या सेनापतीला कल्वाल ह्या भक्तग्रामांतील वाड्गण क्षेत्र (म्हणजे उन्हाळी-पावसाळी पीक देणारे शेत) तसेच पलउरे (पेल्हार) ह्या अग्रहार गावाच्या पश्चिमेस असलेल्या आवडी–वाडीतील एक पोफळीची बाग दान दिली गावसीमा जवलरा व वलोठी गावे, तसेच पलउर गावाच्या पश्चिमेला आवडी-वाडी, त्याच्या पूर्वेला पाषाणदेवली, दक्षिणेला नदी व पश्चिमेला बोरीभाटाजवळ समुद्र, उत्तरेला गावोम अशा चतु:सीमा आहेत. वरील बलीबट्टन म्हणजे बोलीज हे गाव होय.

(६७) द्वितीय केशीदेवाचा शके ११२५ चा मांडवी येथे शिलालेख मिळाला आहे. लेखाच्या शिरोभागी कलश आहे खालचा लेख खराब झाला आहे ह्यामध्ये द्वितीय केशीदेवाने (शिलाहार) महामात्य लक्ष्मीधर याने प्रतिष्ठापना केलेल्या लक्ष्मीनारायण मदिराला काही दान व फळबाग दान दिली आहे हे दान सोमठाकूर ह्याने दिले होते त्याचा उपयोग देवाची पूजाअर्चा व नैवेद्यासाठी करावयाचा होता हा लेख माडवी येथे सापडला लक्ष्मीनारायण मदिर तेथलेच असावे.

(६८) हरिपालदेवाचा राजली–शिलालेख शके १०७०. हा लेख पश्चिम रेल्वेच्या नालासोपारा स्टेशनजवळ एका शेतात सापडला ह्या लेखात म्हटले आहे की शूर्पारक विषयातर्गत राजली गावातील एक फळबाग देवलनायकादी ग्रामवासीयाच्या समतीने विष्णू उपाध्याय ह्या ब्राह्मणास राजशासनाने दान दिली हा ब्राह्मण मूळचा माहर गावचा असून त्या वेळी शूर्पारकमध्ये राहात होता. ह्याच लेखात शेवटी बीसलदेवाने ह्याच ब्राह्मणाला शके १०५९ पिंगल सवत्सरी प्रथम अपरादित्याच्या कारकीर्दीत १० द्रम्माचे दान दिलेले होते असेही नोंदलेले आहे ह्यातील राजली गाव शूर्पारकच्या आग्नेयेस चार मैलावर आहे माहर हे त्यापुढे सात मैलावर समुद्रकिनारी आहे

(६९) हरिपालदेवाचा आगाशी शिलालेख शके १०७२ हा लेख आगाशी येथे सापडला सध्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे ह्या लेखात म्हटले आहे की, राजाचा महाप्रधान आहवमल्लदेव याने पाटील राजानक याच्या आनेवाडी गावचे उत्पन्न उत्तरायण सक्रांतीच्या पर्वणीप्रसंगी गोवर्धनभट्ट उपाध्यायाचा नातू, दिवाकरभट्ट उपाध्यायाचा पुत्र ब्रह्मदेवभट्ट उपाध्याय यास दान दिले. आहवमल्ल महाप्रधान हा शूर्पारक विषयातील वट्टार ह्या गावचा रहिवासी होता. ह्या गावच्या सभ्य गृहस्थांची नावे साक्षीदार म्हणून घातलेली आहेत त्यात महाप्रधान वासुदेव पडवल, महाप्रधान लक्ष्मण प्रभू, महाप्रधान पद्मशिव राऊल व प्रधान वासुगिनायक हे अधिकारी आहेत आहवमल्लाचे वट्टार हे गाव शूर्पारकचे ईशान्येस सहा मैलांवर व आगाशीचे नैर्ऋत्येस चार मैलांवर असलेले वाटार (सत्पाळे) हे होय आनेवाडी सध्या आढळत नाही.

(७०) द्वितीय अनतदेवाचा वसई शिललेख शके ११२० ही शिला वसई येथील जुन्या त्रिविक्रम मंदिरासमोर सांपडली होती शिरोभागी मध्ये कलश व दोन्ही बाजूला सूर्य-चद्र, शेवटी गाय व वासरू कोरलेले आहेत मध्ये लेख कोरला आहे. ह्या लेखात अनतदेवाने काही ब्राह्मणांना दान दिले असे लिहिले आहे. लेख खराब झाला असल्यामुळे दानाचे स्वरूप सागता येत नाही. त्यानतर तेथील महामात्य, त्याचा पुत्र आणि इतर लोकांनी बहुधा त्याच ब्राह्मणाला काही पैंढ्या दान दिल्याचा उल्लेख आहे ह्या लेखांत महामात्य नायक श्रीहिम प्रभू व वाहिम प्रभू या अधिकाऱ्यांचा उल्लेख आला आहे

(७१) प्रथम अपरादित्याचा चित्रा शिलालेख शके १०५९ ही शिला निश्चित कोठे सापडली ते माहीत नाही परंतु ती जोगेश्वरी येथील देवळाजवळ ठेवलेली असावी सध्या ही शिला पोर्तुगालमध्ये लिस्बन शहराजवळील चित्रा येथे पेन्हा व्हेर्डे (हिरवा खडक) येथे ठेवलेली आहे. पोर्तुगीझकाळात ही तिकडे गेली असावी, हा लेखात जोगेश्वरीच्या देवळाशी सलग्न अशा व्यक्तींना–उदा मठपती, पुजारी वगैरे ह्याना गृहकराची माफी करण्यात आली आहे त्यावेळी साष्टीतील दिवाकर नायक, विष्णूभट्टसेन व ठाकूर हे अधिकारी हजर होते राजाचा मुक्काम अणितपल्ल विपणातील देणक गावाबाहेरील शिबिरात होता सदर करमुक्त घरे ही श्रीपुरी (सुरपूर) गावातील होती, ही पुरी त्याचे राजधानीचे गाव होते कारण त्याला ह्याच लेखात श्री हे पद लावण्यात आले आहे

(७२) असिरिआमधील एका वाड्यातील तळघराचे उत्खननात काही कोरीव लेख असलेल्या विटा मिळाल्या त्या चिऱ्यावरील वाक्ये मोठी बोलकी असून भारताच्या प्राचीनतम इतिहासावर प्रकाश टाकणारी आहेत अगोदरच्या क्र ३५ वर ह्याचा उल्लेख केला आहे तो समग्र उताराच येथे दिला आहे ह्या चिऱ्यावरील वाक्यांचा सगतवार अर्थ लागणे कठीण आहे परंतु ती सर्वच वाक्ये बोधपूर्ण आहेत

(1) I will reveal the concealed story
(2) The city Surippak, God's city
(3) Ana, Bel, Ninip, Lord of Hades
(4) Surrapakite, son of Ubartutu
(5) Made a great ship for thee.
(6) Hea, my lord, I will perform it
(7) It was 14 Measures with roof and alters
(8) Pahizu, the piolot
(9) Silver, Gold, Seeds, and peasts.
(10) A flood, Shamas made.
(11) I entered the ship
(12) Buzzarderibi, the piolot
(13) Vul, thundered in the storm
(14) Nebo and Sarn went in front.
(15) The destroyer Nargol, overturned
(16) Ninip went in front, swept the earth

(17) The Gods feared the tempest and sought refuge
(18) Then ascended to the heaven of Anu.
(19) Ister spake etc
(१) मी आपणाला एक गुप्त रहस्य-गोष्ट सांगतो
(२) सुरीपक्क नगर, हे देवांचे नगर आहे.
(३) अॅना, बेल, निनिप, पितृलोकाधिपती
(४) सुर्पारिकाईट (सुपापक नगरवासी) उबरततू
(५) ह्याचा पुत्र ह्याने आपणासाठी एक मोठे जहाज बांधले
(६) महाराज त्याचे वर्णन करून सांगतो
(७) छप्पर, आसने—निवास ह्यासह ते १४ मापे लांब होते
(८) त्याचा वाटाड्या पनित्सु (पणी) होता
(९) त्यावर सोने, चांदी, धान्य व पशू होते
(१०) शमाने, (शकराने) मोठा पूर उत्पन्न केला
(११) मी जहाजात शिरलो
(१२) बझरस्तडेरेबी हा त्याचा वाटाड्या होता
(१३) व्हूल, वादळात देखील आवाज करीत निघाले
(१४) नेबो व सारू आघाडीवर गेले
(१५) नारगोळ ही विनाशिका उघडी झाली
(१६) निनिप आघाडीवर पुढे गेले व जमिनीला लागले
(१७) देव वादळाला घाबरले व त्यांनी जमिनीवर आश्रय घेतला
(१८) नतर अनूच्या स्वर्गाकडे चढून गेले
(१९) इस्टर म्हणाला की .

ह्या सर्व वाक्याचा पुष्कळसा अर्थ स्पष्ट आहे इस्टर ह्या व्यक्तीने बहुधा आपल्या धन्याला ह्या सर्व प्रसगावर दिलेले बातमीपत्र आहे हा जहाजांचा काफिला शूर्पारक (सुरपूर) येथून निघाला होता ही सर्व जहाजे शूर्पारक येथील उबरततूच्या मुलाने बांधली होती व ती इस्टरच्या धन्यासाठीच बांधली होती ही जहाजे पितृदेवता अना, बेल व निनिप ह्यांच्याकरिता बांधलेली होती म्हणजे ह्यापैकी एकाला किंवा तिघांना इस्टर वरील हकीगत सागत असला पाहिजे. ह्या जहाजांची भव्यता ह्यात वर्णन केली आहे ह्यात काय काय होते ते वर्णन केले आहे ह्या जहाजांचा वाटाड्या पणी (फिनिशिअन) होता पणी हे आर्य भारतात येण्यापूर्वीचे येथील समृद्ध व्यापारी दर्यावर्दी होते मोहजदारो-हराप्पा येथील समृद्ध सस्कृती ह्यांचीच होती ह्यांच्याच नगरांचा नाश इंद्राकडून आर्यांनी करवला, हे वेद सांगतातच. ह्या प्रसगात शकराने मोठे वादळ उत्पन्न केले, असे

हा इस्टर पितृदेवतांना सांगतो. तो स्वत ज्या जहाजात शिरला त्या जहाजाच्या वाटाड्या बुझर साडेरे बी होता ह्या वादळात जी जहाजे पुढे गेली त्यांची नावे सांगितली आहेत एकाचे नाव आहे व्हेल, दुसरे निनिप नावाचे पितृदेवतेचे नांव असलेले जहाज आहे. तिसरे नेबो नावाचे जहाज आहे चवथे शारू नांवाचे आहे ही जहाजे वादळातून वेगाने पुढे गेली निनिप हे पितृदेवतेचे जहाज पुढे जाऊन जमिनीला लागले त्यामध्ये देव होते, ते वादळाला घाबरले होते, म्हणून त्यांनी जमिनीवर आसरा घेतला व जमीनीच्या मार्गाने अनुच्या स्वर्गाकडे चढून गेले वरील पितृदेवतावाचक शब्द निनिप, अन, बेल हे द्रविडी भाषेतील आहेत निनिप म्हणजे नदीबैलवाचक शब्द आहे अन, बेल कमी अधिक अर्थाने तसेच नदीवाचक आहेत नदीला देवात स्थान देणारी संस्कृती पूर्वीची येथील पर्णींची द्राविडीयन संस्कृती होती. ते शंकराचे उपासक होते. शंकराचा दैवत म्हणून उल्लेख वरील लेखांत आलाच आहे. नारगोळ नावाचे एक जहाज होते त्याला त्यांनी विनाशिका म्हटले आहे म्हणून हे जहाज शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी नौ-सैनिक व तत्कालीन दीर्घगामी अस्त्रे यांनी युक्त असावे हे जहाज उपडे झाले असे इस्टर म्हणतो

वरील सर्व विवेचनावरुन हे स्पष्ट दिसते की शूर्पारक बंदरात अति प्राचीन म्हणजे वेदपूर्वकालापासून जहाजे बांधली जात असत येथे पितृदेवता वास करीत होत्या देवाचीही वस्ती होती. हे देव जहाजातून देवलोकापर्यंत म्हणजे स्वर्गापर्यंत जात असत वरील उताऱ्यांत म्हटले आहे की घाबरलेले देव जमीनीच्या मार्गाने अनूच्या स्वर्गात चढून गेले. हा अनु कोण, तर वेदकालीन राजा ययातीचा मुलगा हा शर्मिष्ठापुत्र, ह्याने आपले तारुण्य ययातीला दिले नाही म्हणून ह्याला ययातीने मुख्य राज्य दिले नाही; परंतु त्याचे जे छोटे राज्य तोच स्वर्ग हा त्या काळी बॅबिलोनियाचा राजा होता म्हणजे असिरिआतील बॅबिलोनिआ हा अनूचा स्वर्ग नारगोळ ही विनाशिका–सध्याचे उंबरगावजवळचे नारगोळ बौद्ध कालापासून प्रसिद्ध आहेच, परंतु ह्या लेखान्वये ते शूर्पारक एवढे प्राचीन नगर आहे, असे दिसते तसेच इस्टरने पितृदेवतांना एक गुप्त रहस्य सांगतो म्हणून वर्णन केले की शूर्पारक (सुरपूर) हे देवांचे नगर आहे शूर्पारकाची देवनगरी इतिहासाची व वेदपूर्व–प्राचीन सत्तेची ही साक्ष नाही काय? निदान ययाती कालापर्यंतचा हा पुरावा आहे

卐 卐 卐

# ३. श्रीनिर्मळेश्वर-श्रीविमलेश्वर महादेव

श्री निर्मळ हे क्षेत्र सिद्धपीठ असून त्याचे माहात्म्य काशी–वाराणशी क्षेत्रापेक्षाही श्रेष्ठ आहे असे ऋषीमुनींनी वर्णन करून ठेवलेले आहे हे स्थान सुमारे सात हजार वर्षांपूर्वीपासून प्रसिद्ध असून श्रीविष्णूचा सहावा अवतार भगवान वीर परशुरामाने निर्माण केलेले आहे त्यांचा वास ह्या क्षेत्रात कायम असतो असे हे पवित्र स्थान वेस्टर्न रेल्वेवरील वसई रोड स्टेशनपासून सुमारे चार मैलावर आहे तर वसईरोड पुढील स्टेशन नाला सोपारा येथून अवघे दोन अडीच मैलावर आहे दोन्ही ठिकाणांहून येथे जाण्यासाठी एस टी बसेस् सुटतात

नाला सोपारा स्टेशनवरून आपण बसने निघालो म्हणजे बस प्रथम सोपारे (सुरपूर) हद्दीतून जाते व वाघोली निर्मळ सीमेवर येऊन थांबते हाच रस्ता सरळ पुढे निर्मळ गावातून जातो. दोन्ही बाजूला छोटी छोटी घरे लागतात थोडे पुढे गेल्यावर दोन्ही बाजूला दोन तलाव लागतात. उजवे बाजूचा विमल तलाव उर्फ तीर्थ व डावे बाजूचा निर्मळ तलाव उर्फ तीर्थ. विमल तलावाचे बाजूला रस्त्यावर छोटी तीन देवळे लागतात एक हनुमान मंदिर आहे. एक श्रीदुर्गामाता मंदिर




श्रीविमलेश्वर महादेव मंदिराकडे जाताना

आहे व तिसरे श्रीगजाननाचे आहे ही मंदिरे पेशवेकालात ह्या परिसरातील मंदिराचा, वसईच्या विजयानंतर जीर्णोद्धार केला तेव्हा बांधलेली आहेत थोडे पुढे आल्यावर रस्त्याचे डावे बाजूला एक टेकाड सुमारे १०० ते १५० फूट उंचीचे लागते त्यावर श्रीविमलेश्वर महादेव व श्रीनिर्मळेश्वर महादेवाची प्रसिद्ध मंदिरे आहेत रस्त्याचे उजवे बाजूला विमल तलाव विस्तृत पसरलेला दिसतो.

खालून वर श्रीविमलेश्वर मंदिराकडे पाहिले असता मंदिराचा पार्श्वभाग आपणास दिसतो वर जाण्यासाठी पूर्वी पायऱ्या केलेल्या होत्या आज त्यांची स्थिती सामान्यच आहे. काही पायऱ्या चढून वर आले म्हणजे दोन्ही बाजुला दोन उंच तुळशावृंदावने दिसतात शिवाय दोन छोट्या दीपमाळाही दिसतात पायऱ्या चढून वर आलो म्हणजे मंदिराचा कोट लागतो. उजवे बाजूला मंदिराचे प्रांगणात शिरण्यासाठी रस्ता असून उजवे बाजूला विश्रांतीसाठी दगडी बैठका केलेल्या आहेत. तेथून पाठीमागे वळून पाहिले असता श्रीविमलतीर्थाचा मनोरम देखावा दिसतो मंदिराचे उजवे बाजूच्या ह्या अंगणातून पुढे गेले असता मंदिराची भिंत संपल्यावर आपणास डावे बाजूस वळावे लागते तेव्हा मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार दिसते समोर एक प्रचंड काळ्याभोर पाषाणाची दीपमाळ दिसते त्याचेजवळ एक अतिप्राचीन विराट वटवृक्ष दिसतो त्याला प्रशस्त पार बांधलेला असून त्याचे मागे जरा डाव्या बाजूला एक छोटेसे शिवमंदिर दिसते हे मंदिरही छोटे व आतील शिवलिंगही छोटे आहे गाभारा फक्त १० X १० फुटाचा आहे हेच ते आद्य श्रीनिर्मळेश्वर मंदिर. ह्या लिंगाची पूजाअर्चा होतेसे दिसत नाही शिवलिंगावर अभिषेकपात्रही नाही त्याला कोणी पुजारी असल्याचे जाणवत नाही हे शिवलिंग परशुराम-स्थापितच आहे हा आद्य श्रीनिर्मळेश्वर महादेव आहे. भगवान परशुरामाने निर्मळ तीर्थ निर्माण केले तेव्हाच ह्याची स्थापना केली व त्याचे नाव ठेवले श्रीनिर्मळेश्वर. ह्या मंदिराचे मागे उतार असून श्रीनिर्मळ तीर्थाचा प्रवाह जाऊन जे तीर्थ झाले आहे, त्याला निर्मळमाहात्म्यात कर्दमाली तीर्थ म्हटले आहे

ह्या निर्मळेश्वर महादेवाने हजारो वर्षांच्या काळात ह्या परिसरातली अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत ह्या रम्य ठिकाणी अनेक विद्वान् पंडित, बुद्ध सन्यासी, प्राचीन ऋषीमुनी आकर्षित होऊन त्यांचा निवास ह्या स्थानी घडला असेल, अनेक राजाच्या राजवटी त्याने पाहिल्या असतील सातवाहनसारख्या धर्मनिष्ठ राजाच्या हातून निर्माण झालेली अनेक दिव्य मंदिरे पाहिली असतील. शिलाहार राजाच्या काळातील ही धर्मकृत्ये, मंदिरनिर्मिती ह्या श्रीनिर्मळेश्वराने पाहिली असेल समोरील विमलतीर्थातील श्रीविमलेश्वर महादेवाचे प्रचंड मंदिरही पाहिले असेल ब्रह्मटेकडी ह्याचे पाठीमागील बाजूसच आहे त्यावरील श्रीब्रह्मदेवाचे प्रचंड मंदिराचा सहवास ह्या श्रीनिर्मळेश्वर महादेवाला लाभला



श्रीविमलेश्वर मंदिर–प्रवेशद्वार

असेल. श्रीचक्रेश्वर महादेवाची संगत अजनही लाभत आहे पायथ्याशी असलेल्या श्रीसांबसिद्धेश्वराशी व विमळतीर्थाचे पलीकडे असलेल्या श्रीसुरेश्वराशी अजूनही मौन–हितगुज चालू असेल. आद्य शंकराचार्यांचे पट्टशिष्य मंडनमिश्र उर्फ श्रीसुरेश्वराचार्य ह्यांचे शाखेतील आठवे पुरुष श्रीजगद्गुरु विद्याशंकरभारती यांनी आपले धर्मप्रसाराचे कार्य संपल्यावर मन:शांतीसाठी तीर्थयात्रा सुरु केली आणि ह्या रम्य ठिकाणी येऊन श्रीनिर्मळेश्वर महादेवाचे सान्निध्यात समोरील विमळ-तीर्थातील मध्यभागी असलेले, श्रीभगवान परशुरामाने स्थापन केलेले प्रचंड, भव्य श्रीविमलेश्वर मंदिर पाहिले असेल. पलीकडील काठावर असलेले श्रीसुरेश्वराचे शिवमंदिर पाहून त्यांना आपल्या शाखापुरुष श्रीसुरेश्वराचार्यांची आठवण झाली असेल. पायथ्याशी असलेल्या श्री सांबसिद्धेश्वर मंदिराचे दर्शन घेताच भगवान श्री अत्रि ऋषी, श्रीदत्तात्रेय ह्यांचे स्मरण झाले असेल; श्रीचक्रेश्वर महादेव व श्रीचक्र-तीर्थ पाहून त्यांना प्रसन्न वाटले असेल आणि श्रीनिर्मळेश्वराचे मागील प्रचंड, भव्य, उदात्त श्रीभगवान ब्रह्मदेवाचे दर्शनाने त्यांना ब्रह्मानंद झाला असेल. चारी बाजूंच्या पवित्र तीर्थदर्शनाने त्यांना परम संतोष वाटला असेल आणि ह्या रम्य ठिकाणी साक्षात् देवनगरीमध्ये तत्काल समाधि घेऊन परमेश्वरस्वरूप श्रीनिर्मळेश्वरस्वरूप व्हावे असे वाटून समाधी घेतली. हे दृश्यही श्रीनिर्मळेश्वर महादेवाने पाहिले असेल. त्याचबरोबर धर्मेश्वर राजे व धर्मनिष्ठा नष्ट होऊन उत्तरेकडून इस्लामी व पश्चिमेकडून फिरंगी मूर्तिभंजक धर्मप्रचारक व राजे ह्यांची आक्रमणे सुरु होऊन

ह्या नयनरम्य देवनगरीतील मंदिरे धडाधड कोसळताना श्री निर्मळेश्वराने पाहिली असतील मूर्तीभंजकानी असंख्य देवमूर्तीवर केलेले घणाघात पाहिले असतील, त्यांची छिन्नविच्छिन्न झालेली रूपेही पाहिली असतील श्रीविमलेश्वर महादेव मंदिर भुईसपाट होऊन असंख्य मूर्ती फिरंग्याच्या किल्ले-कोटाच्या पायांत चिणलेल्याही पाहिल्या असतील, तर लाचार, दीन झालेल्या त्या देवांच्या भक्तांनी ज्या देवांची पवित्रतेने पूजा करावयाची, त्यांच्या रक्षणाचे सामर्थ्य न उरल्यामुळे रक्षणाचा उपाय म्हणून आपल्या देवांच्या मूर्ती विहीरीत, तळयात स्वतःच्या हातांनी लोटताना किंवा शेतात, खड्डयात दफन करतानाही पाहिली असेल, देवनगरीची स्मशाननगरी झालेली पाहिली असेल

ज्या ठिकाणी ऋषीमुनीनी यज्ञयाग केले, देव-देवतांना आवाहन केले, आहुती दिल्या, त्या यज्ञाच्या पवित्र धुराने भरलेले आकाश पाहिले असेल, त्याच ठिकाणी फिरंग्यानी पेटवलेली अग्निकुंडेही पाहिली असतील व त्यांत धर्मशिक्षेच्या नावाखाली त्यात फेकल्या जाणाऱ्या निरपराध स्त्री-पुरुषाचे बळीही पाहिले असतील ज्या ठिकाणी पवित्र वेदमंत्राच्या जयघोषाने आकाश दुमदुमून जात होते, त्याच ठिकाणी अग्निकुंडात फेकलेल्या मुला-माणसाच्या करुण किंकाळयानी आकाश कोंदून गेलेले पाहिले असेल ह्या निर्मळेश्वराने काय पाहिले नाही ? कालचक्राचा फेरा कुणालाही सोडीत नाही उदयास्त सर्वांना असतात हेही पाहिले असेल

त्याच अज्ञात काळात धर्मवीर श्री अणजूरकर व धर्मवीर श्री अंताजीपंत कावळे ह्यांसारख्यांनी येथील बाटून ख्रिस्ती झालेल्या आपल्या धर्मबांधवाना ह्या निर्मळ तीर्थाने शुद्ध करून परत धर्मात घेतलेलेही पाहिले असेल ह्या धर्मवीरानी भगवान परशुरामवंशीय पेशवे सरकारला वेळोवेळी साकडे घालण्यात यश मिळवून, श्रीमंत चिमाजी अप्पासाहेब पेशवे ह्याना सुमारे एक लक्ष फौजेनिशी ह्या फिरंगी-व्याप्त भागावर चालून येऊन फिरंग्याचा नायनाट करण्यास भाग पाडलेलेही ह्या निर्मळेश्वर महादेवाने पाहिले असेल भगवान परशुरामाने स्वतः प्रमाणेच धर्म-रक्षणाचे कार्य करण्याची ह्या मराठे सरदाराना प्रेरणा देऊन या देवनगरीचा जीर्णोद्धार करण्यास प्रेरणा दिली असेल पेशवे सरकारने वसईतून फिरंग्याचे उच्चाटन केल्यावर पाडून टाकलेली मंदिरे, वास्तू इत्यादींचा जीर्णोद्धार करण्याची मोहीम सुरू केली व अनेक मंदिरे ह्या भागात त्यांचे ह्या भागाचे सुभेदार श्री शंकराजी केशव फडके ह्यांचे हस्ते जीर्णोद्धारित केली

अशाच एका प्रसंगी श्री शंकराजी केशव फडके ह्याजकडे एक यती आला व सुभेदार श्री फडके ह्याना सांगू लागला की त्यांचे गुरु व आठवे जगद्गुरु श्री शंकराचार्य ह्यांची समाधी निर्मळ टेकडीवर आहे, त्याचा जीर्णोद्धार करावा व एक मंदिर बांधावे श्री. शंकराजी केशव फडके ह्यानी त्या यतीचा योग्य पाहुणचार

केला, राहण्यास एक खोली दिली व सांगितले, " महाराज, मी पेशवे सरकारचा नोकर आहे मंदिर बांधण्यास व समाधीचा जीर्णोद्धार करण्यास पेशवे सरकारचा हुकुम पाहिजे त्याशिवाय हे काम सुरू करता येणार नाही क्षमा असावी आज एकादशी आहे आपण फलाहार करावा आणि विश्रांती घ्यावी "


कारभाऱ्याने यतीमहाराजांना स्नानाची जागा दाखवली यती महाराजांनी स्नान केले व नित्यकर्मासाठी आपल्या खोलीत येऊन दार लावून घेतले कारभाऱ्याला वाटले, हा यती कदाचित् रागाने न सांगता निघून जाईल म्हणून बाहेरून हळूच कडी लावून घेतली रात्र झाली तरी दार उघडले नाही जो तो आपल्या उद्योगात होता सकाळ झाली आज कार्तिक वद्य द्वादशी होती श्री शंकराजी केशव फडके नित्य उद्योगात गुग होते त्यांनाही कालचा उपास होता माध्यान्हकाळी उपोषणाचे पारणे फेडण्यासाठी भोजनाची पंगत मांडली, परंतु पंक्तीला यतीमहाराज दिसत नाहीत असे पाहून पंतांनी कारभाऱ्याला हाक मारली व यती महाराजांना भोजनास बोलावण्यास सांगितले यती महाराज अतिथीगृहात उतरले आहेत व आपण बाहेरून कडी लावली आहे हे कारभारी विसरून गेले होते घाबऱ्याघाबऱ्या ते अतिथीगृहात आले. पाहतात तो दाराला कडी तशीच कायम त्यांनी चटकन् कडी काढली आणि हाक मारली, " महाराज, यजमान भोजनास बोलावत आहेत " एकदा हाक मारली, उत्तर नाही दोनदा हाक मारली, उत्तर नाही कारभाऱ्यांनी दार उघडले तो खोली रिकामी ! यती महाराज नाहीत आणि त्यांची वस्त्रे वगैरे देखील काही नाही कारभारी घाबरत घाबरत पंताकडे आले आणि झाला प्रकार सांगितला. पंत भयंकर संतापले म्हणाले, "काय हा हलगर्जीपणा ! " पुढे काही बोलणार तोच एक हुजऱ्या धावत आला आणि सांगितले " सरकार, बाहेर पुण्याहून बाजीरावसाहेब पेशव्यांकडून एक सांडणीस्वार महत्त्वाचा लखोटा घेऊन आला आहे व हुजूरची भेट मागतो आहे. " सांडणीस्वार शब्द ऐकताच पंत तातडीने देवडीवर आले. पंतांना बघताच पेशव्यांचा खास सांडणीस्वार लवून पुढे झाला आणि मुजरा करून मोहोरबंद लखोटा पंतांचे हातात दिला पंतांनी लखोटा हातात घेतला, मस्तकी लावला व कारभाऱ्यांना ताबडतोब सांडणीस्वाराची भोजन-विश्रांतीची व्यवस्था करण्यास सांगितले

पंतांनी लखोटा सर्वांसमक्ष उघडला आणि वाचावयास सुरुवात केली–

" कार्तिक वद्य एकादशीस ज्या यती महाराजांनी तुम्हास दर्शन दिले, त्यांनी आज प्रातःकाळी कार्तिक वद्य १२ स आम्हास येथे पुणे मुक्कामी दर्शनाचा लाभ दिला. यती महाराजांनी सांगितले की निर्मळ येथे निर्मळ तलावास लागून जी टेकडी आहे त्यावर श्रीमत् जगद्गुरु श्री शंकराचार्य ' श्री विद्याशंकर भारती ' ह्यांची समाधी आहे. तिचा जीर्णोद्धार करून त्या ठिकाणी देऊळ बांधावे अशी

यती महाराजांची आज्ञा झाली आहे तरी देखत हुकुम जीर्णोद्धार व देऊळ बांधणेस सुरुवात करावी हे देऊळ बांधून झाल्यावर नेमणूक करून देण्यात येईल ''



श्रीविमलेश्वर मंदिराचा कोटाचा आतील भाग

पतांनी तो हुकुम पाहून तातडीने मंदिर व समाधी बांधावयास सुरुवात केली. विमल तलावात मध्यभागी असलेले विमलेश्वर मंदिर नष्ट झाले होते व तेथे पुन्हा बांधणे गैरसोईचे होते, म्हणून विमलेश्वर महादेवाचे शिवलिंगाचा शोध घेऊन प्रथम श्रीविमलेश्वर महादेवाचे मंदिर श्रीनिर्मळेश्वर मंदिराचे अगदी समोर, सरळ रेषेत नव्याने बांधून काढले व मूळ विमलेश्वर लिंगाची तेथे स्थापना केली. गाभारा १०X१० फूट आहे, व शिवलिंग मध्य आहे पाठीमागे एक पार्वती देवीची मूर्ती कोनाड्यात स्थापन केली. जवळच्या परिसरात सापडलेले एक शिवपार्वतीचे प्राचीन शिल्प मागील भिंतीजवळ ठेवून दिले गाभारा जरा खोलगट आहे बाहेर दर्शनी दरवाजाचे डावे बाजूला गणपती व उजवे बाजूला कार्तिकस्वामी व ब्रह्मदेव ह्याच्या मूर्ती स्थापन केल्या बाहेरील प्रागणात श्री विमलेश्वरासमोर

मराठी ग्रंथालय ठाणे
३७०५८



श्री विमलेश्वर–शिवलिंग

नंदीची स्थापना केली त्यावर छत्री उभारली आणि श्री विमलेश्वर महादेव पुन्हा स्थानापन्न झाले पेशव्याचे आज्ञेप्रमाणे शेजारी श्रीमत् जगद्गुरु श्री शंकराचार्य विद्याशंकर भारती ह्यांची समाधी होती; तिचे भव्य मंदिर उभारले वर चांदीचा पत्रा जडवला उत्तम छत लावले दोन्ही मंदिरे उत्कृष्ट दगडी बांधकामाची करून घेतली आज त्याचे शेजारी एक विठ्ठल मंदिरही निर्माण झालेले आहे तेही उत्कृष्ट आहे

ह्या तिन्ही मंदिरातील मध्यभागी असलेल्या श्री शंकराचार्य समाधीसमोर सुमारे वीस फूट अंतरावर भव्य दिंडी दरवाजा व कोट बांधला हा कोट चारही बाजूने असून आतील बाजूने १२ फुटाच्या ओवऱ्या आहेत. तेथे यात्रेकरूंना उतरण्याची सोय आहे. पाठीमागील दोन कोपऱ्यांत एक एक खोली आहे व पुढील दोन कोपऱ्यांत मंदिरे आहेत श्री विमलेश्वर-निर्मळेश्वर बाजूचे कोपऱ्यातील खोलीत श्री भगवान परशुराम, काळ, काम, जमदग्नी व रेणुका अशा पाच



श्रीविठ्ठलमंदिर

मूर्तीचे मंदिर आहे. सर्व मूर्ती गंडकी शिळेच्या काळ्याभोर आहेत उजवे बाजूचे कोपऱ्यात (आग्नेय कोपऱ्यात) श्रीदत्त, अत्रीऋषी, अनसूया व मारुती ह्यांचे मंदिर आहे ह्या चार मूर्ती फारच सुंदर आहेत ह्याला लागून असलेल्या खोलीत अलीकडे स्थापन केलेल्या राम, सीता, लक्ष्मण व हनुमान मूर्ती आहेत

कोटाचे बाहेर उत्तर दिशेला मोकळी जागा आहे श्री विमलेश्वराची-निर्मळेश्वराची यात्रा कार्तिक वद्य एकादशीला भरते यात्रा सुमारे पंधरा दिवस चालते जवळपासचे परिसरातील सुमारे लाख ते दीड लाख यात्रेकरू येतात भाविक लोक विमल तीर्थात स्नान, दान, क्रियाकर्म इत्यादी करताना अजूनही दिसतात हे स्थान ह्या परिसरातील लोकांचे अत्यंत श्रद्धास्थान आहे वर उल्लेखिलेले शंकराचार्य श्रीमत् जगत्गुरु विद्याशंकर भारती ह्यांची समाधी यती महाराजांना ह्या दिवशी सापडली, तेव्हापासून हा यात्रासोहळा सुरू झाला सदरहू श्री विद्याशंकर भारती ह्यांसंबंधी उपलब्ध माहिती पुढीलप्रमाणे आहे

श्री शंकराचार्य समाधी ही आद्य शंकराचार्यांपासूनचे आठवे पुरुष श्रीविद्याशंकरभारती यांची आहे आद्य शंकराचार्यांनी बौद्ध पंडित मंडनमिश्रांचा वादविवादात पराभव केल्यामुळे मंडनमिश्रांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले, तेव्हा आद्यशंकराचार्यांनी त्यांना सुरेश्वराचार्य हे नाव देऊन सन्मान केला त्यांचे परंपरेतील विद्याशंकर भारती हे आठवे पुरुष होत. हे मूळचे मल्याळ देशातले त्यांचा जन्म



श्रीशंकराचार्य–समाधि

शके ४२१ मध्ये झाला त्यांच्या वडिलांचे नाव शिवगुरु व आईचे नाव गिरिजादेवी त्यानी वयाच्या पधराव्या वर्षी शृंगेरीला जाऊन नऊ वर्षे अध्ययन केले व पुढे पृथ्वीप्रदक्षिणा केली करवीर क्षेत्रात त्यानी बराच काळ वास्तव्य केले. धर्म-प्रचारकार्य करीत असता त्यांनी 'सक्षेप शारीरिक भाषा' व 'प्रबोध सुधारक' हे ग्रथ लिहिले व ते आज अजरामर ठरले आहेत 'भास्कर' व 'देही' नामक पडितांशी त्यानी वादविवाद केला, व विजय मिळवला तो प्रख्यात आहे विजयनगर राज्याचे मत्री श्री विद्यारण्य व त्याचे बधू प्रख्यात वेदभाष्यकार श्री सायणाचार्य ह्यांचे हे गुरु होते वयाच्या सत्तर वर्षांपर्यंत त्यांनी धर्मप्रसाराचा झेंडा फडकत ठेवला होता अखेरीस ते समुद्रस्नानास निघाले सुरपूर (शूर्पारक) ची कीर्ती ऐकून ते या क्षेत्री आले असता हे स्थान त्यांना एवढे आवडले की त्यानी तावड-तोब समाधी घेतली

...३

त्यांचे हे समाधीस्थळ निर्मळक्षेत्रात कोठेतरी आहे एवढेच लोकांना माहीत होते त्यांचे नाव शकर व शकराचार्यपदावर होते म्हणून ह्या समाधीला लोक गैरसमजुतीने आद्य शकराचार्य समाधी समजू लागले परंतु ही समाधी आद्य श्री शंकराचार्यांची नाही त्यांचेपासूनचे आठवे पुरुष श्री जगद्गुरु शकराचार्य श्री विद्याशंकर भारती ह्यांची आहे पोर्तुगीझ व मुसलमान काळात ह्यासंबंधी माहिती नष्ट झाली होती परतु वसईच्या महाधर्मसग्रामानंतर त्याचे शिष्य यतीमहाराज ह्याचे कृपेमुळे हे स्थान उघडकीस येऊन आजचे स्वरूपात समाधी मदिर झाले

卐 卐 卐

# ४. श्री निर्मळ-विमळ क्षेत्रनिर्मितीची कथा

विश्वातले सारे सामर्थ्य आपल्या करकमळात साठवून ठेवणाऱ्या महामानव श्री भगवान परशुरामांनी कश्यपाला पृथ्वी दान केल्यावर स्वतःच्या वास्तव्यासाठी भूमी मिळवण्यासाठी, आपले दूरगामी शिवधनुष्य उचलले व ब्रह्मास्त्र मंत्रून सह्याद्रीच्या शिखरावरून बाण सोडला ब्रह्मास्त्र सुटताच प्रचड तेज निर्माण होऊन पाण्याने पेट घेतला समुद्र शुष्क झाला आणि त्याने वीर भगवान परशुरामापुढे नवीन भूमी नजराणा म्हणून आणून ठेवली हेच पहिले परशुरामक्षेत्र करपरशु वीर भगवान परशुरामानी निर्माण केले

भगवान परशुरामांनी ह्या ठिकाणी सहासष्ट कुळे आणून वसवली त्यांना गोत्रे दिली. वेदविद्या, चौदा विद्या, चौसष्ट कला शिकवल्या त्यांची चित्ते पावन करून त्यांना चित्तपावन केले तेजस्वी बनवले हेच ते चित्तपावन ब्राह्मण. हे भगवान परशुरामनिर्मित ब्राह्मण हा गुरु, निर्माता वीर भगवान परशुराम ह्या नवभूमीचा निर्माता भगवीर परशुराम. हेच ते आद्य परशुराम क्षेत्र सुरपूर उर्फ सोपारे. हा प्रदेश लागवडीखाली आणण्यासाठी पाताळातून परमपावन गगा वैतरणी भगवान परशुरामाने ह्या भागात आणली आणि हा भाग सुजलां सुफलाम् करून सोडला ऋषी, मुनी, तपस्वी, देव, यक्ष, गधर्व, कुबेर इत्यादि देवतांना भगवान परशुरामांनी येथे आणून त्यांच्यासाठी अनेक पवित्रपावन तीर्थे निर्माण केली आणि

दक्षिणेकडे पश्चिम किनाऱ्याला वसईजवळ ही नवी पुण्यपावन भूमी, नवा स्वर्ग निर्माण केला. ह्या स्वर्गाने इद्रादी देवता, ब्रह्मदेव ह्यांनाही ह्या भूमीत वास्तव्य करण्याचा मोह पडला आणि ही नवस्वर्गभूमी खऱ्या अर्थाने देवनगरी-सुरपुर झाली भगवान वीर परशुरामाने ह्याला राजधानी केले व त्याचे नावही ठेवले सुरपूर.


भगवान परशुरामाने ह्या भूमीचे रक्षणाची जबाबदारी स्वतःवर घेतली आणि तो जवळच्या पर्वतावर वास्तव्य करून राहिला ह्या पावन भूमीत यज्ञयाग सुरू झाले वेदमंत्राच्या घोषानी आकाश दुमदुमू लागले. यज्ञीय धुराचे लोट आकाशात उसळू लागले आणि यज्ञसंस्थाविरोधी पाळपजर नावाचा दैत्य खवळला त्याने येऊन यज्ञात विघ्ने आणावयास सुरवात केली. ऋषीमुनींनी भगवान पशुरामांचे स्मरण केले आणि ते पाळपजर दैत्यावर चालून आले पाळपजर दैत्य व परशुराम ह्याचे युद्ध होऊन त्यांनी त्याला ठार मारले ज्या ठिकाणी त्याला मारले त्या ठिकाणी त्यानी तीर्थ निर्माण केले परशुरामानी पाळपजर दैत्याला ठार मारण्याचे भद्र (पवित्र) कृत्य केले. म्हणून ऋषी-मुनी त्या तीर्थाला म्हणू लागले भद्रतीर्थ. कालांतराने साक्षात् पार्वतीने येथे स्नान केले व नंतरच्या काळात भगवान श्रीकृष्णपत्नी रुक्मिणीनेही येथे स्नानदान केले म्हणून त्याला म्हणू लागले, रुक्मिणी--कुंड तीर्थ हे स्नान सोपाऱ्याच्या खाडीच्या दादरा भागाजवळ आहे हे तीर्थ आता बुजत आले आहे.

भगवान परशुरामाने ज्या दुष्ट मदोन्मत्त क्षत्रिय असुरांना मारले होते, त्यांपैकी एक विमलासुर नावाचा राक्षस लपून राहिला होता त्याने आता ह्या ऋषीमुनींना त्रास देण्यास सुरुवात केली स्त्रियांचे अपहरण, यज्ञाचा विध्वंस वगैरे कृत्यांनी तेथील जनतेला 'त्राहि भगवान्' करून सोडले तेव्हा ऋषीमुनींनी आपले गाऱ्हाणे भगवान् परशुरामाकडे नेले. परशुरामांनी तत्काळ आपले धनुष्य सिद्ध केले व विमलासुरावर चाल केली. काहीं काळ त्याने भगवान परशुरामांबरोबर घनघोर युद्ध केले परंतु साक्षात् अग्निनारायण, क्षत्रिय असुर-संहारक भगवान् परशुरामाबरोबर आपला टिकाव लागणार नाही हे ओळखले व तो प्राणरक्षणार्थ पळत सुटला ह्या भूमीवर आपला निभाव लागणार नाही म्हणून त्याने देवगिरी पर्वताचे एक शिखर उचलून समुद्रात टाकले व त्यावर वास्तव्य करून राहिला. हाच तो तुगार पर्वत. तुग म्हणजे उंच व अर म्हणजे अरण्य अरण्याने भरलेला उंच पर्वत म्हणून तुगार पर्वत परंतु हे देवगिरीचे शिखर म्हणून हा देवगिरी तुगार पर्वत होय.

विमलासुर हा मूर्तिपूजक, देवाधिदेव महादेव श्री भगवान् शंकरांचा निस्सीम भक्त होता परशुरामापासून आपल्याला धोका आहे व आपल्या पराक्रमाला बंधन आहे हे जाणून त्याने ह्या देवगिरी तुगारवर भगवान् श्री शंकराची कडक


उपासना आरभिली एका पायावर उभे राहून त्याने 'ॐ नमः शिवाय'चा अखंड जप चालवला. अखंड बारा वर्षे कठोर तपश्चर्या केल्यामुळे एक दिवस भगवान् शकर त्याच्यापुढे साक्षात् प्रगट झाले आणि म्हणाले, " वत्सा, तुझ्या कठोर, निस्सीम तपश्चर्येने मी प्रसन्न झालो आहे तू माझा परमभक्त आहेस तुला काय पाहिजे तो वर माग "

विमलासुराने अनन्य भावाने भगवान् देवाधिदेव महादेवापुढे लोटांगण घातले आणि म्हणाला, " महाराज, मी आपला भक्त आपल्या सहवासाला आसुसलेला आहे म्हणून विनती की ह्या देवगिरी–तुग पर्वतावर आपण वास्तव्य करावे. "



श्रीतुगारेश्वर शिवलिंग

भगवान् शकर म्हणाले, " तथास्तु " आणि सांगितले " हे दिव्य लिंग घे त्याची स्थापना कर म्हणजे माझा वास येथे कायम राहील तुझ्या भक्तीने मी सतुष्ट झालो आहे आणखी एक वर माग " विमलासुर म्हणाला, " भगवान्, युद्धात मी सदैव अजिंक्य व्हावे व देव, दानव, मानव व पशू ह्याजकडून मला मृत्यू येऊ नये " भोलेनाथ श्रीभगवान् देवाधिदेव म्हणाले, " तथास्तु पण लक्षात ठेव, ऋषीमुनी आणि परस्त्री ह्याना जर त्रास दिलास तर मात्र नाश पावशील. तू निर्वंध पणाने त्रैलोक्याचे राज्य मिळवून सुखाने राहा "



श्रीतुगारेश्वर मंदिर

विमलासुराने भगवान् महादेवाने दिलेल्या श्रीशिवलिंगाची स्थापना देवगिरी तुगार पर्वतावर केली हेच ते प्रसिद्ध तुगारेश्वर मंदिर. हे सिद्धक्षेत्र आहे. ह्या ठिकाणी साक्षात् श्रीशिवशंकर देवाधिदेव महादेवाचा वास असतो. विमलासुर आता अजिंक्य झाला होता त्रिभुवनाचे वैभव त्याच्या पायाशी लोळण घेत होते

विमलासुराच्या तपश्चर्येच्या काळात शांतता प्रस्थापित झाली होती. ऋषी-मुनींनी सुरपूर क्षेत्रात पुन्हा आश्रम उभारले होते. यज्ञयाग सुरू झाले होते. यज्ञात आहुती पडू लागल्या होत्या वेदाचे जयघोष सुरू होते आहुती स्वीकारण्यासाठी साक्षात् अग्निदेव, इंद्र, वरुण, कुबेर इत्यादि देवता येऊ लागल्या होत्या त्यांच्या आगमनाने, ऋषीमुनींच्या निवासाने ही भूमी पुण्यपावन झाली होती एवढ्यात भगवान् परशुरामांचे धनुर्विद्या गुरु व पितामह ऋचीक ऋषी यांनी येथे येऊन एका यज्ञाची तयारी सुरू केली होती. म्हणून असंख्य ऋषीसंप्रदाय वगैरे या भागात जमले होते यज्ञाला सुरुवात झाली, यज्ञीय वेदमंत्राचे घोष सुरू झाले, यज्ञात आहुती पडू लागल्या, यज्ञदेवता आहुती स्वीकारण्यासाठी येऊ लागल्या आणि यज्ञीय धुराचे लोट आकाशात जाऊ लागले.

यज्ञीय आहुती व धुरांच्या वासाने देवगिरी तुगार पर्वतावर वास्तव्य करणाऱ्या यज्ञविरोधी विमलासुराचे माथे पुन्हा फिरले. त्याची आसुरी वृत्ती पुन्हा जागृत झाली भगवान् शंकरांच्या वराने आपण अमर व अजिंक्य झालो आहोत या भावनेने त्याला गर्व चढला आणि त्याने तात्काळ सुरपूरवर चाल केली यज्ञाचा विध्वंस केला. ऋषीमुनींना पिटाळून लावले यज्ञवेदी मोडून तोडून टाकली यज्ञ-मंडप फेकून दिला झाडीकुडी फोडून टाकली, आणि पुन्हा देवगिरी तुगारवर येऊन राहिला

सर्व ऋषीमुनींनी कैलासपर्वतावर जाऊन भगवान् शंकराला गाऱ्हाणे घातले ते म्हणाले, "भगवन्, आपण वरदान देऊन विमलासुराला वाचवलेत, आणि तो उन्मत्त होऊन वैतरणातीरावर आम्हांला त्रास देऊ लागला आहे वैतरणातीरावर आम्ही यज्ञ सुरू केला होता. परंतु विमलासुराने त्याचा नाश केला. आता आमचे रक्षण कोण करणार ?" —

भगवान् शंकर म्हणाले, "ऋषीगणहो, शांत व्हा हा परशुराम सध्या तपश्चर्या करतो आहे तो लवकरच विमलासुराचा नाश करील." हे ऐकून ऋषी-मुनी आपापल्या स्थानी निघून गेले.

विमलासुर आता अधिक उन्मत्त झाला होता त्याने फार मोठा धुमाकूळ घालायला सुरुवात केली परशुराम क्षेत्रात वैतरणा संगमावर लोमहर्षण ऋषी राहात होते त्यांना एक नक्षत्रासारखी सुंदर, वेदाग्नीसारखी तेजस्वी, सौंदर्यशालिनी सुकन्या होती ती तरुण होती तरीदेखील ऐहिक व तारुण्यसुलभ मोहापासून दूर राहून ब्रह्मचर्यव्रताने तपाचरण करीत होती विमलासुराची नजर एकदा ह्या सौंदर्यशालिनीवर पडली आणि तिच्या तेजाने, सौंदर्याने तो वेडा झाला. तिचे संगमरवरी लावण्य पाहून तो मंत्रमुग्ध झाला त्याच्यात कामाग्नीचा संचार झाला आणि तिच्याजवळ जाऊन तो म्हणाला,

"हे श्वेतांबरधारिणी, हे चारुगात्री, तुझ्या सौंदर्याने मी मोहित झालो आहे माझे नाव विमलासुर मी अजिंक्य व अमर झालो आहे माझा पराक्रम त्रिखंडात प्रसिद्ध आहे पुरुषार्थ आणि प्रेम म्हणजे शिव आणि शक्ती शिवशक्तीचा संगम होण्यातच जीविताचे साफल्य आहे हे ललनाललामभूत लावण्यलतिके, ही कठोर वल्कले आणि हे भस्माचे पट्टे, हे बर्फाळ वैराग्य तुझ्या मृदुमृदुल नाजुक देहलतेसाठी नाहीत कशाला ह्या तपश्चर्येत आपले तारुण्य फुकट घालवतेस ? मी तुझ्याशी विवाह करायला तयार आहे चल माझ्याबरोबर. तुला त्रैलोक्याची स्वामिनी करतो हे मृदुमृदुल मदनिके, अग, साक्षात् इंद्राणीने तुझी दासी म्हणून तुझे पाय चुरावे ही तुझी योग्यता कशाला देह कष्टवतेस ? माझ्याशी लग्न कर कुबेराचे भांडार फोडून तुझ्या चरणावर आणून ओततो साक्षात् इंद्राला तुझा रथ ओढायला लावतो चल माझ्याबरोबर "

ऋषीकन्येने शांत चित्ताने डोळे उघडले आणि म्हणाली, "विमलासुरा, तुझ्या वैभवाचा, गोड गोड बोलण्याचा माझ्यावर काही परिणाम होणार नाही. तू मुकाट्याने येथून निघून जा स्त्रियांसाठी इंद्रादि देवांना सुद्धा अंगावर सहस्र छिद्रे धारण करावी लागली अनेक साम्राज्ये नष्ट झाली तू आपल्या मार्गाने निघून जा नाहीतर नाश पावशील "

विमलासुर म्हणाला, "हे मदनमंजिरी, कशाला असले कठोर शब्द उच्चारतेस ? अग, हे शब्द तुझ्या ह्या नाजुक जिभेला पेलवतदेखील नाहीत. प्रेमरसाचे उच्चार करण्यासाठीच तुझ्या ह्या नाजुक जिव्हेची आणि मधुर कंठस्वराची निर्मिती झाली आहे चल माझ्या बरोबर" असे म्हणून विमलासुराने तिचा हात पकडला आणि तिला आपल्याकडे ओढले ऋषीकन्येने एक आर्त किंकाळी फोडली, 'परशुरामा, मला वाचव' विमलासुराने चटकन् उचलून तिला कडेवर घेतले व धावू लागला ऋषीकन्या कंठरवाने भगवान् परशुरामाचा धावा करू लागली

ऋषीकन्येची आर्त किंकाळी व धावा परशुरामाला जाणवला झटकन् तो धनुष्य सरसावून चतुरंगण पर्वतावरून धावून आला परशुरामाने धनुष्याचा टणत्कार केला आणि विमलासुराने वळून पाहिले, तर परशुराम धावून येत आहे. तो म्हणाला, "परशुरामा, बरे झाले आलास. मागे तुझ्या भीतीने एकदा पळून गेलो होतो, पण आता मी अमर झालो आहे तुझा एकदा निकाल लावल्याशिवाय मी निर्भय होणार नाही आजच तुझा निकाल लावतो." असे म्हणून त्याने ऋषीकन्येला खाली ठेवले आणि आपली अस्त्रे सज्ज केली.

आपला त्रिशूळ त्याने प्रथम परशुरामावर फेकला परंतु परशुरामांनी त्याचे तुकडे तुकडे करून टाकले नंतर परशुरामानी एक प्रखर बाण सोडला. तो विमलासुराने बाणानेच परतवला परशुरामानी त्यावर एका दिव्यास्त्राची योजना केली. विमलासुराने प्रतिअस्त्राने निःपात केला अस्त्र-प्रतिअस्त्रांचा संघर्ष सुरू झाला आणि भोवतालच्या परिसरात प्रचंड कोलाहल सुरू झाला. शेवटी परशुरामानी एका दिव्यास्त्राने विमलासुराचे पाय तोडले परंतु वरदानाने ते पुन्हा चिकटले. पुन्हा पुन्हा हेच घडले, तेव्हा मात्र भगवान परशुराम चक्रावले त्यांनी क्षणभर भगवान् शंकरांचे स्मरण केले आणि म्हणाले, "भगवन्, आपल्या कृपेमुळे हा उन्मत्त झाला आहे ह्याच्या नाशाचा उपाय आपणच सांगा" भगवान्, शंकरानी कानमंत्र दिला, "ह्याने ऋषीमुनींना त्रास दिला आहे. स्त्रीचे अपहरण करण्याचा प्रयत्न केला आहे आता याचा मृत्यू अटळ आहे तू अर्धचंद्राकृती बाणाची योजना करून ह्याचे मस्तक उडव"

भगवान् परशुरामानी तत्काळ एक दिव्य अर्धचंद्राकृती बाण भात्यातून काढला व कंठावर नेम धरून वेगाने विमलासुरावर फेकला. बाण सूं सूं करीत वेगाने गेला आणि त्याने विमलासुराचे मस्तक उडवले मस्तक खाली पडताच ते आनंदाने हासू लागले तेव्हा परशुराम म्हणाले, "का रे, अजून हसतोस ?"

विमलासुर म्हणाला, "भगवन्, आपण फार श्रेष्ठ वीर आहात मी हसतो ह्याचे कारण आपल्यासारख्या थोर–श्रेष्ठ शिवभक्त वीराकडून मला मरण आले हे माझे परमभाग्य. माझी एक विनंती मान्य करा म्हणजे मला सुखाने मृत्यू येईल"



श्रीविमल तीर्थ

विमलासुराच्या स्तुतीने भगवान् परशुराम संतुष्ट झाले व म्हणाले, " बोल, काय पाहिजे ? " विमलासुर म्हणाला, " भगवन्, माझे शरीर ज्या ठिकाणी पडले तेथे श्री शिवमंदिराची स्थापना करावी व त्याला विमलेश्वर महादेव म्हणून जगात विख्यात करा तसेच माझे मस्तक ज्या ठिकाणी पडले तेथे विमलतीर्थ निर्माण करून ते विख्यात तीर्थक्षेत्र करून सोडावे. सर्व देवतांचा वास तेथे असावा " परशुराम म्हणाले, " तथास्तु " भगवान् परशुरामानी विमलासुराच्या इच्छेप्रमाणे त्याचा देह जेथे पडला होता तेथे एक सुंदर मंदिर बांधले त्यामध्ये दिव्य शिवलिंगाची स्थापना केली सर्व कोनांत अकरा रुद्राची स्थापना केली उत्तरेला धनपती कुबेराची योजना केली तर दक्षिणेला यमधर्माची स्थापना केली वैतरणासंगमी विमलेश्वराचे पश्चिमेला रेणुका व महालक्ष्मीची स्थापना केली मंदिराभोवती प्रचंड तलाव खोदून त्यात वैतरणी गंगा, भागीरथीगंगा व इतर पवित्र तीर्थांचे पाणी आणून सोडले श्री विमलेश्वर महादेव व विमलतीर्थ विश्वविख्यात केले ह्या तीर्थात स्नान केले असता ब्रह्महत्या, गोहत्या, स्त्रीहत्या, इत्यादि सर्व पातकांचा नाश होईल असा वर दिला. ह्या तीर्थात स्नान केले असता दारिद्र्यनाश होईल, सर्व इच्छा तृप्त होतील, मनुष्यप्राण्याला मोक्षप्राप्ती होईल, असा आशीर्वाद दिला. हे सर्व ऐकताच विमलासुराची प्राणज्योत परशुरामस्वरूपी विलीन झाली

विमलासुर जेथे पडला तेथून त्याच्या रक्ताचा पूर पूर्वभागी वाहात गेला, तो गाळ काढून तीर्थ निर्मळ केले म्हणून पलीकडील तीर्थाला निर्मळ तीर्थ म्हणतात.

त्याच्या जवळच एका छोटयाशा टेकडीवर श्री निर्मळेश्वर मंदिराची स्थापना केली. विमलेश्वराचे ईशान्य कोपऱ्यात विमल तलावाचे ईशान्य कोपऱ्यावर श्रीसांब-सिद्धेश्वराची स्थापना केली जवळ सांभवतीर्थ निर्माण केले सुरपूर येथे श्रीचक्रेश्वर महादेव व चक्रतीर्थाची स्थापना केली त्याचप्रमाणे ब्रह्मटेकडीवर ब्रह्मकुंड, मळा-भागात रामकुंड, महालय तीर्थ, विनायक तीर्थ, इंद्रायणीतीर्थ, उत्पलतीर्थ, पिंडारक-तीर्थ, देवतीर्थ, कोळवापी तीर्थ, नीलेन्द्र तीर्थ, इत्यादी सुमारे १०८ तीर्थांची स्थापना केली त्यामध्ये सर्व पवित्र तीर्थांचे पाणी आणून सोडले अशा तऱ्हेने हे तीर्थक्षेत्र विश्वविख्यात व अत्यंत पवित्र स्थान करून सोडले

ह्या तीर्थक्षेत्राची स्थापना सुमारे ७००० वर्षांपूर्वी झाली हेच ते आद्य परशुराम क्षेत्र. ह्या क्षेत्रात श्रीभगवान परशुरामाचा वास आहे ब्रह्मदेवाचा वास आहे देवाधिदेव महादेव भगवान श्रीशंकराचा वास आहे त्याचे दिव्य आत्मलिंग देवगिरी तुंगार पर्वतावर श्रीतुंगारेश्वर महादेव म्हणून विख्यात आहे भगवान परशुराम हे या क्षेत्राचे स्वामी व देवाधिदेव महादेव हे येथील दैवत या ठिकाणी जागृत आहे ह्या कारणास्तव भगवान परशुरामानी ह्या क्षेत्राला नाव दिले श्री क्षेत्र निर्मळ-विमल-सुरपूर. ह्या क्षेत्राची महती इ स पूर्व ५००० पासून आज सन १९७९ पर्यंत गाजत आहे हे क्षेत्र सुरपक्क म्हणजे देवांची वस्ती ह्या नावाने विख्यात होते

आज विमलतीर्थ आहे, परंतु विमलेश्वर महादेवाचे मंदिर मध्यभागी नाही मूर्तिभंजक फिरंग्यांनी त्याचा नाश केला परंतु परशुरामवंशीय पेशवे ह्यानी श्रीविमलेश्वर महादेवाचे मंदिर निर्मळ तीर्थाकाठी असलेल्या टेकाडावर श्री निर्मळेश्वर मंदिराच्या समोर पुन्हा नव्याने बांधून काढलेले आहे त्यामध्ये श्री विमलेश्वर महादेवाचे विमलतीर्थातील शिवलिंग शोधून त्याची त्यात स्थापना केली श्रीविमलतीर्थाचे पश्चिम बाजूला असलेल्या श्रीसुरेश्वर-मंदिराचा जीर्णोद्धार केला श्रीचक्रेश्वर महादेवाचा जीर्णोद्धार केला आजच्या नवविचार व नव उद्योग-क्रांतीमुळे सामान्य माणसाला ह्या तीर्थक्षेत्राचा विसर पडला आहे ती स्मृती फुलवण्यासाठी हा अल्पसा प्रयत्न केला

卐 卐 卐

# ५. श्रीचक्रेश्वर महादेव मंदिर व चक्रतीर्थ

श्री चक्रेश्वर महादेव प्राचीन शिवमंदिर इ स पूर्व ५००० वर्षांपासून म्हणजे श्री परशुरामकाळापासून असून भगवान परशुरामाने आपल्या सुरपूर भूमीत निर्माण केलेल्या अनेक पवित्र तीर्थांपैकी एक असून आजही सुस्थितीत आढळते परशुराम स्वतः शिवोपासक होता हृया भागात भगवान परशुरामाने अनेक तीर्थे निर्माण केली व अनेक शिवमंदिरे स्थापन केली, श्री चक्रेश्वर महादेव हेही त्यापैकीच एक, परशुरामस्थापित शिवलिंग व तीर्थ आहे म्हणून तेवढेच पुण्यपावन पवित्र तीर्थक्षेत्र आहे हृया भागातील पाळपजर दैत्याला मारल्यानतर त्याने आपले चक्र हृया तीर्थात धुतले, म्हणून हृया मंदिराला श्री चक्रेश्वर महादेव असे म्हणतात असे निर्मळमाहात्म्य सांगते

वेस्टर्न रेल्वेने दादरपासून निघाले असता वसई रोडचे पुढले स्टेशन नाला सोपारा हे आहे येथून पश्चिमेला बसने १५ मिनिटाच्या रस्त्यावर सोपारा ऊर्फ सुरपूर आहे चवथ्या स्टॉपला चक्रेश्वर स्टॉप म्हणतात तेथे उतरले असता उजवे बाजूला जाणाऱ्या रस्त्यावर समोरच दीपमाळ दिसते हृया रस्त्याने दीपमाळेकडे जाऊ लागले म्हणजे उजवे हाताला एक प्रचंड तलाव लागतो हेच चक्रेश्वर तीर्थ हृया रस्त्याने जरा पुढे गेल्यावर मंदिराच्या दीपमाळेकडे जाण्यासाठी उजवे बाजूला वळावे लागते दीपमाळेजवळच चक्रतीर्थाच्या प्राचीन घाटाच्या मोडक्या तोडक्या पायऱ्या दिसतात सध्या गणपती विसर्जन येथेच करतात. दीपमाळेला चुना फासला आहे ही फारच प्राचीन दिसते दीपमाळेचे जवळ मोडका तोडका पार असलेला अत्यंत विशाल व उंचा असा अतिप्राचीन वटवृक्ष दिसतो दीपमाळेजवळून डाव्या बाजूला प्रवेश केला म्हणजे आपण मंदिराचे प्रांगणात प्रवेश करतो

चक्रतीर्थावरील रस्त्याने आपण दीपमाळेकडे पूर्वेला वळण घेतानाच डावे हाताला मंदिराची हद्द लागते त्या जागेत घनदाट वृक्ष बाग आहे. त्याच्या गारव्याने भर दुपारी देखील हृया मंदिराला शीतल सावली मिळालेली आहे. प्रवेशद्वारातून




आत शिरताच डावे बाजूला जे घर दिसते ती मंदिराची धर्मशाळा असून तेथे ह्या मंदिराचे सध्याचे पुजारी श्री. मनोरे (लिंगायत) राहतात

समोर दृष्टिक्षेप टाकताच प्रांगणातच एक भव्य प्राचीन नंदी दृष्टीस पडतो. हा नंदी सुंदर कोरीव काम केलेला मणी-माळा-झूलयुक्त दिसतो त्याचे समोर एक भव्य शिवलिंग जमीनीत पुरलेले दिसते ह्या लिंगाला खाली शाळुखा नाही हे लिंग जमिनीवर सुमारे तीन फूट आहे व त्याचा व्यास सुमारे १॥ फूट आहे असे लोकमत आहे की हे लिंग जेवढे जमिनी-वर आहे तेवढेच खाली आहे व प्रतिवर्षी तिळातिळाने वर येते आहे ह्याचे भोवती बाग आहे

श्रीचक्रेश्वर दीपमाळ

धर्मशाळेचे अंगणात व शिवलिंगाचे डावे बाजूला दोन लहान देवळ्या आहेत त्यात प्रत्येकी एक शिवलिंग ठेवलेले आहे ह्या देवळ्या तेथील पूर्वीचे पुजाऱ्याच्या समाधीवर उभारलेल्या आहेत असे तेथील स्थानिक लोक व पुजारी ह्याजकडून समजले.

अंगणातील प्रचंड शिवलिंगासमोर दहा पावलावर एक उतरत्या छपराची कौल रू जुन्या पद्धतीची वास्तू दिसते हेंच ते श्री चक्रेश्वर मंदिर. पुढे तीन चार पायऱ्या असून गजाचा दरवाजा आहे आतील बाजूस समोरच श्री चक्रेश्वराचा नंदी आहे. नंदीसमोर गाभाऱ्याचे दार आहे त्यालाही पायऱ्या आहेत प्रवेश-द्वाराचे दोन्ही अंगाला भिंतीत दोन कोनाडे आहेत. श्री चक्रेश्वराकडे पाहताना डावे बाजूचे कोनाड्यात एक श्री गजाननाची मूर्ती आहे. मूर्तीजवळ भिंतीला टेकून सुमारे ६ फूट उंचीचे एक स्त्री-मूर्तीचे शिल्प आहे अत्यंत मनोहर कोरीव काम-युक्त आहे ती स्त्री डाव्या पायाच्या आधारावर टेकून उभी असून उजवा पाय




स्त्रीमूर्ति (मीनाक्षीदेवी)

किंचित वाकडा चवड्यावर टेकलेला आहे पायात नूपुर आहेत गळ्यात सुंदर अलंकार कोरलेले असून ते तिच्या अनावृत भरीव स्तनावर टेकलेले आहेत. मस्तकावर मुकुटवजा अलंकार आहे. मान जरा डावीकडे झुकवून डावे हातावर असलेल्या पोपटाकडे ती पाहात आहे पोपटाची मान बरोबर त्या स्त्रीच्या मुखाकडे असून जणू काही पोपटाशी ती स्त्री नाजुक गोड गुपित हितगुज करीत आहे एकूण ह्या स्त्री-मूर्तीचा आकार अत्यंत प्रमाणबद्ध, भरीव असून चेहरा नाजुक भाव व्यक्त करणारा आहे. पोपटही प्रमाणबद्ध कोरलेला असून काळ्या कोरीव पाषाणात एवढे जिवंत सौंदर्य निर्माण करणाऱ्या कलावंताचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे

ह्याच तऱ्हेची मूर्ती मद्रास-तामिळ-नाडू राज्यात मदुरा येथील मीनाक्षी मंदिरात आहे. फक्त मीनाक्षी देवीची मूर्तीच हातावर पोपट घेतलेली असते त्यावरून ही मूर्ती मीनाक्षी देवीची तर नाही ना अशी शंका येते !

गाभाऱ्याचे प्रवेश द्वाराचे उजवे बाजूला एका कोनाड्यात चार हातांची मुकुट-चक्रधारी श्रीविष्णूमूर्ती आहे विष्णूमूर्तीचे उजवे बाजूला एक मुकुट-धारी, दोन हाताची, खांद्यावर धनुष्य घेतलेली मूर्ती आहे गळ्यात जानवे आहे त्यावरून ती मूर्ती भगवान परशुरामांची असावी असे वाटते हे शिल्पदेखील सहा फूट उंचीचे असून अत्यंत रेखीव कोरलेले आहे ह्याच्या पायाशी दोन्ही बाजूला एक एक याप्रमाणे दोन स्त्रीपुरुष जोडपी कोरलेली आहेत-ही

मूर्ती अत्यंत सुंदर व मनोवेधक असून जरा देखील भंगलेली नाही. गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराच्या पायऱ्याच्या दोन्ही बाजूला सुमारे १॥X१॥ फूट मापाची शिवलिंगे ठेवलेली आहेत. गाभाऱ्याच्या चारही बाजूनी दर्शनी भागाप्रमाणेच ८ फूट रुंदीची पडवी आहे. तिचा उपयोग विश्रांती व प्रदक्षिणेसाठी होतो. हा बाहेरील भाग पेशवेकालात जीर्णोद्धार करताना वाढवलेला असावा.



श्री चक्रेश्वर महादेव शिवलिंग

श्री चक्रेश्वर महादेवाचा गाभारा १०X१० फूट मापाचा असून आतील भाग खोलगट आहे. मध्यभागी शिवलिंग असून वर सततधारेसाठी अभिषेकपात्र टांगलेले आहे. मागील बाजूचे भिंतीतील कोनाड्यात सुमारे १॥ फूट उंचीची पार्वतीची मूर्ती आहे. सध्या मंदिरात विजेची सोय केलेली आहे. त्यामुळे ट्यूब लाईटमुळे गाभारा उजळून दिसतो. शिवलिंगासभोवती कोणी गुजराथी दानशूर

गृहस्थाने स्वर्गीय गंगाबाई-स्मृत्यर्थ गुळगुळीत लादी १८ ऑक्टोबर १९१७ रोजी बसवली आहे श्री चक्रेश्वराचे दर्शन घेतल्यावर तेथील पवित्र वातावरणाने मन प्रसन्न होऊन काही काळ तेथून हलूच नये असे वाटते सध्या या भागात– म्हणजे सोपारे येथील जनतेला हेच एक शिवमंदिर दिलासा देणारे आहे– अडचणीचे अवर्षणाचे प्रसंगी श्रीचक्रेश्वराला कोडून अभिषेक केला जातो सामवेदी ब्रह्मवृंद हृया कार्यात भाग घेतात व महादेव जनतेला पावतो, संकटमुक्त करतो असा तेथील लोकांचा अनुभव आहे हृया प्राचीन श्रीचक्रेश्वर महादेव मंदिराचे प्रांगणात त्याचे शेजारचे बागेत सध्या एक राममंदिर बांधलेले आहे मंदिराला सुमारे २०×१५ फुटाचा सभामंडप असून कथाकीर्तन–प्रवचनादी कार्यक्रम हृयाच जागेत होतात मंदिरातील राम, लक्ष्मण, सीता हृया मूर्ती संगमरवराच्या असून सुमारे दीड फूट उंचीच्या असाव्यात मूर्ती प्रसन्न आहेत

हृया मंदिराचे उजवे अंगाला एक पडवी असून त्यामध्ये एका टोकाला हृया मंदिराचे एक संस्थापक कै मोरेश्वरबुवा जोशी कीर्तनकार हृयाची समाधी असून वर दत्तपादुका आहेत समाधीचे दर्शनी भागाचे दरवाजाजवळ दोन्ही बाजूचे कोनाड्यात दोन प्राचीन परंतु सुंदर शिल्पे आहेत उजवे कोनाड्यात महिषासुर-मर्दिनीचे शिल्प असून ती महिषासुराला मारीत आहे असे स्वरूप आहे डावे बाजूचे कोनाड्यात विष्णूच्या वराह अवताराचे शिल्प असून त्याचे भोवती दशावताराची लहान शिल्पे कोरलेली आहेत एकूण उंची सुमारे अडीच फूट असूनही सर्व शिल्प अत्यंत नाजूक व स्पष्ट चित्रित केलेले आहे हृया मूर्ती बहुधा हृया भागात ज्या असंख्य शिल्पमूर्ती सापडल्या त्यांपैकी असून येथे स्थापना केली आहे,

सदरहू राममंदिर सुमारे ८० वर्षांपूर्वी बांधले गेले आहे व ते कै मोरेश्वर-बुवा जोशी, कीर्तनकार यांनी बांधले असे त्यांचे वंशज डॉ जोशी, कीर्तनकार हृयांजकडून समजले

श्रीराम मंदिरासमोरच्या एका चौथऱ्यावर मध्यभागी एक हनुमान मंदिर व शनिचे मंदिर आहे दोन्ही मूर्ती एकत्र ठेवलेल्या आहेत हृया हनुमान मूर्तीचे वैशिष्टय म्हणजे हनुमंताने पायांखाली एक राक्षस दडपलेला दाखवला आहे हृया मंदिराला बाहेरील चारही बाजूंनी प्रशस्त ओवरी असून प्रदक्षिणा घालता येण्या-सारखी जागा आहे हनुमान मंदिराच्या दर्शनी दरवाजाबाहेर उजवे बाजूला एक देवतेचे चार हात असलेले शिल्प आहे. मांडी घातलेली असून डावे मांडीवर एक मूल आहे. मागील डावे हातात परशू आहे व उजवे हातात एक फूल आहे. पुढील उजवा हात वरदहस्त आहे मांडीवर मूल असल्यामुळे हिची शितळादेवी म्हणून पूजा करितात. हनुमान मंदिराचे दर्शनी दरवाजाचे उजवे बाजूस एक लहानशी ओबडधोबड देवीमूर्ती आहे. लोक हिला खोकलादेवी म्हणून भजतात



श्री शीतळादेवी


मारुती मंदिराचे मागील भागी प्रदक्षिणा ओवरीतच ह्या भागात सापड-लेली बरीच शिल्पे जतन करून मांडून ठेवलेली आहेत. काही भंगलेली आहेत, परंतु त्यांचे सौंदर्य मूर्तिभजक नष्ट करू शकले नाहीत पहिली मूर्ती एका देवीचे सुरत आसनातले ओबडधोबड शिल्प आहे थोडेफार विमल तलावासमोरील सुरेश्वर मंदिराचे बाजूला असलेल्या सुरेश्वरीप्रमाणेच आहे ह्या मूर्तीचे शेजारी एक मोठा पागोटेवाला ढेरपोट्या सनईवादन करीत आहे असे शिल्प आहे शेजारी एक उभे जोडपे असून त्यावर देवनागरी लिपीतील लेखाची काही अक्षरे आहेत व ती दुर्बोध झालेली आहेत. त्याचे पलीकडे एक शिवपार्वतीचे शिल्प आहे भगवान शंकर आसन मांडी घालून बसले आहेत व डावे मांडीवर पार्वती बसली आहे हे शिल्प खालील बाजूने भगलेले आहे ह्यासारखेच शिल्प निर्मळ येथे विमलेश्वर मंदिरात शिवलिंगाचे बाजूला ठेवलेले असून ह्याहून थोडे मोठे व अभंग आहे . ते शिल्प सुमारे ३॥ फूट उंचीचे आहे, तर येथील शिल्प सुमारे दोन फूट उंचीचे आहे व खालच्या बाजूस थोडे भगलेले आहे. ह्या शिल्पाशेजारी

गृहस्थाने स्वर्गीय मगाबाई-स्मृत्यर्थ गुळगुळीत लादी १८ ऑक्टोबर १९१७ रोजी बसवली आहे. श्री चक्रेश्वराचे दर्शन घेतल्यावर तेथील पवित्र वातावरणाने मन प्रसन्न होऊन काही काळ तेथून हलूच नये असे वाटते सध्या या भागात– म्हणजे सोपारे येथील जनतेला हेच एक शिवमदिर दिलासा देणारे आहे– अडचणीचे अवर्षणाचे प्रसगी श्रीचक्रेश्वराला कोंडून अभिषेक केला जातो सामवेदी ब्रह्मवृद ह्या कार्यात भाग घेतात व महादेव जनतेला पावतो, सकटमुक्त करतो असा तेथील लोकांचा अनुभव आहे ह्या प्राचीन श्रीचक्रेश्वर महादेव मदिराचे प्रागणात त्याचे शेजारचे बागेत सध्या एक राममदिर बाधलेले आहे मदिराला सुमारे २०×१५ फुटाचा सभामडप असून कथाकीर्तन–प्रवचनादी कार्यक्रम ह्याच जागेत होतात मंदिरातील राम, लक्ष्मण, सीता ह्या मूर्ती संगमरवराच्या असून सुमारे दीड फूट उंचीच्या असाव्यात मूर्ती प्रसन्न आहेत

ह्या मदिराचे उजवे अगाला एक पडवी असून त्यामध्ये एका टोकाला ह्या मदिराचे एक सस्थापक कै मोरेश्वरबुवा जोशी कीर्तनकार ह्यांची समाधी असून वर दत्तपादुका आहेत समाधीचे दर्शनी भागाचे दरवाजाजवळ दोन्ही बाजूचे कोनाड्यात दोन प्राचीन परतु सुदर शिल्पे आहेत उजवे कोनाड्यात महिषासुर-मर्दिनीचे शिल्प असून ती महिषासुराला मारीत आहे असे स्वरूप आहे डावे बाजूचे कोनाड्यात विष्णूच्या वराह अवताराचे शिल्प असून त्याचे भोवती दशावताराची लहान शिल्पे कोरलेली आहेत एकूण उची सुमारे अडीच फूट असूनही सर्व शिल्प अत्यत नाजूक व स्पष्ट चित्रित केलेले आहे ह्या मूर्ती बहुधा ह्या भागात ज्या अ.ख्य शिल्पमूर्ती सापडल्या त्यांपैकी असून येथे स्थापना केली आहे,

सदरहू राममदिर सुमारे ८० वर्षांपूर्वी बांधले गेले आहे व ते कै मोरेश्वर-बुवा जोशी, कीर्तनकार यांनी बाधले असे त्याचे वशज डॉ जोशी, कीर्तनकार ह्यांजकडून समजले

श्रीराम मदिरासमोरच्या एका चौथऱ्यावर मध्यभागी एक हनुमान मदिर व शनिचे मदिर आहे दोन्ही मूर्ती एकत्र ठेवलेल्या आहेत ह्या हनुमान मूर्तीचे वैशिष्टच म्हणजे हनुमताने पायांखाली एक राक्षस दडपलेला दाखवला आहे ह्या मदिराला बाहेरील चारही बाजूनी प्रशस्त ओवरी असून प्रदक्षिणा घालता येण्या-सारखी जागा आहे हनुमान मदिराच्या दर्शनी दरवाजाबाहेर उजवे बाजूला एक देवतेचे चार हात असलेले शिल्प आहे मांडी घातलेली असून डावे माडीवर एक मूल आहे. मागील डावे हातात परशू आहे व उजवे हातात एक फूल आहे. पुढील उजवा हात वरदहस्त आहे माडीवर मूल असल्यामुळे हिची शितळादेवी म्हणून पूजा करितात. हनुमान मदिराचे दर्शनी दरवाजाचे उजवे बाजूस एक लहानशी ओबडधोबड देवीमूर्ती आहे. लोक हिला खोकलादेवी म्हणून भजतात



**श्री शीतळादेवी**

मारुती मदिराचे मागील भागी प्रदक्षिणा ओवरीतच ह्या भागात सापड-लेली बरीच शिल्पे जतन करून मांडून ठेवलेली आहेत काही भंगलेली आहेत, परंतु त्यांचे सौदर्य मूर्तिभजक नष्ट करू शकले नाहीत पहिली मूर्ती एका देवीचे सुरत आसनातले ओबडधोबड शिल्प आहे थोडेफार विमल तलावासमोरील सुरेश्वर मदिराचे बाजूला असलेल्या सुरेश्वरीप्रमाणेच आहे ह्या मूर्तीचे शेजारी एक मोठा पागोटेवाला ढेरपोट्या सनईवादन करीत आहे असे शिल्प आहे शेजारी एक उभे जोडपे असून त्यावर देवनागरी लिपीतील लेखाची काही अक्षरे आहेत व ती दुर्बोध झालेली आहेत त्याचे पलीकडे एक शिवपार्वतीचे शिल्प आहे. भगवान शकर आसन मांडी घालून बसले आहेत व डावे मांडीवर पार्वती बसली आहे हे शिल्प खालील बाजूने भगलेले आहे ह्यासारखेच शिल्प निर्मळ येथे विमलेश्वर मदिरात शिवलिगाचे बाजूला ठेवलेले असून ह्याहून थोडे मोठे व अभग आहे , ते शिल्प सुमारे ३॥ फूट उचीचे आहे, तर येथील शिल्प सुमारे दोन फूट उचीचे आहे व खालच्या बाजूस थोडे भगलेले आहे. ह्या शिल्पाशेजारी

गजलक्ष्मीचे शिल्प आहे दोन बाजूला दोन हत्ती दोन पायांवर उभे राहून सोंडेची कमान केलेली आहे व मध्यभागी कमळासना लक्ष्मी बसलेली आहे ह्या शिल्पातील लक्ष्मीच्या मुखाच्या भागाचे मूर्तिभजन झालेले दिसते. परंतु ती गजलक्ष्मीच होय हे ओळखता येते असेच एक शिल्प रानगावातील हनुमान मंदिराबाहेर ठेवलेले आहे ते संपूर्ण अभंग असून जवळच्या नवतीर्थ तलावात ऊर्फ पिंडारक तीर्थात सापडलेले आहे ह्या मूर्तीशेजारी एका प्राचीन मंदिराच्या गाभाऱ्याचे प्रवेशद्वाराची वरची पट्टी आहे ह्या पट्टीची रुंदी सुमारे १।। फूट असावी व लांबी ४।। ते ५ फूट आहे पट्टीवर मध्यभागी सात घोड्याच्या रथात बसलेला सूर्यनारायण दाखवलेला आहे व दोन्ही बाजूला शकरपाळ्याच्या आकृतीची भौमितिक शिल्पनक्षी कोरलेली आहे



भगवान् श्रीशिव-पार्वती




श्रीविष्णुमूर्ती

गजलक्ष्मीचे शिल्प आहे दोन बाजूला दोन हत्ती दोन पायांवर उभे राहून सोंडेची कमान केलेली आहे व मध्यभागी कमळासना लक्ष्मी बसलेली आहे ह्या शिल्पातील लक्ष्मीच्या मुखाच्या भागाचे मूर्तिभजन झालेले दिसते परंतु ती गजलक्ष्मीच होय हे ओळखता येते असेच एक शिल्प रानगावातील हनुमान मंदिराबाहेर ठेवलेले आहे ते संपूर्ण अभग असून जवळच्या नवतीर्थ तलावात ऊर्फ पिंडारक तीर्थात सापडलेले आहे ह्या मूर्तीशेजारी एका प्राचीन मदिराच्या गाभाऱ्याचे प्रवेशद्वाराची वरची पट्टी आहे ह्या पट्टीची रुंदी सुमारे १।। फूट असावी व लांबी ४।। ते ५ फूट आहे पट्टीवर मध्यभागी सात घोड्याच्या रथात बसलेला सूर्यनारायण दाखवलेला आहे व दोन्ही बाजूला शकरपाळ्याच्या आकृतीची भौमितिक शिल्पनक्षी कोरलेली आहे



भगवान् श्रीशिव-पार्वती



श्रीविष्णुमूर्ती



भगवान श्रीपरशुराम

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

श्री चक्रेश्वर महादेव मंदिर व चक्रतीर्थ



ढेरपोटेवाला सनईवादक व इतर शिल्पे

मारुती मंदिराचे बाजूला अगोदर वर्णन केलेले अत्यंत प्राचीन वडाचे झाड आहे ह्या झाडाला बाधलेला पार आता ढासळला आहे त्या पाराला टेकून एक ७ फूट उंचीची ब्रह्मदेवाची शिल्पमूर्ती उभी करून ठेवलेली आहे ह्या मूर्तीला तीनच मुखे दाखविलेली आहेत डोक्यावर मुकुट आहे मधले सन्मुख फार सुदर असून विशेष म्हणजे त्याला लाब दाढी दाखवली आहे. बाजूच्या इतर मुखाना दाढी नाही चवथे मुख पाठीमागे असते म्हणून अध्याहृत समजावयाचे मूर्तीला चार हात आहेत मूर्ती उभ्या अवस्थेत आहे वरच्या डाव्या हातात पुस्तकासारखी एक सुरनळी आहे ते वेदाचे प्रतीक आहे ब्रह्मदेवाने वेद उत्पन्न केले, त्याची पुराणात नोंद आहे खालच्या डाव्या हातात एक तेलाचे भाडे आहे वरच्या उजव्या हातात एक फूल आहे, व खालच्या उजव्या हातात एक लाकडी दीप आहे ही मूर्ती ६ फूट ४ इच उंचीची आहे ह्या मूर्तीच्या वरच्या डावे



मंदिराचे दरवाजाची पट्टी

हातातील सुरनळीवरून सामान्य लोकांना तो चाबूक वाटतो म्हणून स्थानिक लोक त्याला चाबूकराय म्हणतात रात्री तो घोड्यावरून फिरतो व जनतेचे रक्षण करतो अशी श्रद्धा आहे. ह्या ब्रह्मदेवाचे अंगावर हरणाचे कातडे दाखवलेले आहे



ब्रह्मदेवमूर्ति

गळ्यात जानवे आहे कमरेला एक पट्टा दाखवलेला आहे कमरेचे वस्त्र गुडघ्यापर्यंतच आहे हातात सुवर्णाची कडी आहेत डाव्या हातातील बोटात आंगठ्या आहेत उजवे हाताला सपाट मनगटी पट्टा व शिवाय कडी आहेत खालच्या बाजूला १ फुटाचे पट्टीत दोन्ही बाजूला स्त्रीमूर्ती आहेत डावे बाजूच्या स्त्रीच्या हातात यज्ञाच्या समिधा आहेत उजव्या बाजूच्या स्त्रीच्या डाव्या हातात तेलाचा बुधला व उजवे हातात एक लोण्याची थाळी आहे ह्या स्त्रीच्या समोर एका हातात तलवार घेतलेली एक लहान मूर्ति आहे व पुढे हंस आहे हंस हे ब्रह्मदेवाचे वाहन आहे हे प्रसिद्धच आहे. अशी एक ब्रह्मदेवाची मूर्ती निर्मळ येथे सुरेश्वर मंदिराचे अंगणात सतीच्या पाराला टेकून ठेवलेली आहे ती भगलेली आहे, परंतु ब्रह्मदेवाचीच आहे हे ओळखता येते ती मूर्ती परशुरामाने विमल तलावाचे मध्यभागी विमलेश्वर महादेवाची स्थापना केली चारही बाजूला यम, वरुण, कुबेर, इंद्र इत्यादी देवता स्थापन केल्या विमलनारायण विष्णूची स्थापना केली, तशीच ब्रह्मदेवाचीही केली असावी व त्यातील ती मूर्ती असावी

परंतु चक्रेश्वर महादेव प्रांगणातील मूर्ती गास खेड्याच्या हद्दीतील सोनार-पाडा भागातील एका शेतात मिळाली. ब्रह्मटेकडी गास हद्दीतच आहे. ब्रह्मालय-तीर्थ तेथेच आहे ही मूर्ती गास हद्दीतच मिळाली ही सगती एवढे निश्चित सांगते की ब्रह्मटेकडीवर ब्रह्मदेवाचे प्रचंड देवालय असले पाहिजे मूर्तिभंजक फिरंगी व मुसलमान ह्यांच्यापासून रक्षण करण्यासाठी ब्रह्मदेवाचे भक्तानी मोठ्या कष्टाने हलवून, शेतात गाडून मूर्तीचे रक्षण केले आज गास गावात एकही हिंदू देवालय

नाही बरीच वस्ती बाटून खिश्चन झालेली आहे. परतु फार प्राचीन काळी ब्रह्मदेव मंदिर येथे असलेच पाहिजे ह्याची ही साक्ष आहे सामान्यत ब्रह्म-देवाची मंदिरे फारशी असत नाहीत, त्यांची पूजा कोणी करीत नाही. काही शापाचे कारण पुराणात दिलेले आहे परतु ह्या भागात ब्रह्मदेवाची एवढी प्रचड सुमारे ७ फूट उंचीची सुदर शिल्पमूर्ती सापडावी, ब्रह्मटेकडी आजतागायत आहे, ब्रह्मकुंडही आहे, म्हणजेच पुराणनिर्मितीपूर्वी ब्रह्मदेवाची जेव्हा पूजा होत होती, तेव्हापासून हे स्थान फार महत्त्वाचे असले पाहिजे इतर अवतारापूर्वीपासूनची संस्कृती येथे आजपर्यंत नांदत होती, हीच ह्या स्थानाच्या प्राचीनतमत्वाची खूण होय ब्रह्मदेवाची एवढी प्रचड मूर्ती साऱ्या हिंदुस्थानात आजपर्यंत कोठे सापड-ल्याचे, घडवल्याचे ऐकिवात नाही भारतातील अतिप्राचीन संस्कृतीचे अवशेष मोठ्या प्रमाणावर सापडण्याची शक्यता फक्त याच भागात आहे हे नाकारता येणार नाही परतु ह्याचे उत्खननकार्य सरकारी पातळीवरूनच व्हावे लागेल भारतीय शासनाला जेव्हा भारताच्या प्राचीनतम संस्कृतीशोधाची खरी आच लागेल तेव्हाच हे शक्य होण्यासारखे आहे.

ब्रह्मदेवाचे मूर्तीजवळ दोन शिळा उभ्या करून ठेवलेल्या आहेत एका शिळेवर दोन शिवलिंगे असून दोन स्त्रिया त्यांचे पूजन करीत आहेत असे दाखवले आहे. दुसऱ्या शिळेवर एक शिवलिंग असून एक स्त्री त्याचे पूजन करीत आहे व खालचे बाजूला एक प्रेत दाखवले आहे बहुधा त्या प्रेतपुरुषाला सद्गती द्यावी अशी प्रार्थना चालली असावी.

ब्रह्मदेवाचे मूर्तीचे मागील प्राचीन वडाचे झाडाचे ढोलीत एक पारसनाथाची ६ इंच उंचीची सुंदर मूर्ती होती मूर्ती नग्न असून त्याचे डोक्यावर पंचमुखी नागाचा फणा काढलेला होता हा जैनांचा तेविसावा तीर्थंकर असावा असे गॅझेटिअर म्हणतो. सध्या ही मूर्ती तेथे अस्तित्वात नाही कुठे गेली हे सांगणे कठीण आहे

वडाचे झाड, चक्रेश्वर महादेव मंदिर, दीपमाळ ह्या सर्वांचे समोर प्रसिद्ध चक्रतीर्थ आहे हा तलाव सदैव पाण्याने भरलेला असतो घाटाच्या पायऱ्या आजही ओबडधोबड रूपात अस्तित्वात आहेत हा तलाव चांगला बांधून काढलेला असावा. फिरग्यांच्या अस्मानी सुलतानी राजवटीत त्याचा नाश झाला असावा तलावाची लांबी ५४० फूट व रुंदी ३६० फूट असा हा काटचौकोनाकृती आहे. ह्या तलावाचे मध्यभागी एक कुंड आहे, तलाव अतिशय रमणीय आहे. पूर्वी ह्यामध्ये सोनकमळे फुलत असत आता काही नाही सध्या हा तलाव मासे मारण्यासाठी लिलावाने देतात यदा सुमारे २५,००० रुपयास लिलाव गेला असे

समजले. सोपारा ग्रामपचायत हद्दीत सध्या हा एकच तलाव अस्तित्वात आहे हेच ते पुराणांतरीचे चक्रतीर्थ. ह्याचे धार्मिक माहात्म्य तीर्थे या प्रकरणात दिले आहे.

## बुरुड राजाची कथा

ह्या तीर्थासंबधी एका बुरुड राजाची कथा प्रसिद्ध आहे ह्या भागात इ. स. पूर्व सुमारे २०० च्या आसपास एक बुरुड राजा राहात होता त्याचा कोट व राजवाड्याचे अवशेष गास हद्दीत आजही उपलब्ध आहेत हा व्यवसायाने बुरुड म्हणजे टोपल्या विणणारा होता. हा राजा असला तरी अत्यंत साधेपणाने राहात असे स्वत हाताने टोपल्या विणून उपजीविका चालवी त्याच्या राजवाड्यात नोकर, दासदासी इत्यादी कसलाही लवाजमा नव्हता. साधी राहणी व उच्च विचारसरणी ह्यांचे तो मूर्तिमंत प्रतीक होता परमेश्वरावर त्याची नितांत श्रद्धा होती. प्रजेवर त्याचे अपरंपार प्रेम असे त्याचे राज्यात भाडणतंटा नव्हता, कर नव्हते, सैन्यही नव्हते

त्याला एक राणी होती तीसुद्धा अत्यत पतिभक्त होती नवऱ्याप्रमाणेच तिची राहणी साधी असे नवऱ्याप्रमाणेच ती कष्ट करी, घरकाम करीत असे नवऱ्याला रोज आपल्या हाताने रांधून वाढीत असे पतीचा संतोष हाच तिचा आनंद होता पतीवर तिचे अत्यत प्रेम होते. तशीच ईश्वरावर तिची अत्यत श्रद्धा होती

रोज सकाळी लवकर उठून ती चक्रतीर्थावर पाणी भरण्यासाठी जात असे तीर्थावर इतर बायका काठावरच पाणी भरीत, परंतु ही सरळ पाण्यावरून चालत जात असे व मध्यभागाच्या कुडातील पवित्र पाणी घेऊन घडा डोक्यावर घेऊन पाण्यावरून चालत किनाऱ्यावर येत असे तिच्या नितांत श्रद्धेने तिला ही सिद्धी प्राप्त झाली होती. पाणी आणून ती श्रीचक्रेश्वर मंदिरात जाई, श्रीशिवशंभूला स्नान घाली, मनोभावे पूजा करी व मग पाणी घेऊन घरी येई त्या पवित्र पाण्याने ती स्वयंपाक करी व माध्यान्ही नवऱ्याला रुचकर जेवण करून वाढीत असे तिचा प्रसन्न हसतमुख चेहरा, प्रेमळ वृत्ती, परोपकारी स्वभाव, साधी राहणी ह्यामुळे ती सर्वांना हवी हवीशी वाटे.

चक्रतीर्थावर रोज स्नान, कपडे धुणे, पाणी भरण्यासाठी गावातल्या बायका असत जमत राणी तेथे आली की त्या अवाक् होत. ती पाण्यावरून चालत जाऊ लागली की डोळे फाडून पाहात राहात मनोमन तिच्या सर्व चांगुलपणाचा त्यांना मत्सर वाटत असे. पण ती राणी होती त्यामुळे त्या तिला घाबरून होत्या. परंतु



श्रीचक्रतीर्थ

राणी साधी होती; भोळी होती सर्वांशी मोकळेपणाने बोले; दुखल्याखुपल्याची चौकशी करी आणि घरी जात असे काही मत्सरी बायकांना तिचे हे समाधान, सुख पाहवत नव्हते. त्यानी तिची फजिती करण्याचे ठरवले

एक दिवस कोठल्या तरी सणाच्या दिवशी त्या स्त्रिया दागदागिने घालून व नटून पाणी भरायला चक्रतीर्थावर आल्या. थोड्या वेळाने राणीदेखील आली त्यांच्याशी थोडे बोलण्यासाठी थाबली त्यांनी पाहिले, राणीच्या गळ्यात-अगावर एकसुद्धा दागिना नाही तेव्हा एकजण म्हणाली, "हे काय राणीसरकार, आपण आजच्यासारख्या सणाच्या दिवशीसुद्धा अशा कशा? एकसुद्धा अलकार कसा घातला नाही?"

"मजजवळ अलकारच नाहीत शिवाय अलकाराची जरूरच काय?" तेव्हा दुसरी म्हणाली, "वा वा! अलकार हे स्त्रियांचे भूषण आहे. त्याने सौंदर्य वाढते! तुमच्या यजमानांनी तुम्हांला दागिने कसे केले नाहीत? माझे यजमान मला दर सणाला एक तरी नवा अलकार करतातच" तेव्हा तिसरी म्हणाली. "सरकार, तुम्हाला काय, तुम्ही बोलण्याची खोटी, तुमचे यजमान हवे ते दागिने करून घालतील तुम्ही मागत का नाही?" राणी म्हणाली, "अहो, पण दागिने हवेत कशाला? माणसाचे खरे सौंदर्य त्याच्या अतःकरणात आहे, स्वभावात आहे" तेव्हा पहिली म्हणाली, "राणीसरकार, तुम्ही काही म्हणा, पण स्त्रीला अलंकाराचीच शोभा उगीच नाही महालक्ष्मीसारखी देवतासुद्धा अलंकारयुक्त

असते! स्त्रीला दागिने हे पाहिजेतच. तेजस्वी हिऱ्यालासुद्धा सुवर्णाचे कोंदण लागते" दुसरी म्हणाली, "बाईसाहेब, तुम्ही सरकारस्वारीजवळ दागिने मागाच तुम्हाला ते रासभर दागिने देतील!"

र णी तेथून निघून उद्योगाला लागली. पण आज रोजची प्रसन्नता नव्हती कलीने शरीरात प्रवेश केला होता जेवताना राजाने विचारले, "का ग? अशी गभीर का दिसतेस? प्रकृती बरी नाही का?" राणी म्हणाली, "छे! काही होत नाही." पण राजाला आज तिचा चेहरा प्रसन्न वाटला नाही म्हणून तोही गभीर झाला राणी वामकुक्षी घेत पडली तिच्या मनात विचार सुरू होते, 'खरच का स्त्रीला दागिन्याशिवाय शोभा नाही? महालक्ष्मीसुद्धा अलकार धारण करते तेव्हा खरच असाव!'

राजा स्वस्थ होता, पण राणी सारखी कुस बदलत होती राजाने विचारले, "खरं सांग, तुला काय होतय? कुणी तुला बोलले का? अपमान केला का? कसला विचार करतेस साग पाहू?"

राणी म्हणाली, "महाराज, आज चक्रतीर्थावर गावातील बायका दागदागिने घालून आल्या होत्या फार सुदर दिसत होत्या! त्यानी विचारले, 'बाईसाहेब, तुम्ही एवढ्या राणीसरकार आणि एकसुद्धा दागिना कसा अगावर नाही?' मी विचारले, 'दागिने पाहिजेत कशाला? अत करणात सार सौंदर्य असते' तशी त्या म्हणाल्या, 'बाईसाहेब, ते झाले तत्त्वज्ञान, पण दागिन्याशिवाय स्त्रीला शोभा नाही, अहो, हिऱ्याला सुद्धा सुवर्णाचं कोंदण लागते. एवढी मोठी महालक्ष्मी पण तीही दागिन्यानी खचलेली असते.' मला वाटले ते बरोबर आहे मला तुम्ही अलकार करा."

राजा म्हणाला, "अग, तू मुळातच एवढी रूपवती आहेस की सुवर्णाची झळाळी, हिऱ्याची चमक, मोत्याचे तेज सारे तुझ्यापुढे फिक्के पडावे, एवढे तुझे दिव्य रूप सौंदर्य आहे! तुझे अतःकरण तर त्याहून तेजस्वी आहे तुला दागिन्यांची आवश्यकताच कशासाठी?"

परतु राणी म्हणाली, "सामान्य स्त्रियासुद्धा अलकार घालतात. मी राणी असूनही मला का नसावेत?" राजाने ओळखले, हिला राणीपदाचा-मोठेपणाचा गर्व चढला आहे "ठीक आहे एवढेच म्हणणे ना? उद्या तुला पाहिजे ते अलकार आणून देतो हिऱ्याचे, सोन्याचे, मोत्याचे बस्स? आता जरा हास बघू" राणी खुदकन हसली. राजा प्रसन्न झाला म्हणाला, "आता दागिने आणायला जातो राजाने झोळी घेतली व प्रजेकडे घरोघर गेला एकाने विचारले, "यावे महाराज. काय हुकूम आहे?" राजा म्हणाला, "बाबा रे, हुकूम काही नाही. पण कर

मागायला आलो आहे " त्याला वाटले, काही तरी राजावर संकट आले आहे; आपण राजाला सर्वतोपरी साहाय्य केलेच पाहिजे तो म्हणाला, "महाराज, सर्व काही आपलेच आहे आपण पाहिजे तेवढे खुशाल घेऊन जा " राजा म्हणाला, "छे, छे ! फक्त एक नागवेलीचे पान द्या " तो बघतच राहिला पण एक पान त्याने राजाच्या झोळीत टाकले असाच राजा घरोघर फिरला. प्रत्येकाकडून एकच नागवेलीचे पान कर म्हणून घेतले. लोकही आश्चर्याने थक्क झाले. राजा कधीही कर घेत नाही आणि आज मागायला आला, तर एकच नागवेलीचे पान घेऊन गेला लोकांना काही उलगडेना परंतु प्रजेची राजावर फार भक्ती होती. ते काही बोलले नाहीत गप्प बसले

सध्याकाळी राजा घरी आला राणी हसतमुखाने त्याला सामोरी आली. राजाचा चेहरा जरा ओढलेला वाटला पण ती काही बोलली नाही राजा म्हणाला, "तुला पाहिजे असतील तसले सर्व दागिने मी आणलेले आहेत " असे म्हणून त्याने झोळी तिच्या हवाली केली राजा दमला होता म्हणून पडून राहिला राणीने झटपट स्वयपाक केला, नवऱ्याला रुचकर जेवू घातले, त्याचे पाय चेपले थोड्या वेळात राजाला झोप लागली तेव्हा राणी उठली तिने खुटीवरची झोळी काढली आणि पाहू लागली झोळीतून एक अलकार काढू लागली अस्सल हिऱ्याचे दागिने, हार, रत्नमाला, बाजूबंद-बागड्या, कर्णभूषणे किती आणि किती सुदर ! सर्व दागिने घालून आरशात पाहिले. तिचा आनद गगनात मावेना तिने दागिने ठेवून दिले आणि झोपी गेली. डोक्यात दागिन्यांचेच विचार होते त्यामुळे तिला रोजच्या सारखी शांत झोप लागली नाही पहाटेसच ती उठली, सर्व दागिने अगावर घातले व दिवस उजाडताच चक्रेश्वरतीर्थावर घडा घेऊन निघाली

चक्रतीर्थावर नित्याप्रमाणे गावातील बायका पाण्याला आल्याच होत्या. त्यांतली एक म्हणाली, "अहो, कालच्या आपल्या बोलण्याचा बराच परिणाम झालाय असे वाटते " दुसरी म्हणाली, "अग, कसला परिणाम ? दरिद्री राणीचा नवरा काल घरोघर एक पान नागवेलीची भिक्षा मागत हिंडत होता. तो काय तिला दागिने करणार ? " "एका नागवेलीच्या पानाने का कुठे दागिने होतात ? आम्ही, एवढे खपतो, सर्व बाग विकतो तरी पोटाला पुरेसे मिळत नाही. तो कसले करतो दागिने ? "

एवढ्यात दूर अतरावरून कोणी रूपवती स्त्री झगझगीत अलकारांनी लवून गजगतीने येताना दिसली. एक म्हणाली, "अग, ते बघ कोण येते आहे जणू महालक्ष्मीच दिसते आहे ! " सर्व जणी टवकारून पाहू लागल्या. ती जसजशी जवळ आली तसेतसे त्यांचे चेहऱ्यावरचे भाव बदलू लागले. त्या एकदम अवाक् होऊन विस्फारलेल्या नजरेने दागिन्यांनी नटलेल्या राणीकडे पाहू लागल्या. राणीने जवळ

घेताच एक प्रसन्न हास्य केले आणि सावकाश स्नान केले पुन्हा कपडे व अलंकार ल्याली आणि पाण्याचा घडा घेऊन पाणी आणण्यासाठी नेहमीच्या सवयीप्रमाणे चक्रतीर्थाच्या मध्यभागी जाण्यासाठी पाण्याच्या पृष्ठभागावर पाऊल टाकले, आणि धप्पकन् खाली कोसळली व पाण्यात पडली. कपडे ओले झाले परंतु तिला वाटले, आपले तंद्रीमुळे काही चुकले असेल पुन्हा उठली; परंतु पुन्हा प्रयत्न करताच पुन्हा आदळली कपडे चिखलाने माखले राणी घाबरली निराश झाली आज तिला चक्रतीर्थाच्या मधल्या कुंडातील पाणी आणता येईना. तिची जलतरणसिद्धी तिला सोडून गेली होती

त्या बायकांना ब्रह्मानंद झाला त्या खि खि करून हसल्या. पण कोणी तिला सावरायला, सहानुभूती दाखवायला सुद्धा आले नाही राणीने खिन्न मनाने काठावरून पाण्याचा घडा भरून घेतला आणि चक्रेश्वराला वंदन केले राणीने पश्चात्तापाच्या अश्रूंनीच श्री चक्रेश्वराला अभिषेक केला देवाला म्हणाली, "देवा, माझी चूक झाली मी माझ्या पतिदेवाना माझ्यासाठी फार कष्ट दिले मला क्षमा कर!" श्री चक्रेश्वर प्रसन्न झाले राणी घरी गेली स्वयपाक केला राजाला जेवायला वाढले राजाला आज अन्नाला रुची लागेना राजा बोलला नाही पण पाणी प्यायला तर पाणी पण बेचव! राजाने राणीला विचारले, "काय ग, पाणी आज गढूळ व बेचव का लागते आहे?" राणीने झालेली हकीगत राजाला सांगितली.

राजा म्हणाला, "पाहिलेस? त्या मत्सरी स्त्रियांनी तुझ्यात गर्व निर्माण केला तुझी मनःशांती भंग पावली, तुझी एकाग्रता नष्ट झाली म्हणून तुझी जलतरणसिद्धी नष्ट झाली" राणी म्हणाली, "महाराज, माझी चूक झाली मी तुम्हाला कष्ट देऊन माझ्या देवाला माझ्या अलकारांसाठी दारोदार फिरवले ह्याचे प्रायश्चित्त मला मिळाले! महाराज, हे अलंकार मला नकोत तुम्ही एवढे मोठे माझे पतिदेवरूपी अलंकार असताना मला त्याची जरूरी नाही" असे म्हणून तिने सर्व अलंकार काढून टाकले पुन्हा ती लकेची पार्वती झाली पश्चात्तापाने अंतःकरण धुऊन स्वच्छ झाले राजाराणी हसली व संतोषाने झोपी गेली

राणी सकाळी लवकर उठली. अलंकारांचे गाठोडे घेतले, पाण्याचा घडा घेतला आणि श्रीचक्रेश्वराला गेली स्नान केले गाठोडे सोडले व एकएक अलंकार चक्रेश्वराला अर्पण केला. नमस्कार केला. मन प्रसन्न झाले. घडा घेऊन रोजच्याप्रमाणे तीर्थाच्या मध्यभागी जाण्यासाठी पाण्यावर पाऊल टाकले. पण काय आश्चर्य! ती पडली नाही. एक एक पाऊल टाकू लागली, मध्यापर्यंत गेली. मधल्या कुंडातील पवित्र पाणी भरून घेतले, घडा डोक्यावर घेतला व पाण्यावरून चालत काठाकडे येऊ लागली. मत्सरी बायका आ वासून तिच्याकडे पाहात राहिल्या. ती किनाऱ्यावर आली. घडा घेऊन चक्रेश्वर मंदिरात गेली घड्यातील

पाण्याने भगवान श्रीचक्रेश्वरावर अभिषेक केला आणि काय आश्चर्य ! सर्व दागिन्याची पुन्हा नागवेलीची पाने झाली. राणी प्रसन्न मनाने घडा घेऊन घरी गेली.

राजाला रुचकर स्वयपाक करून वाढला राजा तिची प्रसन्नता पाहून फार खूष झाला. म्हणाला, "आज पाणी अगदी अमृतासारखे लागते बुवा !" राणी खुदकन हसली. राजा सुखावला. राजाराणी संतोष पावली.




बुरुड राजाचा कोट

ही चक्रेश्वरतीर्थाची कहाणी घरोघर आजही लोक भक्तिभावाने सांगतात बुरुडराजाचा कोटही आहे राजवाड्याचे अवशेषही अजून अस्तित्वात आहेत. भगवान श्री चक्रेश्वर मंदिरही अस्तित्वात आहे आणि ज्या चक्रतीर्थावर ही घटना घडली ते चक्रतीर्थही अजून अस्तित्वात आहे मग एवढीच लोककथा खरी नसेल कशावरून ?

卐 卐 卐

# ६. श्री तुंगारेश्वर महादेव

हे एक अतिप्राचीन असे रमणीय पवित्र स्थान आहे. ठाणे जिल्ह्यात वसई रोड स्टेशनचे पूर्वेला असलेल्या तुंगार नावाच्या डोंगरराजीत हे स्थान आहे तुंगारपर्वताच्या दोन-तीन रागा दक्षिणोत्तर पसरलेल्या आहेत. त्यांची जास्तीत जास्त उंची २२०० फूट आहे ह्या पर्वताला ह्या भागातील लोक मदाग्नि पर्वत




श्रीतुंगारेश्वर महादेव मंदिर

म्हणतात प्राचीन काळी येथे ज्वालामुखीचे विवर असावे कारण ह्याच डोंगरावर भस्म सापडते. आता तुंगार डोंगरात बॉक्साइटच्या खाणी आहेत असा शोध लागला आहे

वेस्टर्न रेल्वेवरील वसई रोड स्टेशनवरून ह्या ठिकाणाकडे जाणाऱ्या बसेस सुटतात. साधारणत दर तासाला बस आहेच वसई–ठाणे, वसई–कामण, वसई-जूचंद्र, वसई-उत्तन ह्या बसेस जातात ह्यापैकी कोणत्याही बसने गेले तरी प्रथम गोखिवरे गाव लागते नंतर दोन स्टॉप सोडले म्हणजे सातिवली स्टॉप येतो. येथे उतरावे लागते. येथून तुंगार डोंगराकडे जाणारा रस्ता डाव्या बाजूला आहे त्या मार्गाने सरळ गेले म्हणजे अर्ध्या मैलावर मुंबई-अहमदाबाद हा राष्ट्रीय हमरस्ता आडवा जातो तो ओलांडून पुढे जो रस्ता दिसतो तोच तुंगारेश्वर महादेवाकडे जाण्याचा रस्ता तसा नावाचा बोर्डही तेथे आहे त्या रस्त्याने सुमारे दीड-दोन मैल गेले म्हणजे आपण दोन डोंगरांच्या मध्ये अगदी पायथ्याशी येतो. तेथून एक नाला ओलांडला की चढाव सुरू होतो हा चढावाचा रस्ता फार चांगला आहे. जीप, लॉरी वगैरे उंच चाकाच्या मोटारी सहज चढून जातात.

चढाव सुमारे दोन मैलांचा आहे. डावे बाजूच्या डोंगराच्या जवळ जवळ शिखरापर्यंत आल्यावर तेथे एक ठिकाणी डावे बाजूला जाणारा रस्ता फुटतो; तो तुंगारेश्वर महादेव मंदिरापर्यंत जातो हा छोटासा फाटा आहे

हे शिवमंदिर दोन डोंगरांच्या शिखराच्या घळीत आहे. आपण जातो ते मंदिराच्या प्रांगणांत पोहोचतो समोर डावे बाजूला मंदिराचा प्रचंड सभामंडप दिसतो हा सभामंडप सुमारे ३० फूट लांब व ३० फूट रुंद असा प्रशस्त सिमेंट कॉंक्रीटचा बांधलेला आहे मूळ मंदिराचा गाभारा मूळचा होता तसाच दगडी आहे गाभारा सुमारे १० फूट लांब व १० फूट रुंद आहे आतील भाग थोडा खोलगट असून चांगला गुळगुळीत फरशीचा केलेला आहे मध्यभागी भव्य दिव्य



श्रीतुंगारेश्वर महादेव-दिव्य शिवलिंग

शिवलिंग असून त्याची लांबी सुमारे पाच फूट येईल व गोलाकृती भागाचा व्यास सुमारे तीन फूट येईल शिवलिंगावर मुखवटा असतो. वर अभिषेकपात्र टांगलेले आहे. पाठीमागील कोनाड्यात श्री पार्वतीची लहान मूर्ती आहे हे शिवलिंग काळेभोर असून एकदम पाहताक्षणीच त्याच्या दिव्यत्वाची साक्ष पटते.

गाभाऱ्याचे दर्शनी भागी दरवाजाचे उजवे बाजूस गणपती व डावे बाजूस विष्णू (परशुराम) मूर्ती आहे. सभामंडपात गाभाऱ्यापासून सुमारे २० फुटावर नंदी आहे मंदिराचे छतावर सुंदर सर्पाचे डिझाइन काढलेले आहे. तिन्ही बाजूनी सीमेंटचे जाळीदार कठडे आहेत. सभामंडपाबाहेरील अंगणात समोरच दीपमाळ

आहे त्याचे जवळ एक तुळशीवृंदावन दिसते. त्याचे जवळ एक छोटेसे मारुतीचे मंदिर आहे. दीपमाळेचे जवळ एका नागा साधूची समाधी आहे हनुमान मंदिराचे पलीकडे एक अतिथिगृह बांधलेले आहे तीन खोल्या आहेत ह्या खोल्या दिवसास ५ रु प्रमाणे भाड्याने मिळतात वापरण्यासाठी भांडी भाड्याने देतात एक बैठक देतात परंतु बाकी काही वर मिळत नाही सर्व सामानसुमान, अन्नधान्य सर्व बरोबर आणावे लागते मंदिराचे डावे बाजूस एक दोन खोलींची चाळवजा इमारत आहे तेथे मंदिराचे व्यवस्थापक श्री चावक राहतात त्याचे समोरच मंदिराचे डावे बाजूला एक मोठी विहीर आहे विहीरीचे पाणी फारच थंड व गोड आहे. अतिथीगृह व दीपमाळ ह्यांचे जवळील पटांगणात आंबा, आपटा, आवळा वगैरे वृक्ष आहेत मंदिराचे पाठीमागे एक खोली आहे. त्यात काळभैरवाची फार प्राचीन मूर्ती आहे. ही मूर्ती सुमारे तीन फूट उंचीची असून हातामध्ये त्याने सर्प धरला आहे सापाचे तोंड डावे हातात व शेपूट उजवे हातात आहे. मूर्ती काळ्या पाषाणाची आहे



श्रीजगन्माता श्रीअंबा

मंदिराचे बाजूचे विहीरीवरून पुढे अतिथीगृहाचे समोरून डावे बाजूला आपण खाली ओहोळाकडे जाऊ लागतो व नंतर तो रस्ता ओहोळापलीकडे असलेल्या पर्वताच्या शिखराकडे जातो त्या रस्त्याने १००–१५० फूट चढून गेले म्हणजे वर एक छोटे जगन्माता अंबेचे मंदिर दिसते आपण त्या मंदिराचे मागील प्रांगणात पोहोचतो. तेथे एक साधूची झोपडी आहे. डावे बाजूला दोन बांधून काढलेली कुंडे आहेत. कुंडाची लांबी ८ फूट X रुंदी ६ फूट व ८ फूट खोल अशी मापे आहेत. डोंगरातून अखंड वाहणारा एक झरा कुंडात पडत असतो. परंतु कुंडात पाणी साठून राहू नये व लोकांनी उगाच स्नाने वगैरे करू नये म्हणून खालच्या बाजूने ते पाणी हल्ली बाहेर काढून लावले आहे त्याचे जवळच दुसरे एक कुंड त्याच मापाचे आहे. त्यांतही एका झऱ्याचे पाणी येऊन पडते व तेही बाहेर काढून लावलेले आहे परंतु पाणी नळासारखे अखंड पडताना दिसते.

निर्मळ-माहात्म्यात तुंगार पर्वतावर पंचपवित्र कुंडे आहेत असे वर्णन केलेले आहे त्याची नावे शीळा कुंड, कपिलकुंड, अरोग कुंड, जखेश्वरी कुंड व पाचवे भैरवकुंड अशी आहेत. ही पाच कुंडे म्हणजे वर सांगितलेली दोन, त्याची नावे जखेश्वरीकुंड व भैरवकुंड होत भैरवाचे मंदिर तुंगारेश्वराचे मागेच आहे व जगन्माता म्हणून देवीचे मंदिरासमोरच आहे जखेश्वरी देवी म्हणजे जगन्माता अंबिका होय सध्या तर ह्या देवीला अपभ्रंशाने लोक जागमाताच म्हणतात. तुंगारेश्वराचे पाठीमागील ओहोळाचे काठाने सुमारे ३०० फूट खाली गेले म्हणजे खडकात नैसर्गिक रीतीने झालेली दोन कुंडे आहेत ही कुंडे भरभरून वाहात असतात. ह्या कुंडांना खालून कोठून तरी झरे असावेत कुंडे चांगली १५० चौरस फूट विस्तृत आहेत, व अतिशय खोल आहेत. म्हणून त्यात उतरू नका, धोका, अशा सूचना लिहिलेल्या आढळतात ही कुंडे म्हणजे शीळातीर्थ व कपिलकुंडे होत परंतु ह्याला लोक ठोकून धर्मकुंड म्हणतात कारण काही लोक त्यावर क्रियाकर्मांतर, स्नानदान करतात. पाचवे अरोगकुंड जवळपासच असावे

तुंगारेश्वर मंदिराकडून पुन्हा मूळ चढावाच्या रस्त्याने आपण वर चढू लागलो म्हणजे सुमारे मैलभर चढल्यावर आपण पठारी भागात येतो वाटेवर श्री संत सदानंद बाबांचे मठाकडे असा मार्गदर्शक फलक लागतो वरील भाग पठारी असून तीन मैलांचा आहे हे पठार दक्षिणोत्तर पसरलेले असून उत्तर टोकाकडे वैतरणा पॉईंट आहे. त्याचे पलीकडील भागातून पवित्र वैतरणी नदी वाहते खालपासून वरपर्यंत सर्व तुंगारेश्वर पर्वत वनराजीने नटलेला आहे वैतरणा पॉईंटवर एक नैसर्गिक हौदच आहे. त्याची लांबी ३६ फूट, रुंदी व खोली ६ फूट अशी आहे त्याच्या जवळच २० फूट लांब, १२ फूट रुंद अशी तीन कुंडे आहेत. ही कुंडे थोडी उतारावर आहेत

वैतरणा पॉईंटवर एक तळे आहे. त्याच्या उत्तर बाजूला काही जैन गुंफा आहेत त्या इ स १२३४ मध्ये बाधलेल्या आहेत; परंतु अपूर्ण अवस्थेत आहेत त्यांत आता पाणी भरलेले असते; लोक त्यालाच पांडवकुड म्हणतात ह्या टेकडीच्या शिखरावर एका जैन साधूचा पुतळा आहे; व डोक्यावर रजपूत पद्धतीचा फेटा आहे हा पुतळा पोर्तुगीझ फिरग्यांनी फोडलेला आहे

ह्या शिखरापासून ३०० फुटांवर व्हलचर्स झरा आहे व्हल्चर्स म्हणजे गिधाड; परतु आमचे माहितीप्रमाणे निर्मळ-माहात्म्यात वर्णन केलेले गरुडकुड ते हेच होय. ह्याचे पाणी फार चागले आहे ह्या शिखराचे पश्चिम उतारावर आणखी एक पारडी नावाचा झरा ३०० फूट खाली आहे तसेच निर्मळ-माहात्म्यात वर्णन केलेले भृकुड-ऋषी-तीर्थ ४०० फुटावर आहे ह्याला भक्तिकुड–व आता तर भार्तखिड-असेच लोक म्हणतात केतकीकुड तुगारच्या दक्षिण टोकाला पश्चिम उतारावर आहे

ह्याशिवाय आणखी पंधरा कुडे-झरे ह्या तुगार पर्वतावर आहेत त्याची स्थानिक नावे पुढीलप्रमाणे :–

(१) आराकुंड (२) चिरबावकुड (३) घरटयाचे पाणी (४) हौद (५) काष्ठीकुड (६) तुरबाकुंड (७) कुड (८) नद्याचे पाणी (९) पारीकुड (१०) राहाटवलीकुड (११) शिरकाठीकुड (१२) तळ्याचे पाणी (१३) बरसाकुड (१४) वेहळाकुड (१५) झापाकुड.

ह्याची प्राचीन तीर्थनामे उपलब्ध नाहीत. परंतु एकूण १०८ कुडे–तीर्थे ह्या परिसरात होती, तर प्रत्यक्ष नावे फक्त ७५ पर्यंतच आढळतात.

७५ पर्यंत ज्या अर्थी तीर्थ नामे उपलब्ध आहेत, त्या अर्थी उरलेल्या सर्व कुड-झरे ह्याना तीर्थनामे ठेवलेली असलीच पाहिजेत. परतु दुर्दैवाने विस्मृतप्राय झाली आज उपलब्ध असलेली तीर्थनामे व ती कोठे आहेत ह्याची सगती पुष्कळास माहीत नाही म्हणून एका प्रकरणात आम्ही शक्य तेवढी माहिती दिली आहे त्यामुळे विस्मृतीस बराचसा आळा बसेल व लोकांची जिज्ञासा तृप्त होईल असा विश्वास वाटतो

देवगिरी-तुंगारेश्वर मदिर हे स्थान सुमारे ७००० वर्षांपूर्वीचे फार प्राचीन पवित्र स्थान असून भगवान शिवशंकरांच्या परमभक्त विमलासुराने स्थापन केले व प्रत्यक्ष श्री देवाधिदेव महादेव ह्यांचे हस्ते दिव्य शिवलिंगप्राप्ती करून घेतली व त्याना ह्या स्थळी भक्तप्रेमाने वास्तव्य करण्यास भाग पाडले ह्या स्थानाची निर्मितिकथा श्री निर्मळ-विमलेश्वर महादेवाच्या निर्मितीकथेत आलेली असल्या-मुळे येथे मुद्दाम दिलेली नाही



लेखक मंदिर-व्यवस्थापकांकडून माहिती घेताना


हे क्षेत्र एवढे प्राचीन आहे की काशीवाचून दुसरे ह्याचे बरोबरीचे स्थान नाही ह्या ठिकाणी प्रत्यक्ष देवाधिदेव तुंगारेश्वर महादेवांचा वास आहे हे अत्यंत जागृत स्थान आहे. ह्याचा प्रत्यय शेकडो लोकांना आलेला आहे ह्या तुंगार पर्वतांच्या रांगांपैकी चवथ्या रांगेतील पर्वताला चतुरंगण पर्वत म्हणतात. ह्या पर्वतावर भगवान परशुरामांचे वास्तव्य असते दर पौर्णिमेला ते तेथे येतात तेथे एक परशुराम मंदिर आहे, शिवालय आहे व त्यांत परशुरामांचा परशु ठेवलेला आहे असे म्हणतात

परशुरामांनी केलेल्या यज्ञाची वेदी पण सापडलेली आहे असे इतिहासकारांचे म्हणणे आहे नाला सोपारा स्टेशनचे पूर्वेला राक्षी नावाची एक डोंगरी आहे त्याचे नाव राक्षी पडण्याचे कारण तेथे यज्ञरक्षा सापडते परशुरामांची वेदी तेथेच असावी

तुंगारेश्वर पर्वतावर सध्या एक बालयोगी संत सदानंदबाबा राहतात त्यांचा मठ पांडवकुंडाजवळ आहे परवाच तेथे फार मोठा सत्यनारायण घालण्यात आला व असंख्य भाविकांची गर्दी उसळली होती श्री संत सदानंदबाबा जनमानसात फार लोकप्रिय असून लोक मोठ्या प्रमाणात त्यांचे दर्शनास जातात.

# ७. श्री सांब-सिद्धेश्वरमंदिर

हे मंदिर विमलतलावाचे ईशान्य कोपऱ्यावर आहे. ते एका प्राचीन विशाल वटवृक्षाखाली रस्त्यापासून थोड्या उतारावर असून पेशवे सरकारचे सुभेदार श्री. शंकराजी केशव फडके ह्यानी त्याचा जीर्णोद्धार केलेला आहे बाहेरील प्रांगणात एक मोठा नंदी दर्शनी दरवाजासमोर आहे. तलावाचे काठाजवळ एक विहीर आहे ह्या विहिरीला लोक रामकुंड समजून स्नान, दान, क्रिया-कर्मांतर करतात; परंतु सत्य म्हणजे हे रामतीर्थ नव्हे. प्रसिद्ध रामतीर्थ गास हद्दीत मळा भागात आहे हे आहे सांभवतीर्थ आता ह्या कुंडावर जनतेने विहीर बांधून काढली आहे दर्शनी दरवाजाबाहेर एक दत्तमंदिर हल्लीच बांधलेले आहे



श्री सांब-सिद्धेश्वर मंदिर

मंदिराचा भाग किंचित् अंधेराचा असून खोलगट आहे. मध्यभागी भव्य शिवलिंग असून वर अभिषेकपात्र आहे पाठीमागे कोनाड्यात श्री पार्वतीदेवीची

दीड फूट उंचीची मूर्ती आहे नित्य पूजा-नैवेद्याची व्यवस्था आहे. ह्या मंदिराला श्री शकराजी केशव फडके ह्याजकडून काही वार्षिक अनुदान आहे श्री सांब सिद्धेश्वर महादेवाचे मंदिर फार प्रसिद्ध व भक्ताना पावणारे दैवत आहे, असे मानले जाते.

जवळच्या रामवतीर्थावरच लोमहर्षण ऋषीची कन्या तपस्या करीत असता विमलासुर तिला पाहून मोहित झाला आणि तिचे अपहरण करू लागला. त्यातूनच विमलासुर व श्री भगवान परशुराम ह्याचे युद्ध उद्‌भवले. विमलासुराला भगवान् परशुरामाने विमल तलावाचे मध्यापाशी मारले त्याचे विनतीवरून श्री विमलेश्वर महादेव मंदिराची स्थापना केली व विमलतीर्थ विख्यात केले ह्या सर्व घटनेचा साक्षीदार श्री सिद्धेश्वर महादेव, कारण भगवान् परशुरामाने ह्याची स्थापना अत्रि-कश्यप इत्यादी ऋषीसाठी केली होती त्या ऋषीनी येथेच यज्ञाला सुरुवात केली होती लोमहर्षणऋषीकन्या येथेच होती. म्हणून ह्या स्थानाला ऐतिहासिक घटनात्मक महत्व आहे

निर्मळ अद्वितीय तीर्थ निर्माण होण्यास येथील घटनाच कारण झाली ह्या श्री सांब सिद्धेश्वराचे मंदिराचे मागे एका कोपऱ्यावर भव्य शिवलिंग ठेवलेले आहे ते तिळातिळाने प्रतिवर्षी वाढते 'ही नेहमीची लोकसमजूत येथेही आहे परंतु हे लिंग यथीलच कोठल्या तरी आणखी एखाद्या शिवमंदिरातले असावे

卐 卐 卐

# ८. श्री देवाधिदेव महादेव श्री सुरेश्वर महादेव


हे मंदिर सुद्धा परशुरामानेच निर्माण केले. पेशवेकाळात ह्याचा जीर्णोद्धार झाला ह्या सुरपुरीचे देवाधिदेव महादेव श्री सुरेश्वर असे नाव ठेवले हे मंदिर विमलतीर्थाच्या पलीकडे म्हणजे पश्चिमेला नैर्ऋत्य कोनी काठापासून जरा अंतरावर आहे मंदिराचा गाभारा १०×१० फूट असून आत दिव्य शिवलिंग आहे. पाठीमागे कोनाड्यात श्री पार्वतीची मूर्ती आहे लिंगावर अभिषेकपात्र टांगलेले आहे गाभाऱ्याचे बाहेर ओवरी असून दोन बाजूला दोन खोल्या काढलेल्या आहेत. ओवरीचे चौथऱ्याखाली दर्शनी दरवाजासमोर नंदी आहे. नंदी चांगला अलंकार-युक्त असून रंगवलेला आहे

मंदिराचे इमारतीचे बाहेर मंदिराचे उजवे अंगाला एक उंच चौथरा असून एका देवळीवजा जागी एक रती आसनातले ओबड धोबड श्रीपार्वतीचे शिल्प आहे लोक त्याची उपासना सुरेश्वरी म्हणून करतात ही देवी नवसाला पावते अशी लोकांची नितांत धारणा आहे, व नवस फेडल्याची चिन्हे तेथे नेहमी पडलेली असतात.

...५

# ७. श्री सांब-सिद्धेश्वरमंदिर

हे मंदिर विमलतलावाचे ईशान्य कोपऱ्यावर आहे. ते एका प्राचीन विशाल वटवृक्षाखाली रस्त्यापासून थोड्या उतारावर असून पेशवे सरकारचे सुभेदार श्री. शंकराजी केशव फडके ह्यांनी त्याचा जीर्णोद्धार केलेला आहे. बाहेरील प्रांगणात एक मोठा नंदी दर्शनी दरवाजासमोर आहे. तलावाचे काठाजवळ एक विहीर आहे ह्या विहिरीला लोक रामकुंड समजून स्नान, दान, क्रिया-कर्मांतर करतात; परंतु सत्य म्हणजे हे रामतीर्थ नव्हे. प्रसिद्ध रामतीर्थ गास हद्दीत मळा भागात आहे. हे आहे साभवतीर्थ. आता ह्या कुंडावर जनतेने विहीर बांधून काढली आहे. दर्शनी दरवाजाबाहेर एक दत्तमंदिर हल्लींच बांधलेले आहे.



श्री सांब-सिद्धेश्वर मंदिर

मंदिराचा भाग किंचित् अंधेराचा असून खोलगट आहे. मध्यभागी भव्य शिवलिंग असून वर अभिषेकपात्र आहे. पाठीमागे कोनाड्यात श्री पार्वतीदेवीची

दीड फूट उंचीची मूर्ती आहे नित्य पूजा-नैवेद्याची व्यवस्था आहे. ह्या मंदिराला श्री शंकराजी केशव फडके ह्यांजकडून काही वार्षिक अनुदान आहे श्री सांब सिद्धेश्वर महादेवाचे मंदिर फार प्रसिद्ध व भक्तांना पावणारे दैवत आहे, असे मानले जाते.

जवळच्या शाश्वतीर्थावरच लोमहर्षण ऋषींची कन्या तपस्या करीत असता विमलासुर तिला पाहून मोहित झाला आणि तिचे अपहरण करू लागला त्यातूनच विमलासुर व श्री भगवान परशुराम ह्यांचे युद्ध उद्भवले विमलासुराला भगवान् परशुरामाने विमल तलावाचे मध्यापाशी मारले त्याचे विनंतीवरून श्री विमलेश्वर महादेव मंदिराची स्थापना केली व विमलतीर्थ विख्यात केले ह्या सर्व घटनेचा साक्षीदार श्री सिद्धेश्वर महादेव; कारण भगवान् परशुरामाने ह्याची स्थापना अत्रि-कश्यप इत्यादी ऋषींसाठी केली होती त्या ऋषींनी येथेच यज्ञाला सुरुवात केली होती लोमहर्षणऋषीकन्या येथेच होती म्हणून ह्या स्थानाला ऐतिहासिक घटनात्मक महत्व आहे

निर्मळ अद्वितीय तीर्थ निर्माण होण्यास येथील घटनाच कारण झाली ह्या श्री सांब सिद्धेश्वराचे मंदिराचे मागे एका कोपऱ्यावर भव्य शिवलिंग ठेवलेले आहे ते तिळातिळाने प्रतिवर्षी वाढते 'ही नेहमीची लोकसमजूत येथेही आहे परंतु हे लिंग येथीलच कोठल्या तरी आणखी एखाद्या शिवमंदिरातले असावे

卐 卐 卐

# ८. श्री देवाधिदेव महादेव श्री सुरेश्वर महादेव

हे मंदिर सुद्धा परशुरामानेच निर्माण केले. पेशवेकाळात ह्याचा जीर्णोद्धार झाला ह्या सुरपुरीचे देवाधिदेव महादेव श्री सुरेश्वर असे नाव ठेवले हे मंदिर विमलतीर्थाच्या पलीकडे म्हणजे पश्चिमेला नैऋत्य कोनी काठापासून जरा अंतरावर आहे मंदिराचा गाभारा १०×१० फूट असून आत दिव्य शिवलिंग आहे. पाठीमागे कोनाड्यात श्री पार्वतीची मूर्ती आहे लिंगावर अभिषेकपात्र टांगलेले आहे गाभाऱ्याचे बाहेर ओवरी असून दोन बाजूला दोन खोल्या काढलेल्या आहेत ओवरीचे चौथऱ्याखाली दर्शनी दरवाजासमोर नंदी आहे. नंदी चांगला अलंकार-युक्त असून रंगवलेला आहे

मंदिराचे इमारतीचे बाहेर मंदिराचे उजवे अंगाला एक उंच चौथरा असून एका देवळीवजा जागी एक रती आसनातले ओबड धोबड श्रीपार्वतीचे शिल्प आहे लोक त्याची उपासना सुरेश्वरी म्हणून करतात. ही देवी नवसाला पावते अशी लोकांची नितांत धारणा आहे; व नवस फेडल्याची चिन्हे तेथे नेहमी पडलेली असतात



श्रीदेवाधिदेव सुरेश्वर महादेव

ह्या मंदिराचे प्रांगणात एक बांधून काढलेला चौथरा आहे जवळच दीपमाळ आहे. हा चौथरा म्हणजे कोणातरी पेशवेकालीन सतीचें स्थान आहे असे लोक सांगतात परंतु बाकी नावनिशाणी माहिती उपलब्ध नाहीं

ह्या चौथऱ्याला टेकून दोन चार शिल्पे ठेवलेली आहेत त्यातील दोन मोठी शिल्पे आहेत. एक आहे रेणुकादेवी 'ही देवी सुमारे ६ फूट उंच आहे. उभार वक्षस्थळ उघडे असून भरीव आहे डोक्यावर मुकुट आहे तिला चार हात आहेत कमरेला कटिवस्त्र असून गुडघ्यापर्यंत आहे गळयात अलंकार आहेत परंतु पाय पाउले जमिनीत गाडली गेली आहेत किंवा भग्न आहेत. लोक ह्या मूर्तीला संतोषीमाता म्हणून भजतात.

शेजारील मूर्ती अशीच सहा फूट उंचीची आहे त्याला तीन मुखें आहेत डावे बाजूचे मुख भगलेले आहे मधल्या मुखावर मुकुट आहे लांब दाढी दाखवलेली आहे उजवे बाजूचे मुख साधारण भग्न आहे गळयात जानवे आहे चार हात आहेत डावा हात उंच असून त्यात सुरनळी आहे ते वेदांचे प्रतीक आहे खालचे डावे हातात समिधा आहेत उजवे हातात (वरच्या) फूल आहे व खालचे हातात दीप आहे. कमरेला गुडघ्यापर्यंत वस्त्र आहे. कमरेला पट्टा आहे हे सर्व शिल्प ब्रह्मदेवाचे आहे अशीच मूर्ती चक्रेश्वर मंदिरात आहे परंतु ती ७ फूट उंच आहे एवढाच फरक. ही लहान आहे, परंतु भगलेली आहे पाय जमीनीत गाडले गेलेले आहेत अथवा भगलेले आहेत बहुधा विमलतीर्थातील मध्यभागी असलेल्या श्री विमलेश्वर महादेवाच्या मंदिरातील अनेक मूर्तीपैकी ही एक असावी



श्रीब्रह्मदेव व रेणुका शिल्पें

निर्मळमाहात्म्यात वर्णन केले आहे की सुरेश्वराच्या पश्चिमभागी वैतरणा संगमावर श्रीरेणुका एकवीरेचे स्थान भगवान परशुरामाने निर्माण केले होते तसेच एक महालक्ष्मीचे मंदिरही तेथे होते आज ते अस्तित्वात दिसत नाही परंतु वर वर्णन केलेली रेणुकामूर्ती उर्फ संतोषीमाता ही त्या मंदिरातलीच असावी

थोडक्यात विमलतीर्थाचे मध्यभागी श्रीविमलेश्वर महादेव, ईशान्य कोपऱ्या-वर श्री सांब सिद्धेश्वर, नैऋत्य कोनी श्री सुरेश्वर, पूर्वेकडे श्रीनिर्मलेश्वर, पाठीमागे ब्रह्मदेव मंदिर, हे दृश्य श्रीभगवान परशुरामाने निर्माण केलेल्या सुरपुरातील शिव-पुरीचेच म्हणावे लागेल

卐 卐 卐

# ९. श्रीरेणुकामाता मंदिर

**श्रीरेणुकामातामंदिर**–हे मंदिर विमलतीर्थाच्या पश्चिमभागी वैतरणा संगमावर आहे असे म्हटले आहे म्हणजे सुरेश्वर मंदिराचे पाठीमागील बाजूस जी खाडी येते ती कळंबखाडी होय संगमावर नदीचे पात्रात समुद्राचे पाणी शिरते म्हणून ते खारे होते व त्याला खाडी म्हणतात निर्मळमाहात्म्य, आठव्या अध्यायात हरिदास कवीने वर्णन केले आहे की, " विमलतलावाचे पश्चिमेला वैतरणा-सिंधू संगम आहे. तेथे मुकुटधारी ब्रह्मकमंडलूधारी त्रिशक्तीरूप विष्णु व एकमेकाद्वितीय

वीर परशुरामजननी रेणुकामाता आहे तेथे ब्रह्मदेव आहे; व दत्तअवधूत आहे." तेथेच रेणुकातीर्थ, प्रेतनदी, संगमतीर्थ वगैरे तीर्थे आहेत. वैतरणा-सिंधुसंगमतीर्थ आहे बहुधा ही सर्व एकाच संगमतीर्थाची नावे असावीत रेणुकामातेचे मंदिर तेथे असावे ह्याला पुष्टिदायक पुरावा सुरेश्वर मंदिराचे प्रांगण आहे. तेथे सतीचे पाराला टेकून दोन मूर्ती ठेवलेल्या आहेत एक गणपतीही आहे ह्या दोन मूर्तींपैकी एक मूर्ती ब्रह्मदेवाची आहे हे त्याच्या त्रिमुखावरून समजते विशेष म्हणजे सन्मुखाला चक्रेश्वर मंदिरातील मूर्तीप्रमाणे दाढी आहे वर मुकुट आहेत तीन मुखे आहेत एक भंगलेले आहे चक्रेश्वर मंदिरातील भव्य ब्रह्मदेव मूर्तीसारखेच हे शिल्प आहे शेजारी एक देवीची मूर्ती आहे संपूर्ण उभी डोक्यावर मुकुट आहे कमरेला मेखला व वस्त्रे आहेत उरोभाग अनावृत आहे निर्मळमाहात्म्यात वर्णन केलेली रेणुका मंदिरातील ही मूर्तिशिल्पे असावीत जवळ सापडली म्हणून त्या मंदिराचे प्रांगणात आणून ठेवली. अर्थात् ती भंगलेली आहेत म्हणजे फिरंग्याच्या राजवटीत ज्यांचा नाश झाला, त्यांतील आहेत अर्थात् निर्मलमाहात्म्यात वर्णन केलेली विष्णुमूर्ती व दत्तअवधूत तेथे नाहीत म्हणजे त्यांचा पूर्ण नाश झाला असावा [ह्या मूर्ती म्हणजेच रेणुकामंदिरातील रेणुका व ब्रह्मदेव होत परंतु तेथील लोक सध्या त्या देवीला संतोषीमाता म्हणून भजतात ही शिल्पे शिलाहार किंवा सातवाहन काळातील असावीत म्हणजे निदान १२०० ते २००० वर्षांची जुनी आहेत अर्थात् त्यापूर्वी परशुराम-स्थापित मंदिराचा जीर्णोद्धार करून मूर्तिपूजा आल्यावर निर्माण झाली असावीत अशा तऱ्हेच्या असंख्य मंदिरांनी, शिल्पमंदिरांनी गजबजलेला, हा वसईपासून आगाशी-अर्नाळापर्यंतचा परिसर म्हणजे निदान पोर्तुगीज अमलापूर्वी व मुसलमान आक्रमणापूर्वी धर्मक्षेत्र, तीर्थक्षेत्र, पावनक्षेत्र, आद्य परशुरामक्षेत्र, देवनगरी सुरपूर म्हणून साऱ्या विश्वात प्रख्यात होता. निरनिराळ्या भारतीय हिंदू राज्यकर्त्यांनी धर्मप्रेमाने ह्या स्थळाचे माहात्म्य व शोभा आपापल्या सामर्थ्याप्रमाणे वाढवण्याचा, टिकवण्याचा, रक्षण करण्याचा फार मोठा प्रयत्न केला हे इतिहासावरून दिसून येते.

ह्या पुस्तकात शक्य तेवढी माहिती एकत्रित केली आहे परंतु मंदिरे एवढी असंख्य होती व आहेत की प्रत्येकाचे सविस्तर वर्णन देणे स्थलाभावी शक्य होणार नाही परंतु अनेक मंदिरांचे नष्ट झालेल्या मुद्रा, नामनिर्देश तरी ठिकठिकाणी संदर्भानुसार दिलेले आहेत थोडक्यात जेवढी तीर्थे तितकी शिवमंदिरे व इतर मंदिरे असलीच पाहिजेत ही हिंदू प्रथा आहे ह्या भागात १०८ पेक्षा अधिक तीर्थे नोंदलेली आहेत. म्हणजे त्याहून अधिक मंदिरे असण्याची शक्यता आहे मुसलमान व फिरंगी ह्यांची वक्र दृष्टी ह्या भागावर झाली नसती तर काही निराळेच चित्र आजही दिसले असते परंतु जे झाले ते होऊन गेले, पण आज आहे त्याचेही ज्ञान

आमच्या बाधवास राहिले नाही ते ज्ञान नष्ट होऊ नये, म्हणून व पुस्तक वाचून पुन्हा काही प्रेम ह्या भूमीबद्दल निर्माण झाले व आहे त्याचे रक्षण करण्याची बुद्धी निर्माण झाली तर आमच्या श्रमाचे सार्थक थोडे तरी होईल असे वाटते. आम्ही आमचे अल्पबुद्धीने शक्य तेवढा प्रयत्न केला आहे बाकी सर्व प्रभूचरणी

卐 卐 卐

# १०. श्रीदेवी सरस्वती मंदिर, शूर्पारक

हे मदिर सुदर शिल्पांनी युक्त असून ते शूर्पारक नगरातून लाट देशाला जाणाऱ्या रस्त्यावर होते. म्हणजे ह्या मदिराजवळून लाट देशाला जाण्याचा रस्ता होता हे मदिर प्रत्यक्ष भगवान् परशुरामाने बांधलेले होते. ह्या मदिराच्या भिंती पाचूच्या सारख्या चकचकीत होत्या मदिरात मध्यभागी गर्भगृह असून त्यात श्री देवी सरस्वतीची सुदर मूर्ती होती गर्भगृहासमोर सुदर शिल्पांनी युक्त सभामडप होता. सभामंडपावर दोन्ही बाजूला सुदर मानवी शिल्पाकृती कोरलेल्या होत्या गर्भागाराच्या बाहेरील भिंतीवर दोन द्वारपाल कोरलेले होते. सभामडपाचे दोन्ही बाजूला व गर्भागाराचे पाठीमागे रुद सोपे असून त्यांना खिडक्या दरवाजे होते ह्या सोप्यांना मत्तवारणक म्हणत असत त्या सोप्यात पांथस्थाची राहण्याची सोय होत असे.

ह्या मदिराची आज कोणालाही माहिती नाही तसेच श्रीदेवी सरस्वतीचे स्वतंत्र मदिर बाधल्याचे फारसे कोठें आढळत नाही त्यामुळे विश्वास बसणे कठीण होते परंतु ते अस्तित्वात होते ह्यासबधी सबळ पुरावा उपलब्ध झाला आहे अकराव्या शतकात उत्तर कोकणावर शिलाहार राजे राज्य करीत होते. ते धर्म-प्रेमी, शिवोपासक राजे होते व त्यानी सुमारे एकशे आठ शिवमदिरे बांधली होती, हे त्यांच्या सापडलेल्या शिलालेखावरून व दानें दिलेल्या ताम्रपटांवरून सिद्ध झालेले असून आज काही अबरनाथ येथील शिवमदिरांप्रमाणे उत्तम शिल्पांनी युक्त अशी अजूनही अस्तित्वात आहेत. शिलाहार राजांची पहिली राजधानी पुरी म्हणजे सुरपुरी उर्फ शूर्पारकच होती हे आम्ही अन्यत्र सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहेच, परतु नतर त्यांनी आपली राजधानी बदलून श्रीस्थानक उर्फ ठाणे येथे नेली हेही प्रसिद्धच आहे. ह्या शिलाहार वंशातील मुम्मुणी राजाची राजधानी श्रीस्थानक (ठाणे) येथे होती. ह्याचा काल अकराव्या शतकातील असून इ स १०२४ ते इ स १०६० ह्या काळात तीन शिलाहार राजे होऊन गेले पहिला छित्तराज, दुसरा नागार्जुन व तिसरा मुम्मुणी. अबरनाथचे श्री शकराचे मदिर

छित्तराजाने बांधावयास सुरुवात केली व मुम्मुणीच्या काळी ते पूर्ण झाले हृया तीन राजांनी सोढ्ढल नावाच्या एका कायस्थ कवीला उदार आश्रय देऊन कवीप्रदीप ही पदवी बहाल केली होती हृया सोढ्ढल कवीने आपल्या प्रसिद्ध उदयसुदरी हृया संस्कृत काव्यात लिहून ठेवले आहे की, त्याने लिहिलेल्या उदयसुदरी हृया चपू-काव्याचे प्रथम वाचन त्याने शूर्पारकमधील ‘ सरस्वतीभवन ’ हृया श्री सरस्वती देवी मदिरात रात्रीच्या वेळी दोन दिव्य पुरुषाना करून दाखवले, तसेच त्याने असेही लिहून ठेवले आहे की हे श्री सरस्वती देवी मदिर श्री भार्गवाने (परशुरामाने) बाधलेले होते हे मदिर शूर्पारक येथे असून तेथून लाट देशाला जाण्याचा रस्ता होता हृया मदिराच्या भिंतीवर त्याने त्या दिव्य पुरुषानी (बाणकवी व तालक) त्याची केलेली स्तुती कोरून ठेवली तसेच एकदा लाट देशाचा राजा वत्सराज हा आपला मित्र ठाणे शिलाहार मुम्मुणी हृयाला भेटून परत लाट देशाला जात असता शूर्पारकमध्ये श्री देवी सरस्वती मदिर लागले श्रीदेवीदर्शन करून पुढे जावे म्हणून राजा मदिरात गेला असता त्याला हा सोढ्ढल कवीने लिहून ठेवलेला शिलालेख आढळला हा लेख सस्कृतमध्ये होता परतु भाषातर पुढीलप्रमाणे आहे

(१) वाल्मिकीपासून उत्पन्न झालेल्या त्या सद्वशात—ज्यात कविरूप मौक्तिके उत्पन्न होतात त्यात—मौक्तिक रूपाला न पोचलेल्या जलबिंदूप्रमाणे एक सोढ्ढल नामक कवी उत्पन्न झाला

(२) लाट देशाधिपती नृपश्रेष्ठ वत्सराज याने त्याच्या ठिकाणचे गुण सूक्ष्म, अस्थिर, आणि अल्प असले तरी त्याच्याकडे लक्ष न देता सूर्य जसा कमलाला आपला मित्र मानतो त्याप्रमाणे त्याला आपला मित्र मानले त्या मन्दबुद्धी सोढ्-ढ्लाने कवी होण्याच्या महत्त्वाकांक्षेने देदीप्यमान अशा काव्यसृष्टीमध्ये (न शोभणारी) सारस्वताच्या अल्प प्रकाशाने युक्त अशी ही ‘ उदयसुदरीकथा ’* लिहिली

(३) हृया सरस्वतीभवनात शापपीडेतून मुक्त झालेल्या कवीश्वर बाण-भट्टाने कवीच्या श्रमाने दयार्द्र होऊन ती कथा ऐकली आणि अत करणपूर्वक प्रशसिली

हा लेख पाहून राजाला आठवले की आपण एकदा मुम्मुणी महाराजाचे दरबारात बसलो असता एक मोती विकणारा सुन्दर सुन्दर मोती घेऊन दरबारात विक्रीचे हेतूने आला त्या वेळी दरबारी कवींचे स्फुट श्लोक काव्य ऐकण्याचा कार्य-क्रम चालू होता व सोढ्ढलने एक श्लोक तत्काळ रचून वाहवा मिळवली होती.

मोतीवाल्याजवळचे सुटे मोती पाहून आपण (लाटदेशाधिपती वत्सराजाने) एक श्लोक रचून म्हटला—

एकैकशः प्रकीर्णैर्मुक्तामणिभि किमेभिरेभिस्तु ।
ये सृजसि हन्त हारं तस्यान्य' कोऽपि परिभोग ॥

(अर्थ– अलग अलग मोत्यांचा काय उपयोग ? त्यांचा जर हार बनवलास तर मोठा आनंद होईल)

श्री देवीसरस्वती भवनाच्या भिंतीवरील प्रशस्ती ही आपण म्हटलेल्या आर्येच्या सदर्भात आहे हे वत्सराजाचे लक्षात आले वत्सराजाने देवीची यथासांग पूजा केली व आपल्या देशाला निघून गेला नतर आपले राजदूत ठाणे मुक्कामी पाठवून त्याने कवि सोढ्ढलाला सन्मानाने आपल्या दरबारी आणले त्याचा चांगला आदरसत्कार करून त्याचे उदयसुदरी काव्य त्याचेकडून ऐकले व त्याचा मोठा गौरव करून आपल्या पदरी राजकवि म्हणून ठेऊन घेतले

वत्सराजाने हे काव्य कसे व कुठे लिहीलेस व मदिरात शिलालेख का लिहिला असे विचारले असता सोढ्ढलाने सांगितले–

" आपण श्री स्थानक येथे मुम्मुणी महाराजाचे दरबारात मोतीवाला आला असता जो श्लोक रचून म्हटलात, त्या आर्येचा व्यगार्थ मला उद्देशून होता असे मला वाटले. कारण मी त्या वेळेपर्यंत केवळ तात्कालिक विषयावर एखाद दुसरा श्लोक रचून दाखवित असे. कालिदास किंवा बाणभट्ट ह्यासारखे मोठे काव्य मी लिहिलेले नव्हते आपल्या व्यगोक्त काव्याने आपण माझे डोळयात झणझणीत अजन घालून, फुटकळ मुक्तक स्वरूपाचे श्लोक व रचना मी एक भरीव काव्य रचावे असे सुचवलेत हे काव्य रचायचे तर ते केवळ गद्यात किंवा केवळ पद्यात न रचता गद्य-पद्य चपूकाव्य लिहावे असे ठरवले

' ग्रंथरचनेला आवश्यक असे एकात स्थान असावे म्हणून सर्व सुख सोयींनी युक्त व राजधानीपासून जरा दूर एका गावात मी जाऊन राहिलो, व काही दिवसांतच एक उदात्त नायकविषयक कथा पूर्ण केली नंतर ते पुस्तक वस्त्रांत बांधून मी परत राजधानी स्थानक येथे यावयास निघालो वाटेत अरण्यांतील दुस्तर मार्गाने जात असता एक शुभ्र असे देवालय लागले त्यातील भगवती सरस्वतीचे दर्शन न घेता जाणे इष्ट नव्हे, म्हणून मी आत गेलो व त्या देवीची तत्काल रचित श्लोकाने स्तुती केली तितक्यात सध्याकाळ झाल्यामुळे व बरोबरचे लोक पुढे गेल्यामुळे मी देवळाच्या मडपातील मत्तवारणकात ( बाजूच्या भागात ) विश्रांतीसाठी बसलो तेव्हा गर्भगृहाच्या दोन्ही बाजूस शिलानिर्मित दोन द्वार-पालांच्या मूर्ती दिसल्या रात्रीच्या वेळी त्या मूर्तींमध्ये तैलरहित दीपाची उज्ज्वल-ज्योत उत्पन्न झाली त्या बरोबर त्या मूर्तींमधून दोन यज्ञोपवीत धारण केलेले दिव्य पुरुष प्रकट होऊन त्यानी तत्काळ एक एक श्लोक रचून भगवती देवीची स्तुती केली, आणि समोरच्या मत्तवारणकात बसले नतर मला पाहून म्हणाले,

"आपल्या बिछान्यावर ठेवलेला कसला ग्रथ आहे ?" मलाही ती आश्चर्यकारक घटना पाहून त्याच्याविषयी जिज्ञासा उत्पन्न होऊन मी म्हणालो, "सागतो पण अगोदर तुम्ही कोण ते सागा" तेव्हा त्यांच्यापैकी एक म्हणाला, "ह्या महात्म्याचे नाव 'तिलक' व माझे नाव 'तालक' सदैव देवी भगवतीच्या सान्निध्यात असल्या-मुळे आमच्या मध्ये कवित्वशक्ती जागृत झाली आहे पण तुमचा ग्रथ कसला ते सांगा" त्यावर मी म्हणालो, "हा माझाच ग्रथ आहे पण तो एखादा सत्कवि श्रोता मिळेपर्यंत असाच बांधलेला राहील." त्यावर त्या दोघानी मला ते काव्य वाचून दाखवण्याचा आग्रह केला तेव्हा मी म्हणालो, ' मी आपल्या अनुचराना दीपासाठी काटक्या आणण्यासाठी पाठवले होते परतु आता त्याची जरूरी नाही ह्या देवालयाला जोडून असलेल्या क्षेत्रपालाच्या देवकुळी जाऊन मी शयनाची व्यवस्था करतो, नतर तुम्हास हा ग्रथ मी वाचून दाखवतो" तसे केल्यावर मी पुन्हा त्या मत्तवारणकात येऊन तो ग्रथ वस्त्रातून बाहेर काढला आणि आपली 'उदयसुदर-कथा' वाचण्यास आरभ केला.

"कथा वाचून सपल्यावर मी पुस्तक वस्त्रात बांधले, तेव्हा तालकाने त्याची प्रशसा केली ती ऐकून मी विनयाने नमस्कार करून त्याना विचारले, "आपण कोण आहात ? व येथे मूर्तिरूपाने का आहात ?" तेव्हा तालक म्हणाला, "हा विश्व-विख्यातकीर्ती 'कादबरी' व 'हर्षचरित' ह्या ग्रथांचा कर्ता वात्सायन गोत्री सरस्वतीशिष्य कवीन्द्रतिलक बाणभट्ट आहे, आणि मी ब्रह्मदेवाच्या सभेतील सामान्य देवर्षी 'तालक.'

"एकदा मी ब्रह्मदेवाच्या दर्शनाकरिता गेलो असता एक श्लोक तात्काळ रचून त्याची स्तुती केली. ह्या रचनेने मी आनदित होऊन सरस्वती भवनाच्या सभागृहात बाणकवीच्या अध्यक्षतेखाली मोठमोठे कवि काव्यचर्चा करीत होते तेथे गेलो व माझा श्लोक म्हणून दाखवला सर्वांनी माझे अभिनदन केले परतु बाणभट्टाने त्यात 'श्रुतिकटुत्वा'चा दोष काढला तेव्हां मला क्रोध येऊन मी बाण कवी सरस्वतीचा लाडका शिष्य आहे हे ध्यानी न घेता त्याला शाप दिला मी म्हणालो, "मी माझा श्लोक म्हणत असता तू शिलास्तभासारखा निश्चल राहिलास म्हणून तू मर्त्य लोकातील सरस्वतीदेवीच्या देवालयात (शूर्पारक येथील) पाषाण मूर्ती होऊन काही काळ राहशील" तेव्हा सर्व कवींनी उःशापासाठी माझी प्रार्थना केली तेव्हा मी म्हणालो, "हा बाण कवी त्या सरस्वतीच्या दीपप्रभेने सर्वशास्त्रज्ञ व कवितारहस्यवेत्ता होईल आणि रात्रीच्या वेळी याची शिलावस्था नाहीशी होऊन हा सुखी होईल आणि जेव्हा सोड्ढल कवीची 'उदयसुदरी' काव्य कथा श्रवण करील तेव्हा याला पूर्वरूप प्राप्त होईल व तो देवलोकी येईल." असा मी उःशाप दिला परतु आपल्या प्रिय शिष्याला मी शाप दिल्यामुळे सरस्वतीदेवीने

मलाही बाणासारखाच शाप दिला मी उःशापाची देवीला विनती करताच ती म्हणाली, " तू बाणाच्याच संगतीत राहशील व त्याच्या बरोबरच तुझीही शापातून मुक्तता होईल "

तालक पुढे म्हणाला, " तेव्हापासून आम्ही दोघेही शिलामूर्ती बनून ह्या देवालयात ( शूर्पारक येथील ) रहात आहोत. रात्री मात्र वनदेवता आमच्या-करिता दिव्य प्रकाशाची तजवीज करते तुझ्याविषयी आम्हास पूर्ण माहिती आहे " नंतर बाणानेही माझ्या काव्याची प्रशंसा केली व म्हणाला, ' तू हे काव्य सर्वांना वाचून दाखवू नकोस. फक्त सज्जनानाच ते ऐकव तू कवी पदाला प्राप्त झाला आहेस ' असे म्हणून ते दोघे भगवती सरस्वती देवीला वंदन करून विमानात बसून ब्रह्मलोकाला गेले.

नंतर मी ती रात्र त्या मत्तवारणकात आपले पुस्तक उशाला घेऊन घालवली स्वप्नात मी माझे नाव वाल्मिकीपासून उत्पन्न झालेल्या कविवंशावळीत लिहिलेले पाहिले. पहाटे उठल्यावर मी आपल्या सेवकांकडून खोदण्याचे साहित्य मिळवून त्या देवळाच्या पाचूसारख्या भिंतीवर आपण वाचलेली कविप्रशस्ती कोरून ठेवली. '

सोड्ढलाचे तोंडून ती सर्व हकीगत ऐकून वत्सराजाला फार आनंद झाला. काही काळाने वत्सराज लाट देशाधिपती श्री स्थानक येथे आपले मित्र मुम्मुणी महाराज ह्यांना भेटले असता त्यांनी शूर्पारक येथील सरस्वती मंदिरातील सोढ्लाचा शिलालेख वाचल्याची व नंतर त्याला बोलावून त्याचे उदयसुंदरी काव्य ऐकून त्याचा सन्मान केल्याची हकीगत सांगितली

शिलाहार सम्राट मुम्मुणी महाराजही विद्वत्तेचे चाहते असल्यामुळे व कविप्रदीप सोढ्ढल त्यांचेच दरबारचा मूळ तीन पिढ्यांचा कवी असल्याने त्यांना ते काव्य ऐकण्याची उत्सुकता लागून राहिली थोड्या दिवसांनी त्यांनी आपले राजदूत सोढ्ढल कवीकडे वत्सराजाचे दरबारी त्याला आग्रहाचे आमंत्रण देण्यास पाठवले वत्सराज महाराजांकडून मुम्मुणी महाराजांना मंदिरातील शिलालेख व त्याचे उदयसुंदरी काव्य ह्याबद्दल समजले असे त्यांनी सोड्ढल कवीला सांगून मुम्मुणी महाराजांनी घेऊन येण्यास सांगितले असल्याचे सांगितले तेव्हा सोड्ढल कवी त्यांचे बरोबर मुम्मुणीराजांचे दरबारी गेला राजाने त्याचेकडून ' उदयसुंदरी कथा ' काव्य वाचून घेतले व त्याची मुक्तकंठाने स्तुती करून द्रव्य व वस्त्रालंकार इत्यादींनी त्याचा यथोचित सत्कार केला. सोढ्ढलाचे पूर्वीचे कविमित्रांनी त्याला गाढ आलिंगन दिले. त्यामुळे त्याला त्रिभुवनाधिपत्यापेक्षा आनंद झाला

वरील सर्व हकीगतीवरून पुढील निष्कर्ष निश्चित होतात. (१) श्रीदेवी भगवती सरस्वतीचे एक अत्यंत सुंदर मंदिर शूर्पारक येथे होते \ (२) ते परशु-

रामाने बांधलेले होते हे त्या कालापर्यंत म्हणजे अकराव्या शतकापर्यंत लोकांना माहीत होते (३) ते लाट देशाचे वाटेवर पण शूर्पारकमध्ये होते (४) सोड्ढलाने आपले काव्यासंबंधी मजकूर तेथील भिंतीवर कोरून ठेवला होता व त्याला लाट देशाधिपती वत्सराज व शिलाहार नृपती मुम्मुणीमहाराज ह्यांची साक्ष घातली आहे (५) हा कवी वरील दोन्ही राजाचा आश्रित होता तसाच सन्मानित होता (६) शिलाहार नृपतींचे तीन राजे त्याचे समोर होऊन गेले; कारण कविप्रदीप ही पदवी मुम्मुणीचे वडील छित्तराज ह्यानी त्याला दिलेली होती (७) हे मंदिर लाट देशाचे मार्गावर म्हणजे नाला बोळीज अर्नाला रोडवर असलेल्या चक्रेश्वर मंदिराप्रमाणे जवळपासच कोठेतरी असले पाहिजे (८) चक्रेश्वर मंदिर शूर्पारक हद्दीतच आहे व अनेक मंदिरांचे अवशेष, मूर्ती व पाया जवळपासच सापडले असून त्यातील काही चक्रेश्वर मंदिराचे आवारात ठेवण्यात आलेले आहेत

म्हणून हे सरस्वतीभवन हे एक अत्यंत सुंदर मंदिर तेथे होते व ते परशुराम-स्थापित म्हणजे विमलेश्वर निर्मलेश्वराएवढे प्राचीन सुमारे ७००० वर्षांपूर्वीपासूनचे असले पाहिजे फिरंगी व मुसलमानाच्या मूर्तिभंजक कृत्यानी ते नष्ट झाले असावे ह्यावरूनही ही देवांची नगरी म्हणून अगदी अकराव्या शतकापर्यंत गाजत होती ह्यात शंका नाही

卐 卐 卐

# ११. परिसरांतील अन्य शिवमंदिरे

(१) गोखीवर येथे एक मोठे शिवमंदिर श्री. शंकराजी केशव फडके ह्यानी बांधले आहे बहुधा जीर्णोद्धारित आहे जवळच एक मोठा तलाव आहे. तीर्थनाव समजले नाही ह्या मंदिराला काशी विश्वेश्वर म्हणतात

(२) वसई येथे श्री सिद्धेश्वर व क्षेत्रपाळेश्वर मंदिर आहे

(३) पापडीतलावावर श्रीभीमनाथ मंदिर आहे

(४) अचोळा येथे महाकाळेश्वर मंदिर होते ते फिरंग्यानी पाडले त्याचेच अवशेष दगडखाब वापरून त्याच जागी हल्ली श्री विठ्ठलमंदिर बांधलेले आहे. जवळच धर्मतीर्थ नावाचा भव्य तलाव आहे.

(५) आगाशी येथे श्री शंकराचे मंदिर व एक मोठा तलाव आहे

(६) बोळीज येथे श्री शंकराचे मंदिर व देवहूरा तलाव आहे. ह्या तलावात अजूनही अनेक प्राचीन मंदिराचे अवशेष आहेत असे गॅझेटिअरचे म्हणणे आहे

(७) बांदाखाल येथे एक शिवमंदिर होते ते पाडून त्यावर सध्या चर्च आहे. जवळच नंदिकेश्वर तीर्थ आहे ह्या मंदिराचे नाव नंदिकेश्वर असावे

(८) वसई किल्ल्यात श्री नागेश्वर मंदिर जीर्णोद्धारित आहे ह्यावरून असे आढळेल की जेथे तलाव आहे तेथे शिवमंदिर बहुधा असतेच, किंवा शिवमंदिराजवळ तलाव खोदण्याची रीत आहे ह्या न्यायाने आज कित्येक स्थानी तलाव आहेत, परतु जवळच्या मंदिरात मारुती, देवी वगैरेची स्थापना झालेली आहे ह्या भागात एकूण १०८ तीर्थ आहेत म्हणजे तेवढीच शिवमंदिरे ह्या भागात असली पाहिजेत देव तलाव येथे मारुती स्थापना झालेली आहे तेथे शिवमंदिर असले पाहिजे रानगाव येथे मारुती स्थापना झाली आहे परतु जवळचे तीर्थ पिंडारक आहे म्हणजे फिरंगीकाळानंतर पेशवे काळात झटपट ही स्थाने मारुती, देवी इत्यादी मिळतील त्या तोप्या मूर्ती बसवून पुन्हा प्रस्थापित केली गेली सर्वांचा जीर्णोद्धार पेशवे सरकारलादेखील अशक्य होता तरी त्यांनी जेवढे शक्य होईल तेवढे केले आहे ह्या मंदिराचे संख्येवरून असे वाटते की १०८ शिवमंदिरांशिवाय अन्य देवता-मंदिरे ह्या भागात होती ही साक्षात् स्वर्गभूमी देवनगरी सुरपुरीच होती.

परिसरातील शिवमंदिराखेरीज अन्य देवस्थाने

(१) वसई येथे त्रिविक्रम मंदिर, व शितळादेवी
(२) पापडी येथे श्रीराममंदिर
(३) गिरिजि येथे हनुमानमंदिर व तलाव
(४) रानगाव येथे हनुमानमंदिर व तलाव
(५) वारुळी येथे हनुमानमंदिर व तलाव
(६) अचोला येथे विठ्ठलमंदिर व धर्मतीर्थ व एक हनुमानमंदिर
(७) उमेळे येथे साखई देवी २. हनुमानमंदिर व तलाव ३ दत्तमंदिर
(८) जूचद्र येथे चंडिकादेवी व तीर्थ
(९) पाणजू येथे पांडुनदी तीर्थ व एक देऊळ
(१०) उत्तनची धारावीतील देवी परतु पुजारी ख्रिश्चन बाई आहे.
(११) नायगाव— वाल्मिकीमंदिर
(१२) चुळणे— एक देवीमंदिर होते त्यापूर्वी तेथे भैरवाचे मंदिर होते
(१३) होळीजवळ दिघा येथे तलावतीर्थ व आनंद भवानीदेवी मंदिर.
(१४) होळीजवळ समुद्राजवळ महालक्ष्मी मंदिर— जीर्णोद्धार झाला आहे
(१५) वसई किल्ला वज्रेश्वरी मंदिर जीर्णोद्धारित. २ गणपती मंदिर, ३ मारुती मंदिर, ४ नागेश्वर मंदिर.
१६) सोपारे येथे कालिकादेवी मंदिर व लक्ष्मीनारायण मंदिर.
१७) भईगाव येथे श्री चंपादेवीचे मंदिर.

# १२. देवनगरी-सुरपूरमधील डोंगर, पर्वतराजी

ब्रह्म टेकडी—ही टेकडी निर्मळेश्वर-विमलेश्वर मंदिराचे पूर्व बाजूस निर्मळ-मळई तळ्याचे पलीकडे, परंतु गास ग्रामपंचायत हद्दीत आहे. येथे जाण्यास गास गावातूनच चांगला रस्ता आहे. ब्रह्मटेकडीवर नारळाची झाडे आहेत ह्या टेकडीचा उपयोग फार काळापासून दगडाची खाण म्हणून करण्यात आला ह्या टेकडीच्या उत्तर पायथ्याशी जमीन ओबडधोबड व निवडुंगाने भरलेली होती एका गुळगुळीत केलेल्या बेसाल्टच्या दगडावर पाली भाषेत कोरलेले शब्द आहेत, 'शत्रुमर्दन ' हा लेख इ स. पूर्व २०० चा आहे ह्या ठिकाणी १२ फूट व्यासाची दगडी बांधकामाची वर्तुळे आहेत इ स १८८२ मध्ये ह्या वर्तुळाचे उत्खनन करण्यात आले असता एक-दोन मातीच्या भांड्यांचे हिरव्या ऍनॅम्हलची झिलई केलेले तुकडे सापडले.

वर उल्लेखिलेल्या पाली भाषेतील लेखाजवळच सुमारे ८० यार्ड नैऋत्येला ३'×२' फुटाच्या एका दगडावर पाली भाषेतील दुसरा लेख सापडला त्यावर लिहिलेले आहे 'दत्ताया: भैमया' म्हणजे भीमकराजाच्या मुलीने दिलेले ह्या दोन लेखाजवळ पूर्वी एक प्रवाहकुंड होते, परंतु आज तेथे कुंडाचे अवशेष दिसत नाहीत.

ब्रह्मटेकडीच्या पूर्वबाजूला मोठ्या घोटीव पायऱ्यांचे तुकडे असून एका झाडाला टेकून एका हिंदू देवतेची मूर्ती ठेवलेली आढळते उत्तरबाजूला निवडुंग वाढलेला होता हे वर सांगितलेले आहे. दक्षिण बाजूला एक तळे आहे त्याचे नाव काकळई तळे उर्फ काकतीर्थ पश्चिम बाजूला ५० यार्डावर जे तळे आहे ते विसरळ तळे ह्याचा काही भाग बुजला आहे व काही भाग अजून पाण्याने भरलेला आहे हेच ब्रह्मतीर्थ उर्फ ब्रह्मालय उर्फ ब्रह्मवेणी तीर्थ ह्याचे जवळच एक लांबलचक तळे आहे काही भाग पाण्याने भरलेला आहे. परंतु उत्तर भागात भरपूर पाणी आहे त्याला मलई तीर्थ उर्फ कर्दमाळीतीर्थ उर्फ निर्मळ अशी नावे आहेत

ब्रह्मटेकडीच्या सर्वच बाजूंना तळी आहेत आता काही बुजत आली आहेत.

ही ब्रह्मटेकडी फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध असून येथे ऋषीमुनींचा निवास असे ब्रह्मज्ञानी लोक ह्या ठिकाणी तपस्या करीत असत म्हणून ह्याला ब्रह्मटेकडी असे नाव परशुरामकाळापासूनच पडले जवळचे विसरळ तळे ह्याला ब्रह्मालयतीर्थ असे नांव पडले हे साधू-सन्यासी, तपस्वी, ऋषीमुनी इत्यादींचे निवासस्थान तेव्हापासून तर होतेच; पण नंतरच्या बुद्ध काळातही बुद्धभिक्षूंचे निवासस्थान होते क्षत्रपराजा नहपानाचा जावई उषावदत्त ह्याचे पांडवलेण्यातील

लेखांत ह्याचा उल्लेख आला आहे ह्या टेकडीवर राहणाऱ्या बौद्ध-संन्याशांना त्याने धर्मशाळा बांधून दिल्या तसेच त्यांचे उपजीविकेसाठी नारगोळ येथील ३०००० (तीस हजार) नारळाची झाडे दान दिली, असे दानपत्र कोरलेले आहे. नंतरच्या सातवाहन राजाच्या राजवटीत शिल्पकला प्रगल्भावस्थेत होती त्यांनी ठिकठिकाणी पुष्कळ मंदिरे बांधली ते स्वतः ब्राह्मणराजे अत्यंत धर्मनिष्ठ होते तरी सर्व धर्मांना समान वागणूक देत होते त्यांनी ह्या ब्रह्मटेकडीवर व इतरत्र ह्या भागात पुष्कळ मंदिरे बांधली असण्याची दाट शक्यता आहे ह्या भागात मंदिरांचे जे प्रचंड अवशेष सापडतात ते त्याच मंदिराचे असावेत. विशेषेकरून ब्रह्मटेकडी असलेल्या गास गावात फार मोठ्या प्रमाणावर हिंदू-मंदिरातील मूर्ती विहिरीत, तलावात टाकलेल्या आढळल्या आहेत चक्रेश्वर मंदिरात ठेवलेली प्रचंड ब्रह्मदेवाची मूर्ती गास हद्दीतील सोनारपाडा भागातील एका शेतात गाडलेली आढळली एवढी प्रचंड ब्रह्मदेवाची मूर्ती ही मूळ मंदिरातीलच असली पाहिजे; व तसे ब्रह्मदेवाचे मंदिराचे स्थानाला ब्रह्मटेकडी हेच सयुक्तिक स्थान दिसते. म्हणजे ब्रह्मटेकडीवर ब्रह्मदेवाचे प्रचंड शिल्पाकृती मंदिर असले पाहिजे, ह्या निष्कर्षापर्यंत आपण पोहोचतो ब्रह्मटेकडी, ब्रह्मदेवाचे मंदिर व ब्रह्मालय तीर्थ ही नामावळी पूर्णपणे नावाला सार्थ होते ब्रह्मटेकडी गास हद्दीतच आहे ब्रह्मालय तीर्थ तेथेच जवळ आहे व ब्रह्मदेवाची मूर्ती त्याच गासगावात एका शेतात आढळते हा दैवयोग नसून मूर्तिभंजक फिरंग्या-पासून मूर्तीचे व देवाचे रक्षण करण्यासाठी त्या देवाच्या भक्तांनीच जवळपासच्या शेतात लपवली व गाडून टाकली, म्हणून आज ही दुर्मिळ ब्रह्मदेवाची प्रचंड मूर्ती उपलब्ध झाली आणि त्यानेच सिद्ध केले, ब्रह्मटेकडीवर श्री ब्रह्मदेवाचे प्रचंड मंदिर असले पाहिजे आज बिचारा ब्रह्मदेव निर्वासित झाला आहे त्याचे मंदिर पाडले गेलेले आहे. कित्येक वर्षे मातीत गाडलेला राहूनसुद्धा आज त्याला श्रीचक्रेश्वर महादेवाचे प्रांगणात एका झाडाखाली उन्हापावसात दिवस काढावे लागत आहेत, हे केवढे दुर्भाग्य आहे ! ह्या ब्रह्मदेवाने यज्ञयाग पाहिले असतील, आपल्या ब्रह्मपुरीतील निरनिराळ्या पवित्र तीर्थावर विनायककुंड, इंद्राणीकुंड, रामतीर्थ, उत्पल तीर्थावर भारतीय यात्रेकरूचे थवेचे थवे पाहिले असतील अनेक पुण्यपावन विभूतींनी ह्या ब्रह्मपुरीत येऊन ब्रह्मदेवाला वंदन केलेले पाहिले असेल; त्याने निर्माण केलेल्या वेद-मंत्राचा जयघोष त्याने कानात साठवून ठेवला असेल, आणि श्रीचक्रेश्वर महादेवाला म्हणत असेल, ‘ कालाय तस्मै नमः ’

ह्या ब्रह्मटेकडीवर कोड जमातीची दफनभूमी होती, असे सापडलेल्या एका शिलालेखावरून समजते. भारतात आर्य येण्यापूर्वी प्रेत-दफनाची पद्धत होती म्हणजे ही कोड जमात परशुरामपूर्वकाळातील असावी मोहेंजदारोच्या

धर्तीवर ह्या भागात उत्खनन होणे जरूर आहे. ते केले असल्यास फारच आश्चर्य-कारक इतिहास उपलब्ध होण्याची शक्यता आहे

## राक्षी-डोंगर ऊर्फ तुलिनी टेकडी

हा डोंगर नालासोपारा स्टेशनचे पूर्व बाजूस जो रस्ता जातो त्या डोंगरावरून पेल्हार धरणाकडे जातो तेथे दोन डोंगर आहेत त्याना दोहोंना मिळून चतुरगण पर्वत म्हणतात, ही तुषारचीच राग मानली जाते ह्या दोन टेकड्यापैकी जरा लहान आहे तो राक्षी डोंगर. ह्याला भस्माचा डोंगर असेही म्हणतात भगवान परशुरामाची वेदी सापडली आहे असे म्हणतात ती याच डोंगरावर असावी परशुरामाने यज्ञ केला त्याच्या यज्ञरक्षेचा हा डोंगर म्हणून त्याला राक्षी हे नाव पडले दुसरे नाव आहे तुलिनी टेकडी ह्यावर तुळातीर्थ आहे, असेही श्रीनिर्मळ-माहात्म्य ग्रथांत सांगितले आहे तुला म्हणजे सुवर्णतुला करून तेवढ्या संपत्तीचें गोर-गरीबांना दान भगवान परशुरामाने आपली सर्व संपत्ती ब्राह्मणाना, याचकाना वाटून टाकली ही सुवर्णतुला भगवान परशुरामानेच केली म्हणून ह्या डोंगरीला नाव पडले तुलिनी डोंगर. त्यावर जे तीर्थ निर्माण केले ते तुळातीर्थ. ह्या तीर्थावर स्नान करून तुलादान केले असता फार मोठे पुण्य लागते असे निर्मळ-माहात्म्य म्हणते चतुरगणपर्वतावर एक शिवालय असून त्यात भगवान परशरामाचा परश् ठेवलेला आहे असे म्हणतात भगवान परशुरामाचे दर पौर्णिमेला या ठिकाणी वास्तव्य असते असे म्हणतात

ही टेकडी काळ्याभोर खडकाची असून अभ्रकासारखी चकाकते तसेच त्यावरील खडकांवर आघात केला तर खणखणीत आवाज येतो ह्या टेकडीवर काही दगडी खांबांचे तुळके आहेत हे खांब षट्कोनी १० इंच बाजू असलेले आहेत व ६ ते २० फुटांपर्यंत उंचीचे आढळतात ह्यावरून येथे एखादे प्रचंड मंदिर असावे, असे खांबांच्या भव्यतेवरून वाटते पूर्वेकडील दरीवर एक विचित्र वर्तुळ असून ते उंच दगडी खांबावर ठेवलेले आहे हे देखील एखाद्या मंदिराचा सांगाडा असावा असे वाटते

## नील टेकडी

ही टेकडी नालासोपारा स्टेशनच्या पश्चिम बाजूस असून सोपारा गावी जाणाऱ्या रस्त्याचे उजवे बाजूस स्टेशनजवळ आहे ती नीळे-मोरे ह्या गावच्या हद्दीत आहे रेल्वे झाली तेव्हापासून ह्या टेकडीचे फोडून खडक-दगड नेऊन माती खणून आज ती फार लहान झाल्यासारखी दिसते ही सुमारे १०० ते १२५ फूट उंचीची आहे ह्या टेकडीचे रेल्वेसाठी माती-दगड काढताना काही

मुसलमानपूर्व काळातील मूर्तीचे अवशेष व पांच कोरलेल्या शिल्पाकृतीचे तुकडे मिळाले ते तेथेच डोंगरीच्या दक्षिणेला असलेल्या विहीरीजवळ पडलेले होते

वरील पठारी भागावर पोर्तुगीजांची गढी होती तेथे पायाचे अवशेष मिळतात. ह्या टेकडीवरील उत्खननात ३ फूट ८ इच लाब व १ फूट ३ इच रुद व ९ इच जाड असा एक शिलालेख सापडला अक्षरे उथळ असून झिजलेली आढळली. वर उजवे बाजूला सूर्य व डावे बाजूला चद्र कोरलेले आहेत राजाचे नाव रामचद्रदेव यादव शके १२२० असे आहे ह्या लेखात शूर्पारक (सुरपूरचे) नाव दोनदा आलेले आहे. फार खराब झाल्यामुळे अधिक वाचता येत नाही

येथे ब्रह्मटेकडीप्रमाणेच एक दगडी डबी सापडली होती, ती बुद्धकालीन स्तूपाचा अवशेष होय

ह्या टेकडीवर श्रीनिर्मळेश्वर–माहात्म्याप्रमाणे नीलेंद्र कुड आहे व ते अतिपवित्र तीर्थ आहे नील नावात इद्र हे नाव समाविष्ट केल्याने तेथे इद्राचे मंदिर असावे व तेथील कुडाला नीलेन्द्र कुड नाव मिळाले असावे, किंवा इद्राने निर्माण केल्यामुळे त्या कुडास नीलेंद्रकुड नाव मिळाले असावे असे वाटतें परंतु खाली सापडलेल्या मूर्ति-शिल्पावरून व अवशेषावरून वर इद्रदेवतेचे मदिर असावे हेच अधिक सयुक्तिक वाटते निर्मळ-माहात्म्यात सागितले आहे की, आश्विन कृ १४ ला नीलेंद्र कुडात स्नान केले असता सर्व पापांचा नाश होतो, पुनर्जन्म येत नाही इंद्रादी देवही त्याला वदन करतात

## वज्रगड–हिरा डोंगरी

वसई– निर्मळ रस्त्यावर, निर्मळ व गिरीज ह्या दोन गावाचे मध्ये उजवे बाजूला ही एक टेकडी आहे ती सुमारे १५० ते २०० फूट उच असेल ह्याला गड म्हणण्याचे कारण पूर्वी कोणा राजाचा असलेला एक छोटा किल्ला होता त्यानतर पोर्तुगीझांनी आपले एक लष्करी ठाणे केले होते व नतर चिमाजी अप्पासाहेब पेशवे ह्यांनी वसई युद्धात निर्मळ जिकल्यावर हा किल्ला ताब्यात घेऊन तेथे आपली खजिन्याची व मुक्कामाची जागा केली होती येथूनच ते वसई किल्ल्याच्या लढाईची सूत्रे हालवीत होते त्यामुळे माणिकपूरपासून वसई किल्ल्यापर्यंत सर्व भाग त्याचे तोफांचे टप्यात येत होता पेशवे हे छत्रपती शाहू महाराजांचे पंतप्रधान म्हणजे वजीर म्हणून लोक ह्याला वजीरगडही म्हणू लागले परंतु खरे नाव वज्रगड हेच आहे, त्याला तसे कारणही आहे इद्राचे वज्र नावाचे अतिकठीण हत्यार होते तसेच वज्र म्हणजे हिरा ह्या दोन्ही कारणावरून ह्या टेकडीला लोक वज्रगड म्हणू लागले कारण हा किल्ला लहान पण जिकण्यास कठीण मानला जात असे. तसेच ह्या किल्ल्याचे परिसराचे वैशिष्ट्य असे की, ह्या



वज्रगड किल्ल्यावर (हिराडोंगरी) लेखक व इतर

टेकडीत असख्य गारेचे खडक होते ते हिऱ्यासारखे चमकत म्हणूनही त्याला हिराडोंगरी अथवा वज्रगड असे नाव पडले

आज हा हिरा भंगलेला आहे त्याचे तेज लुप्त झालेले आहे. वरती किल्ल्याची तटबदी, इमारती ह्यांचे दगडी अवशेषाचे ढीग आढळतात सर्व भाग उजाड आहे ह्या टेकडीवर दक्षिण दरवाजाचे जवळ एक अखंड पाण्याने भरलेली मोठी विहीर आहे. पाणी फारच सुदर आहे असे म्हटले जाते व इतिहासात तशी नोंद आहे की ह्या विहिरीतून निघालेले एक भुयार असून ते वसई किल्ल्यातील रमेदी बुरुजापाशी निघत होते ह्या वाटेचा उपयोग वसई युद्धाचे वेळी हेरगिरी करण्यासाठी केला गेला, असे म्हटले जाते

धार्मिक दृष्टीने ह्याचा उल्लेख कुठे फारसा आढळला नाही परतु दक्षिण दरवाजाचे पायथ्याशी जरा अतरावर गिरीज हद्दीतील एक प्रचड तलाव आहे हल्ली हे ठिकाण ठाकूर नावाचे व्यक्तीचे खाजगी मिळकतीत जमा आहे असे समजते त्याचे वडिलानी वरती एक दत्तमदिर बांधलेले आहे दत्तजयंतीला तेथे एक उत्सव होतो

## बुरुडराजाचा कोट व राजवाडा किंवा बुद्धस्तूप

हे ठिकाण निर्मळ-सोपारा रस्त्यावर उमराळेच्या पुढील कोटाचा स्टॉपच आहे हे गास ग्रामपचायत हद्दीत येते त्याचा घेर ६५ यार्डांचा आहे, १७ फूट उंची आहे, व १५ फूट रुंदीची वर गच्ची होती ह्याच्या मागे २० फूट लांब व १० फूट रुंद डागोबा (स्तूप) होता ह्या टेकाडाभोवती पूर्वपश्चिम लांबी ९५ फूट व दक्षिणोत्तर लांबी ५६ फूट अशी दगडी बांधकामाची तटबंदी होती ह्या तटबंदीने एकूण २५६ फूट लांबीची जागा व्यापली आहे. दक्षिणेच्या भिंतीत मुख्य प्रवेश दरवाजाचे अवशेष आहेत प्रवेशद्वाराजवळ ४८ फूट चौरस दगडविटाचा पाया




बुरुड राजाचा कोट, राजवाडा, बुद्धस्तूप

आहे उत्तरेच्या बाजूची भिंत १५० वर्षांपूर्वी (१८३२ मध्ये) एका शेख अमीर नावाचे मुसलमान भिकाऱ्याने बांधलेली होती त्याने तेथील जागेचे बागेत रूपांतर केले तेथे एक स्तूप ऊर्फ डागोबा होता पूर्व बाजूला एक छोटेसे मंदिर होते; व जवळच एक थडगे आहे ते शेख अमीरचा हस्तक रमजानखान नावाच्या व्यक्तीचे आहे. हे दोघेही दरोडेखोर होते. ते ब्रिटिशांनी पकडून शिक्षेला पाठवले

बौद्ध स्तूपाचे जागेवर त्यापूर्वी एक अत्यंत कलाकुसरीने युक्त असे चंदनी लाकडाचे मंदिर होते, अशी बौद्ध वाङ्मयांत नोंद आहे ह्या स्तूपाचे उत्खनन

... ६



बुद्ध स्तूपातील अवशेष


पंडित भगवानलाल इंद्र व दोन ब्रिटिश पंडित ह्यानी केले हे काम १८८२ च्या पूर्वी केले त्यामध्ये त्यांना बुद्धाचे भिक्षापात्र मिळाले ह्या भिक्षापात्राला बौद्ध लोक अत्यंत पवित्र मानतात फा-इ-एन ह्या चिनी प्रवाशाने लिहून ठेवले आहे की, हे भिक्षापात्र साऱ्या बौद्धजगात फिरून, गौतम बुद्धानंतरचा बुद्धावतार मैत्रायणी बुद्ध ह्याजकडे येईल

## मैत्रायणी बुद्ध उर्फ पूर्ण व्यापाऱ्याची कथा

बुद्धकाळात सुरपूर ऊर्फ सोपारा भारतातील श्रेष्ठ व्यापारी बंदर होते. या बंदराचा परदेशाशी व्यापार चाले भारतातून हजारो रुपयाचा माल दररोज परदेशी जात असे तसाच परदेशी माल मोठ्या प्रमाणावर येत असे येथे फार धनाढ्य व्यापारी होते त्यापैकी एका व्यापाऱ्याचा हा दासीपुत्र ह्याच्या आईचे नाव मैत्रेयी व्यापाऱ्याला चार औरस पुत्र होते व हा मैत्रेयीदासीचा मुलगा 'पूर्ण' ह्याची <u>आई</u> व्यापाऱ्याची अत्यंत लाडकी असल्यामुळे पूर्णचे लालनपालनपोषण

त्याने आपल्या मुलांबरोबरच केले मुलाप्रमाणेच त्यालाही व्यापाराचे उत्तम शिक्षण दिले व आपल्या मुख्य पेढीचा व्यवहार त्याच्याकडे सोपवला. त्याच्या चार सावत्र भावांपेक्षा हा बुद्धीने तल्लख होता बापाने मुख्य पेढीची जबाबदारी सोपवलेली त्यांना सहन झाली नाही ते त्याला पाण्यात पाहू लागले व शेवटी बापाकडे कट-कट करून त्याला बदरावरील खरेदी-विक्रीचे व्यवहार पाहावयास पाठवले परंतु हा बंदरावरील व्यवहारात फारच किफायतशीर सौदे करून नावलौकिकास चढला व बापाच्या पेढीला भरघोस फायदा करून दिला तेव्हा त्याच्या सावत्र भावानी त्याला व्यवहारातून दूर करण्याचा हट्ट बापाजवळ धरला. बापानेही विचार केला आणि पूर्णाला भरपूर भागीदारीचा हिस्सा देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास सांगितले ह्या संधीचा फायदा घेऊन तो फारच उत्तम व्यवहार करून मोठा धनाढ्य व्यापारी झाला. स्वतः जलपर्यटनें करून दौलत वाढवू लागला. त्या काळी जलपर्यटन हे एक दिव्य होते जो एक जलपर्यटन करून येईल त्याला भाग्यवान समजत जेवढी जास्त जलपर्यटने केलेली असतील तेवढी त्याची जास्त प्रतिष्ठा असे पूर्णाने चार जलपर्यटने केलेली होती. व्यापारात त्याला राजाच समजत असत त्या काळी सुरपूरला (सोपारे) एक मोठी व्यापारी संघटना होती. त्यामार्फतच सर्व परदेशी व्यापाऱ्यांचा माल खरेदी होत असे

एकदा व्यापारी संघटनेने परदेशातून आलेला माल स्वस्त मिळावा म्हणून अडवणुकीचे धोरण स्वीकारले. परदेशी व्यापाऱ्यांची अडचण झाली. माल उतरावयास जागा नाही, व तो उतरवल्याशिवाय नवी खरेदी नाही पूर्णाला त्या व्यापाऱ्याची दया आली व्यापारी संघटनेला धडा शिकवण्यासाठी त्याने तो माल चढत्या भावात सर्वच्या सर्व खरेदी करून टाकला व आपले गोदामात नेऊन भरला. परदेशी व्यापारी खूष झाले भरपूर भाव मिळाला व अडचण दूर झाली. परंतु व्यापारी संघटना चिडली. सत्य परिस्थिती अशी होती की व्यापारी संघटने-जवळ एवढा प्रचंड माल खरेदी करावयास पुरेसे पैसे नव्हते परदेशी पैशासाठी थांबायला तयार नव्हते पूर्णाने त्याचा फायदा घेऊन सर्व माल खरेदी करून रोख पैसे मोजले त्यामुळे व्यापारी संघटनेची बदनामी झाली म्हणून त्यांनी राजाकडे तक्रार केली. राजाने विचारताच त्याने उत्तर दिले, व्यापारी संघटनेने माल नाकारल्यानंतर, तो माल खरेदी करण्याचा त्यांचा हक्क संपतो. त्यामुळे मी माल खरेदी केला हे पूर्ण कायदेशीर आहे ' राजाला त्यात दोष दिसेना राजाने व्यापारी संघटनेलाच दोष दिला राजाला लागणारा माल पुरवण्याचे कामही व्यापारी संघटनेकडे होते एकदा राजाला काही मालाची गरज पडली. राजाने संघटनेला आदेश दिला परत संघटना अडचणीत आली कारण हा माल पूर्णाने खरेदी केलेल्या मालापैकीच होता.



बुद्ध स्तूपातील अवशेष

पंडित भगवानलाल इंद्र व दोन ब्रिटिश पंडित ह्यांनी केले हे काम १८८२ च्या पूर्वी केले त्यामध्ये त्यांना बुद्धाचे भिक्षापात्र मिळाले ह्या भिक्षापात्राला बौद्ध लोक अत्यंत पवित्र मानतात फा-इ-एन ह्या चिनी प्रवाशाने लिहून ठेवले आहे की, हे भिक्षापात्र सान्या बौद्धजगात फिरून, गौतम बुद्धानंतरचा बुद्धावतार मैत्रायणी बुद्ध ह्याजकडे येईल

## मैत्रायणी बुद्ध उर्फ पूर्ण व्यापाऱ्याची कथा

बुद्धकाळात सुरपूर ऊर्फ सोपारा भारतातील श्रेष्ठ व्यापारी बंदर होते. या बंदराचा परदेशाशी व्यापार चाले भारतातून हजारो रुपयाचा माल दररोज परदेशी जात असे तसाच परदेशी माल मोठ्या प्रमाणावर येत असे येथे फार धनाढ्य व्यापारी होते त्यापैकी एका व्यापाऱ्याचा हा दासीपुत्र. ह्याच्या आईचे नाव मैत्रेयी. व्यापाऱ्याला चार औरस पुत्र होते व हा मैत्रेयीदासीचा मुलगा 'पूर्ण.' ह्याची आई व्यापाऱ्याची अत्यंत लाडकी असल्यामुळे पूर्णचे लालनपालनपोषण

संघटनेने पूर्णांकडे मालाची मागणी केली. पूर्णाने दुप्पट भावाने माल संघटनेला विकला व संघटनेला तो वाजवी भावाने राजाला द्यावा लागला. व्यापारी संघटनेला अशा तऱ्हेने नुकसान सहन करावयाला लावून पूर्णाने आपल्या हुशारीने त्यांना धडा शिकवला. ह्या कथेवरून पूर्ण व्यापारी किती श्रीमत होता व व्यापारी डावपेचात किती हुशार होता हे कळते

हा पूर्ण व्यापारी जलपर्यटनाला चार वेळा जाऊन आल्यामुळे त्याला विरक्ती उत्पन्न झाली होती जलपर्यटने त्या काळी फार धोकादायक असत, म्हणून जलपर्यटन करणारा माणूस धार्मिक वृत्तीचा व परमेश्वरावर श्रद्धावान होत असे. पूर्णाने म्हणूनच विवाह केला नव्हता; व अत्यंत धार्मिक होऊन शेवटी बुद्धधर्माची तत्त्वे त्याला पटली; म्हणून तो एका व्यापाऱ्याचे मध्यस्थीने प्रत्यक्ष श्रावस्तीला गेला व भगवान बुद्धाजवळ बुद्ध धर्मदीक्षा देण्याची विनती केली व आपले उरलेले आयुष्य बुद्धधर्मप्रचारात घालवण्याचा मनोदय सांगितला. भगवान बुद्धाने त्याची परीक्षा केली व स्वहस्ते त्यास दीक्षित केले.

बुद्धाने विचारले, "धर्मप्रसारासाठी कुठे जाशील ?" तेव्हा पूर्णाने उत्तर दिले; "पूर्व दिशेकडे जावा, सुमात्रा वगैरे भागात जाईन." बुद्धानें सांगितले, "त्यात फार धोके आहेत अडचणी आहेत" पूर्णाने उत्तर दिले, "अडचणीला भिऊन कार्य होत नसते. अडचणीच माणसाचा खरा गुरु असतो त्याचा सन्मान केला पाहिजे" बुद्धाने संतोषाने त्याला पूर्वेकडे जाण्यास परवानगी दिली. पूर्णाने काही वर्षे पूर्वेकडे धर्मप्रचार करून परत भारतात आला बुद्ध ह्या वेळी वृद्ध झाला असून त्याने पर्णाला आपले नतरचा बुद्ध 'मैत्रेयी बुद्ध' म्हणून घोषणा करून टाकली.

गौतम बुद्धानतर त्याचे अनुयायी मैत्रेयी बुद्ध म्हणजे पूर्णालाच बुद्ध मानू लागले. म्हणून गौतम बुद्धाचे भिक्षापात्र-पवित्र वस्तू-पूर्णाकडे आले. त्याचे नंतर ती वरील स्तूपात बुद्धावशेष म्हणून रक्षिली गेली

ह्या भिक्षापात्राबद्दल अनेक वाद आहेत परतु सुरपूर (सोपारे) येथील भिक्षापात्र हेच भगवान गौतम बुद्धाचे पवित्र भिक्षापात्र आहे हे म्हणणे जास्त ग्राह्य आहे कारण पूर्ण–मैत्रेय बुद्ध हा सुरपूर येथेच नतर अखेरचे काळी राहिला

वरील भिक्षापात्राखेरीज अनेक सुवर्णफुले, सोन्याचे निरनिराळे आकृतीयुक्त पत्रे, गौतम बुद्धाची सोन्याची मूर्ती व त्यावेळचा येथील सातवाहन राजा गौतमीपुत्र यशश्री सातकर्णी ह्याचे सुवर्णाचे नाणे वगैरे वस्तू त्या उत्खननात मिळाल्या, त्या सरकारजमा आहेत. परतु ज्या दगडी पेटीत हे मिळाले ती पेटी बुरुडाचे कोटाचे मागील बाजूस मांडून ठेवलेली आहे त्यामध्ये एक बुद्धाची छोटी मूर्ती कोणी बसवलेली आहे जवळच काही शिल्पाचे अवशेष पडलेले आहेत


ह्याला बुरुडाचा कोट म्हणतात कारण बुद्धपूर्वकाळी येथे एक बुरुड राजा राहात होता. त्याचा हा राजवाडा होता त्याचाच हा कोटही होता तो अत्यंत सत्त्वशील, साधी राहणी व उच्च विचारसरणीचा आदर्श राजा होता त्याच्या राणीची व त्याच्या साध्वेपणाची कथा चक्रेश्वरमहादेव प्रकरणात दिलेली आहे

**तुगार पर्वत**– ह्यासबंधी देखील सविस्तर माहिती तुगारेश्वर प्रकरणात येऊन गेलेली आहे म्हणून येथे दिली नाही

卐 卐 卐

# १३. निर्मळ-सुरपूर परिसरांतील पावन तीर्थे

(१) **विमल तीर्थ**–वसई-निर्मळ रस्त्याचे डावे बाजुला असलेला प्रचंड तलाव म्हणजे विमलतीर्थ होय हे तीर्थ भगवान परशुरामाने विमलासुराचा वध ज्या भूमीवर केला, त्या भूमीवरच निर्माण केलेले आहे. विमलासुराच्या अंतिम



श्री विमलतीर्थ

इच्छेनुसार भगवान परशुरामाने त्याच्या शिवभक्तीने प्रसन्न होऊन हे तीर्थ निर्माण केले. ह्याची महती काशी-प्रयाग क्षेत्राहूनही मोठी आहे असे पुराणातरी लिहिले आहे. हे महातीर्थ आहे सर्व तीर्थ आहे पवित्र वैतरणी गंगा ह्या विमलोदकात सामावली आहे ह्या तीर्थात भगवान परशुरामाने समग्र गंगा, तापी, नर्मदा,

शरयू, गडकी, गोदा, चद्रभागा, पाराशरी, अरुणा, वरुणा, पयोष्णी, इद्रायणी, वेणा इत्यादी नाना पवित्र नद्यांचे प्रवाह-पाणी आणून सोडलेले आहे ह्या तीर्थात प्रत्यक्ष भगवान शकर, इंद्र, नित्य स्नान करतात.

एका कार्तिकी एकादशीला वशिष्ठ, नारद, सर्व ऋषी, इद्रादी देव, यक्ष, किन्नर, गधर्व, विमल एकवटले तेथील देखावा बघून नारद-वशिष्ठ संतुष्ट झाले. वैतरणीत स्नान करून सध्याजप सुरू केला पितृतर्पण केले, विधियुक्त गोदानें दिली नतर एकवीरा रेणुकेचे व जवळच्या देवताचे पूजन केले परत विमल



श्रीविमलतीर्थात भाविक स्नान-तर्पण करताना

तीर्थावर झाले. विमलतीर्थात स्नान करून श्रीशिवाचे दर्शन घेतले षोडषोपचारे पूजा केली चारही कोपऱ्यांतील अकरा रुद्राचे पूजन केले तीर्थाला प्रदक्षिणा घातली कारण श्रीविमलेश्वराचे मदिराचे तीर्थाचे मध्य भागी होते नारद म्हणाले, "अनेक तीर्थे पाहिली परतु त्रिभुवनात असे दुसरे नाही येथे काशी-प्रयाग सर्वच तीर्थे एकवटली आहेत " विमलतीर्थाचे पाणी कमडलूत भरून ठेवून पूजन करून रोज जो तीर्थ प्राशन करतो तो बाह्यातर शुद्ध होतो त्याचा संसार सफळ होतो शेवट मोक्षपद मिळते अमावास्या सोमवतीला पर्वणी असते विमलबिंदूच्या स्पर्शमात्रे पापे जळून जातात. सोमवती अमावास्येला स्नान केले असता इद्रलोक प्राप्त होतो, असे नारदानी सांगितले आहे स्वत परशुरामाने सागितले आहे की 'ह्या माझ्या तीर्थक्षेत्रात स्नान, दान, तप, साधना केली असता मोक्ष मिळतो. इच्छिले ते प्राप्त होते

**अधिक फलश्रुती** ह्या सर्व तीर्थात स्नान केले असता सर्व तीर्थात स्नान केल्याचें पुण्य मिळते सर्व पातकाचा नाश होतो ह्या ठिकाणी दानें केली असता

अपार पुण्य मिळते निर्धनाला धन प्राप्त होते विवाहोत्सुकाचा विवाह होतो. निपुत्रिकाला संतती प्राप्त होते निव्वळ स्नानाने भोगमुक्ती होते सर्व सिद्धी प्राप्त होतात निरनिराळ्या प्रकारे देह कष्टवून तपाचरण करणारांना जे साधत नाही ते निव्वळ स्नानमात्रे साध्य होते धन्य तो रेणुकानंदन, ज्याने हे पवित्र पावनतीर्थ निर्माण केले व धन्य तो विमलासुर, ज्याने जगावर मोठा उपकार केला व ज्याचे उदरावर आजही विमलेश्वर राहिला आहे (सध्या नाही. बाजूला आहे) ह्या तीर्थात स्नान करून शिवलिंगाचे पूजन करावे यथासांग ब्राह्मणभोजन घालावे. येथे पिंडदान केले असता पितृगण संतोष पावतात

## २ निर्मळ ऊर्फ वराहकर्दमाळी तीर्थ

हे तीर्थ विमल तलावाच्या पूर्व बाजूला आहे वसई-निर्मळ रस्त्याने उजव्या हाताला आहे हल्लीचे विमलेश्वर महादेव मंदिर, श्रीशंकराचार्य समाधी व विष्णू मंदिर ह्याच तीर्थाचे काठावरील टेकाडावर आहेत हे खूप विस्तृत पसरले असून लांबट आहे. एक फाटा विमलेश्वर महादेव मंदिराचे मागील बाजूस जातो त्याला लोक मलई तळे म्हणतात हे पुष्कळसे बुजले आहे तरी उत्तर बाजूला भरपूर पाणी आहे.

ह्याच्या निर्मितीची हकीगत अशी की, भगवान परशुरामाने विमलासुराला मारल्यानंतर त्याच्या रक्ताचा पाट पूर्व बाजूला वाहात गेला व कर्दम म्हणजे चिखलासारखा झाला भगवान परशुरामाने तो चिखलासारखा भाग स्वच्छ करून त्याचे तीर्थ बनवले म्हणून ते कर्दमाळी तीर्थ किंवा निर्मळ केले म्हणून निर्मळ तीर्थ त्या गावाचेही नाव त्यामुळे पडले निर्मळ आणि ते अगदी सार्थही आहे कारण ह्या तीर्थात स्नानदाने करून लोक पापमुक्त होतात, निर्मळ होतात म्हणून निर्मळ वस्तीचे व निर्मळ करणारे गाव म्हणून निर्मळ हे नांव लोकप्रिय झाले व कायम झाले. म्हणून क्षेत्र निर्मळ व तीर्थ विमल-देवता विमलेश्वर, स्वामी परशुराम.

**फलश्रुती** विमलतीर्थाची जी फलश्रुती तीच ह्याची, त्यात अंतर नाही. परंतु पर्वकाळ म्हणजे आश्विन कृष्ण त्रयोदशी ह्या दिवशी ह्या तीर्थात प्रात - काळी स्नान करावे म्हणजे महापातकांची होळी होते विष्णूलोक प्राप्त होतो. ह्या तीर्थाचे एवढे माहात्म्य आहे की ह्याच्या नुसत्या दर्शनाने पातके भस्म होतात.

## ३. अर्घ्यपादकुंड तीर्थ

हे कुंडतीर्थ विमल सरोवराच्या पश्चिमेला नैऋत्य बाजूला आहे (होते) सध्या दिसत नाही बहुधा बुजले असावे श्री सुरेश्वर मंदिराजवळ हे स्थान येते. हा विमल तलावाचाच भाग होय ह्या कुंडात पौष शुद्ध द्वितीयेला स्नान केले असता द्रव्यलाभ होतो सर्व दारिद्र्यनाश होतो येथे स्नान केल्याने काशीस्नान केल्याचे पुण्य मिळते ह्यासंबंधी एक गोष्ट पुराणात सांगितली आहे.

वशिष्ठऋषी येथे एकदा स्नान करीत असता त्याचे हातून पाणीपात्र निसटले व तीर्थांत पडले वशिष्ठऋषींनी खूप शोध घेतला, परंतु मिळाले नाही त्यांना फार दुःख झाले कारण हे भांडे कपिलाषष्ठीस कुबेराने वशिष्ठऋषींना दान दिले होते व विशेष म्हणजे ते विश्वकर्म्याने खास एकमेवाद्वितीय घडवले होते म्हणून वशिष्ठऋषींना ते फार प्रिय होते नारदमुनींनी त्यांना विचारले, "एवढ्या कष्टी मनाने आपण काय शोधता ?" वशिष्ठांनी सांगितले "माझे प्रिय पाणिपात्र" तेव्हा नारदमुनी म्हणाले, "अहो, ते आता काशीस मणिकर्णिका घाटाजवळ मिळेल कारण परशुरामाने तेथील गंगेचा प्रवाह ह्या कुंडात आणून सोडला आहे हा प्रवाह काशीला वाहात जातो" वशिष्ठमुनी तात्काळ देहांतरसिद्धीने काशीस मणिकर्णिका घाटावर आले आणि शोध घेतला असता ते पात्र त्यांना मिळाले म्हणून ह्या कुंडाचा महिमा मोठा आहे सोमवती अमावास्येस येथे स्नान केले असता इंद्रलोक प्राप्त होतो

## ४ सांभव तीर्थ

हे सांब सिद्धेश्वर मंदिराजवळ आहे. सध्या ह्या तीर्थावर जनतेने विहीर बांधली आहे येथील लोकसमजुतीप्रमाणे ह्याला रामकुंड म्हणतात परंतु ते चुकीचे आहे रामकुंड दुसरीकडे गास हद्दीत मळा भागात आहे जनतेच्या उदासीनतेने विस्मरण व गफलत होते असो ह्या तीर्थावर कार्तिक शुद्ध द्वादशीला स्नान केले असता सर्व पापे जळून जातात. विष्णूलोक प्राप्त होतो.

## ५ वैतरणी संगम तीर्थ

**वैतरणी संगम तीर्थ**, रेणुका **तीर्थ, प्रेतनदी संगम तीर्थ**, भगवती **तीर्थ**, **चंडिका तीर्थ**, ह्या सर्व नावांनी हे तीर्थ प्रख्यात आहे. हे स्थान विमल सरोवराचे पश्चिम बाजूला वैतरणी जेथे मिळते ते होय आज तशी वस्तुस्थिती दिसत नाही पश्चिम बाजूला खाडीचे पात्र आहे परंतु हल्ली वैतरणा प्रत्यक्षपणे अर्नाळा येथे समुद्राला मिळते त्यामुळे मोठा गोंधळ उडालेला आहे. परंतु निर्मळ-माहात्म्य पोथीत असा स्पष्ट उल्लेख आहे की "विमलसरोवराचे पश्चिमेला वैतरणा सागराला मिळते तेथे आदिशक्ती भवानी श्रीएकवीरा ब्रह्मरूपिणी वैतरणा तीरावर आहे तेथे महाकाली, कराळी, वेताळी, चंडिका, भद्रकाळी, जोगेश्वरी, महालक्ष्मी, चामुंडा, सिद्धभैरव वगैरेंचा वास आहे हे रुद्रभूमी स्मशान, आदिशक्तीचे तीर्थस्थान असून, स्वत अवधूत दत्तात्रेय तेथे असतात जे दर्शनयात्रा करतात ते मुक्त होतात " (अध्याय ८ वा– निर्मळ-माहात्म्य) ह्यावरून निर्मळ माहात्म्य लेखनकाळी वैतरणीचा ओघ विमल तलावावरून पश्चिमेला खाडीला मिळत असावा कारण भगवान परशुरामाने वैतरणी गंगेचा ओघ आणून विमल

तलावात सोडला असेही वर्णन आहे. आज वैतरणीचे ओघाने पात्र बदललेले दिसते

कार्तिक शु पौर्णिमा ह्या दिवशी वैतरणा संगमावर स्नान करावे, दान-धर्म, क्रियाशुद्धी मौन धरून करावी तेथून शिळातीर्थावर जावे स्नान करावे देवतार्चन करावे क्रियाकर्मांतर करावे, नंतर विमल तीर्थावर यावे तेथे स्नान करावे तेथून पिंडारक तीर्थाला जावे तेथे स्नान करावे. नंतर मौन विसर्जन करावे. यथाशक्ती दान करावे

**फलश्रुती**–ब्रह्महत्या, सुरापान, स्त्रीहत्या, गुरुहत्या, गोहत्या अशी पाच पातके आहेत तसेच गर्भपात, कन्याविक्रय, बालहत्या, सुवर्णचोरी, मातृागमन, ही दुसरी पचपातके आहेत. गवत जाळणे, गाव जाळणे, गोवध, अभक्षभक्षण, अध स्त्रीगमन अशी तिसरी पच पातके आहेत तसेच वेदद्रोह, साधुद्रोह, विष्णूद्रोह, शिवद्रोह, मित्रद्रोह ही चवथी पच पातके आहेत. पैशुन्यवाद, पितृद्वेष, कन्या-भगिनी अभिलाष, बंधुदारागमन, ही पाचवी पचपातके आहेत. ही सर्व पच पचपातके वरील तीर्थात स्नान केल्याने दहन होतात धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारही पुरुषार्थ प्राप्त होतात कार्तिक वद्य ४ ला रेणुका तीर्थात (वैतरणा संगम) स्नान केल्याने पातकनाश होतो स्वर्गप्राप्ती होते कार्तिक वद्य ११ ला स्नान करून पितृतर्पण करावे म्हणजे पितर संतोष पावतात धनधान्यवृद्धी होते पौष व ८ ला भगवती तीर्थात स्नान केले असता मुक्ती प्राप्त होते. विष्णू लोक प्राप्त होतो.

## ६. रंभाशीळा तीर्थ

हे तीर्थ वैतरणा संगमावर रेणुका मंदिराचे जवळच होते–असावे असा स्पष्ट उल्लेख अनेक ठिकाणी निर्मळमाहात्म्यात आलेला आहे वैतरणी संगमावरच शीळातीर्थ आहे ह्यासंबधी हकीगत अशी की पूर्वी विश्वामित्राने उग्र तपाला आरंभ केला. त्यामुळे इंद्राला चिंता पडली की हा माझे इंद्रपद तर घेणार नाही ना? त्याने रंभा नावाच्या अप्सरेला बोलावले व सांगितले की काही उपायाने तू जाऊन विश्वामित्राला मोहित कर आणि त्याचा तपोभंग कर रंभेने आपल्या काही सख्यासह विश्वामित्र आश्रमासमोर येऊन सुस्वर गायन, नृत्याला सुरवात केली तो दाद देत नाही असे पाहून तिने नग्ननृत्य करून कटाक्ष–हावभाव भेदाचे संधान सुरू केले आणि विश्वामित्र आपले तप विसरला आणि काममोहित होऊन रंभेला पकडण्यासाठी धावला, तशी ती घाबरली आणि तिने गंगा नदीत उडी घेतली व आपले शरीर झाकून घेतले तेव्हा तपस्याही गेली आणि रंभाही गेली म्हणून तो संतापला आणि तिला शाप दिला की तू शिळा होऊन पडशील, तेव्हा

वशिष्ठऋषी येथे एकदा स्नान करीत असता त्यांचे हातून पाणीपात्र निसटले व तीर्थात पडले वशिष्ठऋषींनी खूप शोध घेतला, परतु मिळाले नाही त्यांना फार दु ख झाले कारण हे भाडे कपिलाषष्ठीस कुबेराने वशिष्ठऋषीना दान दिले होते व विशेष म्हणजे ते विश्वकर्म्याने खास एकमेवाद्वितीय घडवले होते म्हणून वशिष्ठऋषीना ते फार प्रिय होते नारदमुनीनी त्याना विचारले, " एवढ्या कष्टी मनाने आपण काय शोधता ?" वशिष्ठानी सागितले " माझे प्रिय पाणिपात्र " तेव्हा नारदमुनी म्हणाले, " अहो, ते आता काशीस मणिकर्णिका घाटाजवळ मिळेल कारण परशुरामाने तेथील गगेचा प्रवाह ह्या कुडात आणून सोडला आहे हा प्रवाह काशीला वाहात जातो " वशिष्ठमुनी तात्काळ देहातरसिद्धीने काशीस मणिकर्णिका घाटावर आले आणि शोध घेतला असता ते पात्र त्याना मिळाले. म्हणून ह्या कुडाचा महिमा मोठा आहे सोमवती अमावास्येस येथे स्नान केले असता इद्रलोक प्राप्त होतो

## ४. सांभव तीर्थ

हे सांब सिद्धेश्वर मदिराजवळ आहे. सध्या ह्या तीर्थावर जनतेने विहीर बांधली आहे येथील लोकसमजुतीप्रमाणे ह्याला रामकुड म्हणतात परतु ते चुकीचे आहे. रामकुड दुसरीकडे गास हद्दीत मळा भागात आहे जनतेच्या उदासीनतेने विस्मरण व गफलत होते असो ह्या तीर्थावर कार्तिक शुद्ध द्वादशीला स्नान केले असता सर्व पापे जळून जातात विष्णूलोक प्राप्त होतो.

## ५ वैतरणी संगम तीर्थ

**वैतरणी सगम तीर्थ, रेणुका तीर्थ, प्रेतनदी सगम तीर्थ, भगवती तीर्थ, चडिका तीर्थ,** ह्या सर्व नावानी हे तीर्थ प्रख्यात आहे. हे स्थान विमल सरोवराचे पश्चिम बाजूला वैतरणी जेथे मिळते ते होय आज तशी वस्तुस्थिती दिसत नाही पश्चिम बाजूला खाडीचे पात्र आहे परंतु हल्ली वैतरणा प्रत्यक्षपणे अर्नाळा येथे समुद्राला मिळते. त्यामुळे मोठा गोंधळ उडालेला आहे. परतु निर्मळ-माहात्म्य पोथीत असा स्पष्ट उल्लेख आहे की 'विमलसरोवराचे पश्चिमेला वैतरणा सागराला मिळते तेथे आदिशक्ती भवानी श्रीएकवीरा ब्रह्मरूपिणी वैतरणा तीरावर आहे तेथे महाकाली, कराळी, वेताळी, चडिका, भद्रकाळी, जोगेश्वरी, [illegible] चामडा सिद्धभैरव वगैरेंचा वास आहे हे रुद्रभूमी स्मशान, आदि-

[illegible] अवधूत दत्तात्रय तथ असतात [illegible]

शक्तीचे तीर्थस्थान असून, स्वत करतात ते मुक्त होतात. " (अध्याय ८ वा– निर्मळ-माहात्म्य) ह्यावरून निर्मळ माहात्म्य लेखनकाळी वैतरणीचा ओघ विमल तलावावरून पश्चिमेला खाडीला मिळत असावा कारण भगवान परशुरामाने वैतरणी गगेचा ओघ आणून विमल

तलावात सोडला असेही वर्णन आहे. आज वैतरणीचे ओघाने पात्र बदललेले दिसते

कार्तिक शु पौर्णिमा ह्या दिवशी वैतरणा सगमावर स्नान करावे, दान-धर्म, क्रियाशुद्धी मौन धरून करावी तेथून शिळातीर्थावर जावे स्नान करावे देवतार्चन करावे क्रियाकर्मांतर करावे, नंतर विमल तीर्थावर यावे तेथे स्नान करावे तेथून पिडारक तीर्थाला जावे तेथे स्नान करावे. नतर मौन विसर्जन करावे यथाशक्ती दान करावे


फलश्रुती–ब्रह्महत्या, सुरापान, स्त्रीहत्या, गुरुहत्या, गोहत्या अशा पाच पातके आहेत तसेच गर्भपात, कन्याविक्रय, बालहत्या, सुवर्णचोरी, मात्रागमन, ही दुसरी पचपातके आहेत गवत जाळणे, गांव जाळणे, गोवध, अभक्षभक्षण, अग्र स्त्रीगमन अशी तिसरी पच पातके आहेत तसेच वेदद्रोह, साधुद्रोह, विष्णूद्रोह, शिवद्रोह, मित्रद्रोह ही चवथी पच पातके आहेत पैशुन्यवाद, पितृद्वेष, कन्या-भगिनी अभिलाष, बधुदारागमन, ही पांचवी पचपातके आहेत. ही सर्व पच पचपातके वरील तीर्थात स्नान केल्याने दहन होतात धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारही पुरुषार्थ प्राप्त होतात कार्तिक वद्य ४ ला रेणुका तीर्थात (वैतरणा सगम) स्नान केल्याने पातकनाश होतो स्वर्गप्राप्ती होते कार्तिक वद्य ११ ला स्नान करून पितृतर्पण करावे. म्हणजे पितर सतोष पावतात धनधान्यवृद्धी होते पौष शु ८ ला भगवती तीर्थात स्नान केले असता मुक्ती प्राप्त होते. विष्णू लोक प्राप्त होतो.

## ६ रंभाशीळा तीर्थ

हे तीर्थ वैतरणा सगमावर रेणुका मदिराचे जवळच होते–असावे असा स्पष्ट उल्लेख अनेक ठिकाणी निर्मळमाहात्म्यात आलेला आहे वैतरणी सगमा-वरच शीळातीर्थ आहे ह्यासबंधी हकीगत अशी की पूर्वी विश्वामित्राने उग्र तपाला आरभ केला त्यामुळे इद्राला चिंता पडली की हा माझे इंद्रपद तर घेणार नाही ना ? त्याने रभा नावाच्या अप्सरेला बोलावले व सागितले की काही उपायाने तू जाऊन विश्वामित्राला मोहित कर आणि त्याचा तपोभग कर. रभेने आपल्या काही सख्यासह विश्वामित्र आश्रमासमोर येऊन सुस्वर गायन, नृत्याला सुरवात केली तो दाद देत नाही असे पाहून तिने नग्ननृत्य करून कटाक्ष–हावभाव भेदाचे सधान सुरू केले आणि विश्वामित्र आपले तप विसरला आणि काममोहित होऊन रभेला पकडण्यासाठी धावला, तशी ती घाबरली आणि तिने गंगा नदीत उडी घेतली व आपले शरीर झाकून घेतले. तेव्हां तपस्याही गेली आणि रभाही गेली त्यावर तो संतापला आणि तिला शाप दिला की तू शिळा होऊन पडशील, तेव्हा

रंभेने गयावया करून सांगितले, " महाराज, इद्राने आज्ञा केली म्हणून माझ्याकडून ही अवज्ञा घडली, ह्यात माझा काय दोष ?" तेंव्हा विश्वामित्राने तिला सांगितले " माझा शाप खोटा होणार नाही परन्तु उःशाप देतो पुढील काळात भगवान परशुराम सुरपूर क्षेत्र निर्माण करील तेंव्हा त्याच्या पदस्पर्शाने तू पूर्वरूप पावशील व उद्धरून जाशील " तेंव्हा शिळा वाहात वाहात परशुरामाने गगाप्रवाह वैतरणा जवळ आणून सोडला तेथपर्यंत आली व वैतरणा सगमावर स्थिरावली परशुरामाने रेणुका मन्दिराची वैतरणा सगमावर स्थापना करते वेळी त्याचा पदस्पर्श ह्या रभा शीलेला झाला तेंव्हा ती मुक्त होऊन स्वर्गलोकी गेली परन्तु शीलेचे जागी परशुरामाने तीर्थ निर्माण केले व त्याला नांव दिले, रभाशीला तीर्थ, व तेही पुण्य-पावन क्षेत्र-तीर्थ झाले

हे तीर्थ वैतरणी सगमावर आहे त्यात स्नान केले असता ब्रह्महत्यादी पातके जळून जातात कार्तिक शु ८ ला येथे स्नान करावे दुसरे कपिलकुंड, तिसरे अरोग कुड, तिसरे भैरव कुड व चवथे श्री जखेश्वरी कुड, ही चारही तुगार पर्वतावर आहेत. ह्या पाचही कुडाना पच महाकुडे म्हणतात ह्या पाच कुंडात स्नान करून श्री जखेश्वरीचे पूजन करावे नतर श्री तुगारेश्वराचे पूजन करावे त्याने अपार पुण्यप्राप्ती होते असे निर्मळ-माहात्म्य ग्रथात सांगितले आहे कार्तिक वद्य १५ अमावास्येला स्नान करून पिंडदान करावे. ब्राह्मण सतर्पण करून श्री रेणुकामातेचे पूजन करावे म्हणजे पितृगण सतोष पावतात. पौष शु. पौणिमा



श्रीचक्रतीर्थ-सोमतीर्थ

ह्या दिवशी ह्या तीर्थात स्नान केले असता धनधान्ये विपुल होतात, उत्तम गती मिळते असे परशुरामाने ऋषिमुनींना सांगितले असे निर्मळ-माहात्म्यात सांगितले आहे

## ७. चक्रतीर्थ—चंद्रशेखर तीर्थ—सोमतीर्थ

हे तीर्थ म्हणजे एक मोठा तलाव असून सोपारे हद्दीत श्री चक्रेश्वर मंदिराचे समोर आहे हे अतिशय पवित्र तीर्थ आहे विमलासुराला मारल्यानंतर ह्या ठिकाणी भगवान परशुरामाने आपले चक्र ह्या तलावात धुतले म्हणून ह्याला चक्रतीर्थ म्हणतात ह्याचे काठी श्री चक्रेश्वर महादेवाचे पावन मंदिर आहे बुरुड राजाची लाडकी राणी ह्याच चक्रतीर्थावरील पाण्यावरून चालत जाऊन मध्य-भागी असलेल्या कुंडातून पाणी भरून आणीत असे आश्विन कृष्ण १२ ला ह्या तीर्थात स्नान करून पिंडदान करावे ब्राह्मणाना दाने द्यावीत म्हणजे पुण्यपावन होतो कार्तिक शु ९ ला येथे स्नान केले असता चंद्रासारखे शरीर तेजस्वी होते म्हणून ह्याला सोमतीर्थ म्हणतात

## ८. भद्रतीर्थ उर्फ रुक्मिणी तीर्थ—यागतीर्थ

हे तीर्थ सोपारे येथे चक्रेश्वर तलावाचे पूर्वेस सोपारा—दादरा भागापासून म्हणजे हल्लीचा समेलपाड्यापासून ५० यार्डावर कबरस्तानचे जवळील वडाचे झाडाजवळ होते भद्रतलाव म्हणत त्याचा अपभ्रंश होऊन बधतलावडी असे रूप जनतेच्या तोंडी होते एका काळी हे ठिकाण अतिपवित्र तीर्थ होते व चांगले बांधून काढलेले होते गाळामुळे बुजत आले आहे त्यामध्ये प्रचंड संपत्ती गाडलेली आहे असा समज आहे परंतु खणावयास जाईल त्यातील पहिले दोन बळी जातील अशी श्रद्धा आहे; ह्याला रुक्मिणीकुंड नाव पडण्याचे कारण पद्मपुराणात सांगितले आहे की, एकदा पार्वतीभवानीने भगवान शंकराला विचारले, "तरुण स्त्रीला सौभाग्य कोणत्या तीर्थावर प्राप्त होईल ? कुमारिकेला आरोग्यपूर्ण श्रीमंत पती, वांझेला पुत्र, निर्धनाला संपत्ती कोणत्या तीर्थात स्नान केले असता प्राप्त होईल ?" [illegible] दिले "पृथ्वीवर भद्रतीर्थ परशुराम क्षेत्री आहे, तेथे ह्या सर्व गोष्टी प्राप्त होतील ज्या ठिकाणी परशुरामाने पाळपंजर दैत्य मारला त्या जागेवर त्याने भद्रतीर्थ निर्माण केले आहे" श्री लक्ष्मीने विष्णूना वैकुंठलोकी हाच प्रश्न विचारला, तेव्हां भगवान विष्णू म्हणाले, "पश्चिम समुद्रावर परशु-रामाने परशुरामक्षेत्र निर्माण केले आहे, ते हे भद्रतीर्थ त्याने निर्मिले आहे त्या ठिकाणी स्नान केले असता स्त्रियांचे सौभाग्य वाढते" श्री लक्ष्मी तावडतोब त्या तीर्थावर गेली कृष्णावतारी रुक्मिणी होणार म्हणून तिने तेथे स्नान केलें. तेव्हा-पासून त्या तीर्थाला रुक्मिणी कुंड असे नाव पडले. पुढे कृष्णावतारी रुक्मिणी कृष्णासह येथे आली व कृष्णासह येथे स्नान केले, सौभाग्यवाणे वाटली. म्हणून

रुक्मिणीकुड नाव कायम झाले म्हणून ह्या ठिकाणी ब्राह्मणाला करकोदरे द्यावीत, प्रेमाने सावित्री पूजा बांधावी, मातीची भाडी पाण्याने भरून वायव्यकोनी दान करावी. म्हणजे रुद्रलोकप्राप्ती होते ब्राह्मणभोजन, यथाशक्ती दान करावे. त्याने रुक्मिणीनारायण सतोष पावतो सर्वांचे कल्याण होते सौभाग्यवाणे विधि-पूर्वक ज्या वाटतात, त्याना पतीसह उत्तम फळ मिळते.

ह्या रुक्मिणीकुडावर निरनिराळ्या पतिव्रतानी, वसिष्ठपत्नी अरुधतीने अनेक ऋषिपत्नीसह स्नाने केली आहेत त्या सर्व सौभाग्य पावल्या. पुत्रपौत्री-ऐश्वर्यवत झाल्या ह्या तीर्थाचा महिमा अद्‌भुत आहे वध्येला पुत्र होतो मनुष्याला द्रव्यप्राप्ती होते विष्णूदूत वदन करून सायुज्य मुक्ती देतात असे हे अद्‌भुत तीर्थं आहे मार्गशीर्ष शु ७ ला स्नान करावे श्रेष्ठ फळ मिळते.

हेच यागतीर्थ आहे पौष शु ३ ला येथे स्नान करावे म्हणजे महापातक-नाश होतो. पुण्य वाढते.

## ९. श्रीराम (परशुराम) कुंड

हे तीर्थकुड गास हद्दीतील भाटाळे व शिरमोळी तलावांच्या दक्षिणेला १५० यार्डावर आहे. गास ग्रामपचायत हद्दीत एक मोठे तळे आहे. त्याला नैसर्गिक अति प्राचीन बांध आहे त्याचे जवळ मळा नावाचा भाग आहे त्या ठिकाणी हे श्री परशुराम कुड आहे गेल्या दुष्काळी परिस्थितीचे वेळी सरकारने दुष्काळी कामे काढली त्यात हे आता नीट उत्खनन करून काढले आहे

ह्याची लाबी ४५ फूट व रुदी ४५ फूट चौरसाकृती असून वरचे १५ फुटाचा भाग मातीचे उताराचा असून खाली ९ इच रुद, ६ इच जाड अशा ११ ओबडधोबड पायऱ्या आहेत त्याचे पूर्व किनाऱ्यावर एक मोठे शिवलिंग भगून पडले होते. पोर्तुगीज काळी त्याचा उपयोग चुन्याच्या घाणीसाठी खीळ म्हणून केला जात असे नासिक येथील पांडव लेण्यांतील ह्या रामकुडाचा उल्लेख रामतीर्थ असा असून येथे राहणाऱ्या चरक पथीय भिक्षूना काही दाने दिली आहेत. त्याच लेखात असे म्हटले आहे की, पाडवांनी ह्याच रामतीर्थावर स्नान केले असावे हे ठिकाण एके काळी प्रसिद्ध यात्रेचे ठिकाण होते सोपाऱ्याचे परिसरांतील लोक श्रावण महिन्यात येथे स्नानाकरिता १९२० पर्यंत येत असत अशी माहिती मिळते

हे ठिकाण प्रत्यक्ष भगवान परशुरामाने निर्माण केले आहे त्याचेच नावाने ते प्रसिद्ध आहे ह्याच ठिकाणी इद्रप्रस्थाचे धर्मराज प्रभृती पंच पाडव, भगवान श्रीकृष्ण, रुक्मिणी, बलराम, धौम्य ऋषी, लोमहर्षण ऋषी, वशिष्ठ-अरुधती ऋषी वगैरे असख्य पावन मडळी ह्या तीर्थात स्नान करून पावन होऊन गेली त्यातील काही स्थाईकही झाले, अशी नोंद वेदव्यासांनी आपल्या जय नावाच्या महाभारत इतिहास-पुराण-ग्रथात नोंदवून ठेवली आहे तसेच ह्या तीर्थस्नानाची फलश्रुतीही

लिहून ठेवली आहे " जो सुरपूर येथील प्रसिद्ध श्री (परशु) रामकुंडात स्नान करील त्याला सुवर्णप्राप्ती होईल. जो सुमारे पंधरा दिवसाचे व्रत ह्या तीर्थावर करून ह्यात स्नान करील त्याला युवराजपद प्राप्त होईल."

निर्मळ-माहात्म्य व पद्मपुराणात सांगितले आहे की, हे (परशु) रामकुंड म्हणजे विष्णुतीर्थ आहे. ह्याला पृथु-उदक तीर्थ असेही नाव आहे येथे कार्तिक वद्य १४ ला स्नान केले असता पुण्यराशी प्राप्त होतात परमगती प्राप्त होते स्नानाने सर्व पापे नष्ट होतात पावन होतात

## १०. नीलेंद्र कुंड– द्रोणतीर्थ

हे कुंड नील पर्वतावर आहे हा डोंगर नालासोपारा स्टेशनचे पश्चिमेला जवळच आहे पायथ्याशी एक विहीर आहे वर हल्ली एक मंदिर बांधलेले आहे येथेच नीलेंद्र कुंड आहे अश्विन वद्य १४ ह्या दिवशी ह्या कुंडावर स्नान केले असता पापाचा नाश होतो पुनर्जन्म येत नाही इंद्रादी देव त्याला वंदन करतात हे सर्व तीर्थ आहे

## ११. देवकुंड तीर्थ

हे वाघोळी ग्रामपंचायत हद्दीत देवतलाव स्टॉपजवळ आहे ह्या तीर्थासमोर मारुतीचे मंदिर प्रशस्त आहे हे तीर्थ सुमारे चार एकरांचे तरी असावे मारुती मंदिर पेशवेकाळात स्थापन झालेले दिसते परंतु ह्या ठिकाणी फिरंगीपूर्वकाळी मोठे शिवालय असावे फिरंग्यानी त्याचा नाश केल्यावर पेशवेकाळी झटपट मारुती मंदिरात रूपांतर करून स्थानरक्षण केले गेले असावे ह्या मंदिरासमोर पूर्वीच्या मंदिराचे सापडलेले काही अवशेष बाहेर पडलेले आहेत मार्गशीर्ष वद्य ८ ला ह्या कुंडात स्नान केले असता शुद्धता प्राप्त होते, मनुष्याची पातके नष्ट होतात, व सार्वभौमत्व मिळते

## १२ इंद्रायणी तीर्थ

हे तीर्थ गास ग्रामपंचायत हद्दीत आहे तेथील लोक आजही इंद्राणी तलाव असे म्हणतात हे इंद्रायणीचे अपभ्रष्ट रूप आहे हे सहज समजण्यासारखे आहे इंद्राणी हेच नाव सरकारी ग्रामपंचायत दप्तरात नोंदलेले आहे हेच ते निर्मळ माहात्म्यात वर्णन केलेले इंद्रायणी तीर्थ. पौष शुद्ध एकादशीला ह्यात स्नान केले असता आरोग्यप्राप्ती होते.

## १३. काक तीर्थ – काककुंड

हे तीर्थ गास हद्दीतील प्रसिद्ध ब्रह्मटेकडीच्या दक्षिणेला असून त्याला स्थानिक लोक काकलई तलाव म्हणतात हे बरेच बुजत आले आहे व त्याचे शेत झाले

आहे. परतु थोडया भागात अजून पाणी आहे निर्मळ-माहात्म्यात वर्णन केलेले काककुंड ते हेच मार्गशीर्ष शु १ ला ह्या तीर्थात स्नान केले असता सप्त-जन्माच्या पापराशी नष्ट होतात.

## १४ विनायक तीर्थ – गजतीर्थ

हे तीर्थ गास ग्रामपचायत हद्दीत आहे मार्गशीर्ष वद्य ४ ला सकष्टी चतुर्थीला येथे स्नान केले असता सर्व दोष नष्ट होतात ह्यालाच गजकुडही म्हणतात पौष शु ९ ला येथे स्नान केले असता गणपती सतुष्ट होतो विघ्नाचा नाश करतो. कार्यसिद्धी होते व बुद्धी प्रगल्भ होते. विद्या प्राप्त होते. नवनिधी घरात येतात स्त्रियांना सौभाग्य प्राप्त होते येथील लोक ह्याला गणेशकुंड म्हणतात

(१५) **ब्रह्मतीर्थ**, ब्रह्मालय, ब्रह्मावेणी-ऋषीतीर्थ, कर्णतीर्थ हे तीर्थ गास गाव ग्रामपचायत हद्दीत ब्रह्मटेकडीचे पश्चिमेला ५० यार्डावर आहे काही भाग बुजला आहे व काही भागात अजून पाणी आहे. ह्याला विसरळतळे असे स्थानिक नाव होते हे ब्रह्मतीर्थ आहे. ह्या तीर्थात कार्तिक शुद्ध ७ ला स्नान केल्यास राजसूय यज्ञाचे फळ मिळते, असे येथील माहात्म्य आहे मार्गशीर्ष शुद्ध २ ह्या दिवशी सकाळी ह्या तीर्थात स्नान करावे, म्हणजे सहस्र गोदानपुण्य मिळते. जे ब्राह्मण स्नान करतात ते वेदपरायण होतात सर्वत्र मान्यता पावतात. वैश्य असतील त्याना धनसमृद्धी मिळते दुःख-दारिद्रच-व्याधी नष्ट होते जे क्षत्रिय स्नान करतात ते राजे होतात रणांत विजय पावतात शूद्रानी स्नान केले असता अंती ब्राह्मणजन्म येतो मार्गशीर्ष वद्य ७ ह्या दिवशी स्नान केले असता यज्ञाचे फळ मिळते ह्या कुडास ऋषीकुड असेही नाव आहे कारण ह्या ठिकाणी ऋषी-मुनीचा निवास होता

## १६ उत्पळेतीर्थ – रेवातीर्थ

हे तीर्थ गास ग्रामपंचायत हद्दीत आहे तेथील लोक त्याला उत्पलबाव म्हणतात त्याच नावाने महसूल दप्तरी नोंदलेले आहे

ह्या तीर्थावर कार्तिक शु ३ ला सूर्योदयी स्नान करावे, दान द्यावे म्हणजे महायज्ञाचे फळ मिळते अती वैकुंठप्राप्ती होते

## १७. कोळवापी तीर्थ

हे तीर्थ गास ग्रामपचायत हद्दीत आहे येथील लोक ह्याला कोळबाव असे त्यांचे भाषेत म्हणतात तशीच नोंद दप्तरीही आहे.

कार्तिक शु २ ला ह्या तीर्थावर स्नान करावे म्हणजे ह्या जन्मीचे पाप नष्ट होते अक्षय्य पुण्यप्राप्ती होते.

## १८ महालय तीर्थ

हे गास हद्दीतील सर्वांत मोठे तळे. एवढे मोठे तळे संपूर्ण ठाणे जिल्ह्यात नाही. ह्या तलावात मध्यभागी एक प्राचीन बंधारा आहे समोरच ग्रामपचायतीचे ऑफिस व शाळा आहे कार्तिक वद्य ८ ला ह्या तीर्थात स्नान केले असता सर्व पातके जळून जातात ज्याप्रमाणे चिखलात कमळ उमलते परंतु निर्लेप होते त्या-प्रमाणे शरीर निर्लेप होते पापे पुन्हा चिकटत नाहीत

## १९. औदुंबर तीर्थ

हे दखील गास गावात आहे लोक ह्याला शांबोडबाव म्हणतात हे औदुंबर तीर्थ आहे कार्तिक वद्य ७ ला ह्या पावन तीर्थात स्नान केले असता सहस्र गोदानाचे फळ मिळते

## २०. त्रुटीतीर्थ

हे तीर्थ देखील गास हद्दीत आहे येथील लोक त्यांचे भाषेत खुटलई म्हणतात ग्रामपंचायत दप्परी तशीच नोंद आहे मार्गशीर्ष वद्य ३ ला ह्या ठिकाणी स्नान केले असना कोटी गोदानाचे पुण्य मिळते, असे निर्मळ-माहात्म्यात सांगितले आहे.

## २१. लवण तीर्थ (शिरमोळी)

हे देखील गास ग्रामपचायत हद्दीत आहे. येथील लोक त्याला शिरमोळी उर्फ कढई तीर्थ म्हणतात ग्रामपचायत दप्तरी तशीच नोंद आहे ह्या तीर्थात पौष शु १४ ला स्नान केले असता मनुष्याला अक्षय्य स्वर्गवास मिळतो ध्रुवा-सारखे अढळ स्थान मिळते

## २२ पिंडारक तीर्थ

हे तीर्थ रानगांव येथे मराठी शाळेसमोर आहे प्राचीन काळी येथे घनदाट अरण्य होते ह्या तीर्थावर जाण्यासाठी वसई-रानगाव बसेस आहेत. ह्याला येथील लोक नवतीर्थ म्हणतात ह्या तलावाजवळ गावाचे सुरुवातीला एक हनुमान मंदिर आहे ते खूप मोठे आहे पेशवेकाळांत जीर्णोद्धारित झाले असावे परंतु ह्या मदिरात पूर्वी शिवमदिर असले पाहिजे मोठे भव्य शिल्पयुक्त मदिर असले पाहिजे कारण काही शिल्पे ह्या तलावात सापडली ती बाहेर मांडून ठेवलेली आहेत. एक गजलक्ष्मीचे शिल्प बाहेर मांडलेले आहे मराठी शाळेसमोर अष्टभुजा महिषासुरमर्दिनी मूर्ती सुमारे ६ फूट उंचीची झाडाला टेकून ठेवलेली आहे शिल्प फार सुंदर आहे. लोक सध्या त्याला अष्टभुजा देवी म्हणतात. ही

मूर्ती ह्याच तीर्थात सापडली पूर्वी तीर्थ फार मोठे होते आता काही भाग बुजून बाजूच्या लोकानी आक्रमिला आहे.

ह्या तीर्थावर श्राद्धतर्पण केले असता पितराना मोक्ष मिळतो ते तात्काळ उद्धरून जातात हे महापवित्र स्थान आहे

ही दुर्लभ यज्ञभूमी आहे. हे स्थान देवांनाही दुर्लभ आहे परतु नुसत्या स्नानानेच मानवाला निर्वाणपद प्राप्त होते अश्वमेधयज्ञाचे फळ मिळते. जे येथील उदक प्राशन करतात ते भवसागर तरून जातात हे स्थान एवढे पवित्र आहे की देव सुद्धा ह्या स्थानाला वदन करतात.

## २३ धूतपाती तीर्थ

पापडी नाक्यावर एक तलाव आहे, त्याचे नाव सध्या कोणालाच माहित नाही परंतु तलाव मोठा विस्तृत आहे. पापडीचे मूळचे नाव धोवली–धौली असे आहे बहुधा धूतपातीचे अपभ्रष्ट रूप धौली झाले असावे तलावाचे नाव धूतपाती तीर्थ आहे कार्तिक वद्य १ ह्या दिवशी येथे स्नान केले असता सर्व पातके नाश पावतात अश्वमेध यज्ञ केल्याचे पुण्य मिळते मार्गशीर्ष शु ४ ला स्नान केल्याने तेंच फळ मिळते.

## २४. ताम्रतीर्थ

सप्तगोदातीर्थ- कुशव्याधातु तीर्थ पापडीवरून वसईकडे जाताना बस वळते त्या कोपऱ्यावर हा तलाव आहे आजही लोक त्याला ताम्र तलाव म्हणतात. हेच ते पुराणांतरीचे ताम्र तीर्थ कार्तिक वद्य ९ ह्या दिवशी येथे स्नान केले असता सर्व पापे धुतली जातात विष्णुलोक प्राप्त होतो मार्गशीर्ष शु पौर्णिमा ह्या दिवशी ह्या तीर्थावर पितृश्राद्ध केले असता पितर सतोष पावतात निपुत्रिकाला संतती प्राप्त होते धनधान्यवृद्धी होते. तीनही ऋणातून मुक्त होतो हे तीर्थ गोदावरीप्रमाणे ह्या पृथ्वीवर पवित्र तीर्थ आहे

## २५. तुळातीर्थ

हे तीर्थ नाला सोपारा स्टेशनचे पूर्वेस पेल्हार रस्त्याला लागून जे दोन डोंगर आहेत त्यातील लहान डोंगर म्हणजे राक्षी डोंगर. ह्यालाच तुलिनी टेकडी म्हणतात. कारण ह्यावर तुळातीर्थ आहे येथे परशुरामाने सुवर्णतुला करून दान दिले म्हणून तुलिनी डोंगर असे नाव पडले ज्या तीर्थावर तुळा केली ते तुळा तीर्थ ह्या ठिकाणी आश्विन वद्य ११ ह्या दिवशी स्नान करावे म्हणजे पुण्यराशी जोडल्या जातात. तेथे शक्य असल्यास तुलादान करावे

## २६. नंदिका तीर्थ

हे तीर्थ नंदाखाल ह्या ठिकाणी विरार-अर्नाळा रोडवर आहे विरारपासून निघून उम्बरगोठणी स्टॉपवर उतरावे. १० मिनिटांचे रस्त्यावर येथून हा तलाव आहे हेच ते नदिका तीर्थ येथे पूर्वी नदिकेश्वराचे मदिर होते परंतु फिरंगी अंमलात ते पाडून तेथे नदी असलेले जागेवर चर्च उभारण्यात आले. नदी गाडून चर्च केले म्हणून त्या ठिकाणाला नदाखाल असे नाव पडल्याचे येथील लोक सांगतात. चर्चजवळच एक मोठा तलाव आहे, हेच ते नंदिका तीर्थ हे महापुण्य-स्थान असून तेथे पौष शु १३ ला स्नान केले असता सर्व पातकाचा नाश होतो. हे महातीर्थ आहे

## २७ नागकुंड

ह तीर्थ अचोळा गाव व नालासोपारा स्टेशन ह्यांचे मध्यावर रेल्वेचे पूर्व बाजूला रेल्वेपासून समोर आहे बाजूला डोंगर आहे ह्या तलावाचे नाव नाग तलाव ऊर्फ नागकुड. हा जानेवारीपर्यंत हल्ली सुकून जातो बराच भरून गेला आहे परंतु पावसाळ्यात व नतर दोनतीन महिने पाणी राहते ह्याचे नाव नागकुड पडण्याचे कारण या तळ्याचे भागात सर्प फार मोठ्या प्रमाणावर आढळतात त्यामध्ये प्रचंड सपत्ती गाडलेली आहे अशी श्रद्धा आहे परतु कोणी काढण्याचे धाडस करीत नाही निर्मळ-माहात्म्य म्हणते, ह्यांत मार्गशीर्ष वद्य ५ ला स्नान केल्याने अश्वमेधयज्ञ, सोमयाग केल्याचे पुण्य मिळते ससाराची फेरी चुकते. स्वर्गलोक प्राप्त होतो.

## २८. धर्मेश्वर कुंड

हे धर्मराजाने बाधले पांडवांचा ज्येष्ठ भाऊ धर्मराज ऊर्फ युधिष्ठिर याने बांधले असे म्हटले जाते हे तीर्थ अचोळा गावाचे मुखावरच आहे नालासोपारा स्टेशन पूर्वेला वसईकडे जाणारा एक रेल्वेला समांतर रस्ता गेला आहे तो अचोळा गावांत जातो वसईकडून जाण्यास रस्ता नाही गावाच्या बाहेरच हा सुमारे १० एकराचा प्रचड तलाव दिसतो पूर्वी बाधून काढलेला असावा हे तीर्थ सदैव कमळांनी भरलेले असते पाणी बाराही महिने असते ह्या तलावाचे नांव धर्माळे असेच पंचायत दप्तरी नोंदलेले आहे मार्गशीर्ष शु ८ ह्या दिवशी ह्या तीर्थात स्नान करून जे पिंडदान करतात त्यांचा सप्तगोत्रासहित उद्धार होतो पूर्वी धर्मेश्वर राजाने येथे पिंडदान केले म्हणून धर्मेश्वर तीर्थ म्हणतात ह्या तीर्थाला गणेश घाट आहे जवळ पिंपळाचा पार आहे तेथे पूर्वी महाकाळेश्वराचे मंदिर होते त्याचे थोडे अवशेष, एक शिवलिंग, नदी पारावर झाडाखाली आहे मूळ मदिराचे

...७

अवशेष वापरून सध्या तेथे विठ्ठल मंदिर स्थापन केले आहे. परंतु त्या मंदिराची काही प्राचीन शिल्पे व छोटी विष्णूमूर्ति विठ्ठल मदिरात ठेवलेली आहे.

## २९. कनखळ तीर्थ

हे तीर्थ देखील अचोळे खेड्याचे पूर्वेकडील डोंगरीजवळ आहे ही एक विहीरच आहे ह्या विहिराचे पाणी तसे थोडेच आहे परंतु बारा महिने कितीही उपसले तरी तेवढेच राहते चागले जिवत झरे आहेत. पाणी उत्तम आहे. ह्या तीर्थात पौष शु ४ ला स्नान करून नारळ, केळे अर्पण करावे धान्य, फळे अर्पण करावीत महाकाळेश्वर पूजावा कुमारीने चंदन, कुंकुम अर्पण करावे नाना वाद्य व कीर्तन करून ब्राह्मणमुखानें वेदपठण करवावें प्रदक्षिणा घालावी. महापातकनाश होतो. संतती सपत्ती वाढते विष्णुपदाला जातो

## ३०. खादिर कुंड

हे तीर्थ अचोळे गावासमोरील डोंगराचे पलीकडे तुंगार बाजूला आहे. चांगले बाधून काढलेले आहे पाणी रोगनाशक आहे ह्याचा तेथील लोकास अनुभव आहे. निर्मळमाहात्म्यांत ह्यासंबधी एक कथा दिली आहे. प्रचेतस नावाचा एक ब्राह्मण होता त्याचे पत्नीचे नाव सुलजा त्यांना एक मुलगा होता त्याचे नाव भास्कर मुलगा फार लहान होता ब्राह्मण रोज रानात जाई, लाकडे घेऊन येई एक रात्री त्याला उशीर झाला बाल भास्कर तेवढ्यात दारातून रांगत बाहेर आला होता तो प्रचेतसाचे बैलगाडीखाली सापडला व तत्काळ मेला अधेरामुळे प्रचेतस ब्राह्मणाला काही दिसले नाही गाडीचा आवाज ऐकू आला म्हणून त्याची पत्नी सुलगा बाहेर आली परतु दारातच आपल्या मुलाचे रक्ताने भरलले प्रेत पाहून ती घाबरली, परतु आपल्या पतीला ह्याचा पत्ता नाही हे पाहून ती समजली की काय प्रकार झाला आहे पती अतिशय दमून भुकेने व्याकुळ होऊन आलेला आहे, त्याला हे कसे सांगावे ? मोठ्या जड अत करणाने तिने मनाला आवर घातला आणि विचार केला, आताच जर सांगितले तर पुत्रशोकाने पति मरूनच जाईल म्हणून त्याला स्वस्थपणें जेवू घालावे व जरा मन शांत झाल्यावर सांगावे मोठ्या कष्टाने मन आवरून तिने पतीला हात पाय धुण्यास पाणी दिले त्याला जेवू खाऊ घातले. एवढ्यात ब्राह्मणानेच विचारले, " आपला बाळ कुठे आहे ? " आणि ह्या प्रश्नानेच तिला रडू कोसळले. तिने रडत रडतच हकीगत सांगितली, आणि ब्राह्मणाने हबरडा फोडला. आपल्याच हाताने आपल्या लाडक्या बाळाचा मृत्यू ओढवला म्हणून तो स्वत ला दोष देऊ लागला शेवटी पत्नीने त्याचे कसे बसे सांत्वन केले. ते पुढे नित्यकर्माला लागले तरी ब्राह्मणाला वाटे, " माझे मागे बाल-हत्या लागली हे पाप मला सोडणार नाही " थोड्याच दिवसात ब्राह्मणाला एक विचित्र रोग जडला. रात्र झाल्यावर त्याचे शरीर रक्त पू इत्यादीनी फुलून

जायचे तो वेदनानी तळमळायचा. पत्नी त्याला धुऊन पुसून काढायचा, मलमपट्टा करायची, तेव्हा त्याला झोप लागत असे एक दिवस त्याच्या पत्नीला मलमपट्टी करताना आढळले की हात व पाय एकदम बरे झालेले तेव्हा तिने त्याला विचारले, "आज एवढाच भाग बरा कसा दिसतो ? तुम्ही काय ह्याला लावले ? " त्याने उत्तर दिले, " काही नाही, फक्त एका ठिकाणी अतिशय तहान लागली म्हणून एक कुड दिसले, तेथे हातपाय धुतले व पाणी प्यालो. " पत्नीच्या लक्षात सर्व गोष्ट आली की हा त्या पाण्याचा गुण आहे तिने सकाळी सांगितले, " मी आज बरोबर येते तुम्ही कालचे पाण्याचे कुड दाखवा " सकाळीच दोघे निघाले. जगलात खूप फिरले परतु त्याना कुड सापडेना थकून गेले सूर्य डोक्यावर आलेला, काय करावे सुचेना एवढ्यात तिने समोर एका झाडाखाली एक ऋषी बसलेला पाहिला, तिने जाऊन तत्काळ त्याचे पाय धरले आणि झालेली हकीगत सागितली ते म्हणाले, त्या कुडाचे नाव खादिर कुड ते समोरच आहे ब्राह्मण पत्नीने त्याचे आभार मानले आणि पतीला घेऊन तत्काळ त्या कुडावर गेली पतीला त्या कुंडाचे पाण्याने स्नान घातले आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याचे शरीर थोड्याच वेळात पूर्ण रोग-मुक्त होऊन कांतिमान झाले ब्राह्मणपत्नीने पतीला घेऊन लोमहर्षण ऋषींचा आशीर्वाद घेतला आणि आनदाने घरी गेली ब्राह्मणाचा बालहत्येचा दोष नाहीसा झाला

ह्या कुडात मार्गशीर्ष शु. ९ ला स्नान करावे म्हणज ब्रह्महत्या, बालहत्या, इत्यादी दोष नाहीसे होतात अचोळे गावातील लोकाना ह्या कुडाचे पाण्याने त्वचारोग नाहीसे होतात ह्याचा अनुभव आहे असे तेथील जाणकार वृद्ध मंडळी सागतात

## ३१ आमाघाकाश तीर्थं

ह्याचे निश्चित ठिकाण समजू शकलेले नाही, परतु पिंडारक तीर्थाच्या परिसरात जवळ पासच आहे येथे स्नान केल्याने समस्त दोष हरण होतात

## ३२. मनोमती तीर्थ

ह्याचेही स्थान आम्हास निश्चित करता आलेले नाही परतु हेही पिंडारक तीर्थ परिसरातच कोठेतरी आहे

कार्तिक शु ४ ला येथे स्तानदान करावे. त्याला पुण्याची गणती नाही. अमोघ पुण्य प्राप्त होते असा एथला महिमा अद्‌भुत आहे त्यामुळे वध्येला संतती प्राप्त होते स्त्रियांना अखड सौभाग्य प्राप्त होते धनधान्य व ऐश्वर्यवृद्धी होते येथे स्नान-पिंडदान केले असता पितराना वैकुठ प्राप्त होतो तसेच कार्तिक वद्य ५ ला ही स्नान करावे सर्व पातकाचा नाश होतो.

## ३३. वरंडक तीर्थ

ह्याचे ही स्थान निश्चित झाले नाही परतु पिंडारकचे परिसरात कोठेतरी आहे येथे कार्तिक शु १ ला स्नानदान करावे व १००० सवत्स धेनू दानाचे पुण्य मिळते नुसते स्नान केल्यानेही पुण्य वाढेल कोटाचे स्टॉपजवळ वडार स्टॉप आहे तेथे हे असल्यास असे नाव पडण्याची शक्यता आहे

## ३४. दिघा तीर्थ

हे तीर्थ वसईतील होळी भागात आहे ह्याला दिघी तलाव म्हणतात ह्याचे जवळ आनद भवानी देवीचे मंदिर आहे चैत्र वद्य ८ ला येथे यात्रा भरते हे महातीर्थ म्हणून वर्णन केलेले आहे. ह्या तीर्थात मार्गशीर्ष शु १३ ला स्नान केले असता पुनर्जन्म नष्ट होतो

## ३५. नालिकेत तीर्थ

हे तीर्थ नाळा गावात आहे ह्या तीर्थावर स्नान केले असता (मार्गशीर्ष शु. १४ ला) जन्म सफळ होतो जन्ममरणाचा फेरा सुटतो

## ३६ शाल्य तीर्थ

हे तीर्थ नेमके कोठे आहे हे निश्चित झालेले नाही मार्गशीर्ष शु १० ला ह्या तीर्थावर स्नान केले असता जन्मांतरीचे पाप नष्ट होते

## ३७ मेधावती तीर्थ ऊर्फ मेधातीर्थ (अर्घ्यपाद कुंड)

ह्याचेही स्थान निश्चित झालेले नाही मार्गशीर्ष शु ११ एकादशी ह्या दिवशी ह्या तीर्थावर स्नान केले असता सूर्यलोक प्राप्त होतो बहुधा हे सूर्यकुंड असावे

## ३८. सूर्यकुंड-अर्घ्यपाद कुंड

हे तीर्थ देखील कोठे आहे, हे निश्चित झालेले नाही ह्या कुडावर स्नान करावे, सूर्यपूजा करावी, अर्घ्य द्यावे सूर्यस्तुती करावी त्याने शनैश्वर–पीडा बाधत नाही परतु आम्हाला वाटते की अर्घ्यपादकुड व सूर्यकुड एकच असावे

## ३९ द्रोणतीर्थ– सर्व तीर्थ– नीलेन्द्र कुड

हे सर्वतीर्थ आहे पौष शुद्ध ५ ला द्रोणतीर्थावर स्नान करावे नीलद्रोण अर्पण करावे, म्हणजे शेकडो वर्षे स्वर्गवास घडतो हे कुंड म्हणजे नीलेंद्र कुड असावे कारण नील द्रोण अर्पण करणे, नीळे गावातच आहे, व स्वर्गप्राप्ती इंद्रलोकीच नीलेंद्र कुडाची फलश्रुती देखील अशीच आहे म्हणून हे नीलेंद्र कुड असावे.

## ४० भगवती कुंड–रेणुका तीर्थ

पौष शु. ८ ला ह्या तीर्थात स्नान करावे म्हणजे मुक्ती मिळते. हे वैतरणा सगमीचे रेणुका तीर्थ असावे.

## ४१. कर्णतीर्थ

हे तीर्थ बहुधा ब्रह्मतीर्थ असावे कारण ह्याची फलश्रुती त्याच्या फलश्रुतीशी जुळणारी आहे पौष शु ६ ह्या दिवशी कर्णतीर्थात स्नान केले असता मनुष्य धनाढ्य होतो ब्राह्मणकुळात जन्म घेतो वेदपरायण होतो

## ४२. अग्नी कुड–नीलेंद्र कुड–द्रोणकुड

हे निश्चित सांगता येत नाही पौष शु ७ ला ह्या कुडात स्नान करावे महादोष जळतात प्राणिमात्राला स्वर्गलोकी अक्षय्य निवास मिळतो बहुधा हे नीलेंद्र कुड असावे.

## ४३ पुरातन तीर्थ

पौष शुद्ध प्रतिपदेला ह्या तीर्थात स्नान केल्याने विघ्ननाश होतो. सर्व पापक्षय होतो व अती रुद्रलोक प्राप्त होतो हे कोणत्या स्थानी आहे हे सांगणे कठीण झाले आहे

## ४४. उतळेश्वर तीर्थ

पौष शु. १० ला ह्या कुडावर स्नान केले असता पातके भस्म होतात हे उतळेश्वर मंदिर कोठे होते किंवा आहे माहीत नाही. परतु काही लोकांकडून असे समजले की, वसई किल्ल्यातील श्री नागेश्वर मदिराचे पूर्वीचे नाव उतळेश्वर महादेव होते. हे जर खरे असेल तर त्यासमोर एक तलाव आहे तेच उतळेश्वर तीर्थ असावे. परतु उतळेश्वराचे नाव बदलून नागेश्वर असे का ठेवले ह्याचा उलगडा होत नाही

## ४५. चंडिका तीर्थ

हे तीर्थ जूचद्र येथे असावे कारण तेथे चडिकेचे मदिर आहे व समोर तलाव आहे तो म्हणजेच चडिका तीर्थ असावे. नसल्यास रेणुका तीर्थ हेच चंडिका तीर्थ होईल ह्या तीर्थात मार्गशीर्ष व. १४ ला स्नान केल्याने मोक्ष प्राप्त होतो. सर्व लोक त्यास वदन करतात

## ४६ पांडू नदी तीर्थ

हे स्थळ अजून निश्चित झालेले नाही परतु पाणजू ह्या बेटवजा गावी एक तलाव व मदिर आहे व पाणजू हे पांडूचे किंवा पाणजू पांडू हे रूपांतर झाले

असावे हृया तीर्थावर कार्तिक शु ५ हृया दिवशी स्नान केले असता एक लक्ष गवा दानाचे पुण्य मिळते.

मार्गशीर्ष शु. ५ हृया दिवशी पाडुकूपावर स्नान केले असता नरनारींना अष्ट कृष्णजन्माचे फळ मिळते. पिंडदान केले असता पितृगण संतोष पावतात सप्तगोत्रा-सहित मोक्षाला जातात

## ४७. कपिलकुंड

हे तीर्थ तुगार पर्वतावर श्री तुगारेश्वर मंदिराचे मागील ओहोळाचे उतारा-वर सुमारे ३०० फुटांवर आहे हे खडकांत नैसर्गिक झालेले आहे येथे ऋषीमुनी तपाचरण करतात हृयाचे स्नानाने अपरपार पुण्य प्राप्त होते.

## ४८. अरोग कुंड

हेही वरीलप्रमाणेच श्री तुगार पर्वतावर वरील कुडाचे जवळ परंतु थोडया जास्त उतारावर खडकात निर्माण झालेले आहे हृयाचे पाणी सुमारे १०० फूट खोल आहे. हृयात स्नान केले असता सर्व रोगव्याधी नाश पावतात, अपरपार पुण्यप्राप्ती होते.

## ४९. श्रीजखेश्वरीकुंड–कुंडेश्वरीकुंड

हे तीर्थ तुगार पर्वतावर श्री तुगारेश्वर मंदिराचे मागील बाजूस उंचावर आहे जगन्माता जखेश्वरीचे छोटे मंदिर आहे, तेथे दोन कुडे आहेत त्यांतील एक कुडेश्वरी जखेश्वरी कुड आहे. हृया तीर्थावर स्नान केले असता पुत्रवत होतो.

## ५०. भैरवकुंड

वरील जखेश्वरी कुडाजवळ आहे तेच होय वरील कपिल, अरोग, श्रीजखे-श्वरी–भैरव ही चार व वैतरणी संगमावरील शीळा तीर्थ ही पंचमहाकुंडे मानलेली आहेत म्हणून शीळातीर्थावर स्नान करून नतर तुगार पर्वतावर यावे वरील चारही कुडाचे दर्शन घ्यावे नंतर श्री जखेश्वरीदेवीचे दर्शन घ्यावे व श्रीतुगारेश्वर पूजावा, असे निर्मळ-माहात्म्यात सांगितले आहे

## ५१. गरुडासंगमतीर्थ कुशव्याधातुतीर्थ

हे तीर्थ मुरळा नदीसंगमावर आहे मुरला हे उल्हास नदीचे जुने ऐतिहासिक नाव आहे हृया संगमावर असलेले तीर्थ म्हणजे वसई पापडी हृयाचे मध्ये वळणावर असलेले ताम्रतीर्थ होय. येथे कार्तिक शु ११ ला स्नान केले असता स्त्री-पुरुषाना यज्ञाचे फळ मिळते.

## ५२ कुशव्याधातुतीर्थ उर्फ कुशोदकतीर्थ

हे तीर्थदेखील वसई पापडीजवळचे ताम्रतीर्थच होय. वरील नावातला धातु शब्द व मुरला संगमी हे वर्णन ताम्रतीर्थालाच लागू पडते वसईजवळच उल्हास सागराला मिळते म्हणजे मुरला नदी सागराला मिळते ह्या तीर्थांत मार्गशीर्ष वद्य ६ ह्या दिवशी स्नान केले असता देवसान्निध्य मिळते

## ५३ सप्तगोदातीर्थ—ताम्रतीर्थ

हे तीर्थ म्हणजे देखील ताम्रतीर्थच होय कार्तिक वद्य ६ ह्या दिवशी सप्त-गोदातीर्थावर स्नान करावे म्हणजे सर्व पातके जळून जातात

## ५४ अस्कंदवापीतीर्थ

ह्या तीर्थावर स्नान केले असता यज्ञाचे फळ मिळते हे तीर्थ खादिरकुंड आचोळे खेड्याचे जवळ आहे तिकडेच आहे

## ५५. कणवरिक तीर्थ-पांडु तीर्थ

हे तीर्थ म्हणजेच पाणजू येथील पांडुकूप—पांडुनदीतीर्थ होय. ह्या तीर्थावर स्नान केल्यास १ लक्ष गवादानाचे पुण्य मिळते. कार्तिक वद्य १२ ह्या दिवशी स्नान करावे

## ५६. कोस तीर्थ

कोस ह्याच ठिकाणी हे कोसतीर्थ आहे कार्तिक वद्य २ ला ह्या तीर्थावर स्नान करावे सर्व पातके जळून जातात

## ५७ भ्रामकतीर्थ-रुद्रतीर्थ

हे तीर्थ कोठे आहे ह्याची कल्पना येत नाही ह्या तीर्थांवर कार्तिक वद्य १४ ह्या दिवशी स्नान केले असता रुद्रलोक प्राप्त होतो फलश्रुतीवरून हे रुद्रतीर्थ असावे व हे वैतरणासंगमी आहे

## ५८ दामोदर तीर्थ—विष्णूतीर्थ— पृथु उदक तीर्थ—श्री तीर्थ वृकतीर्थ

हे विमल तलावाजवळील निर्मळ तीर्थ होय ह्यालाच वराहकर्दमाळीतीर्थ असेही नाव आहे. ह्याचे काठावर विष्णुमंदिर होते ते भगवान परशुरामानेच स्थापन केलेले होते जीर्णोद्धारानंतर आजही शंकराचार्य समाधीला लागून विष्णू-मंदिर बांधण्यात आले आहे श्री तीर्थ देखील हेच, पृथुउदकतीर्थ देखील हेच होय कार्तिक वद्य ३ ला पृथुउदक तीर्थावर स्नान केले असता नरनारी पावन होतात मार्गशीर्ष शुद्ध ३ ला वृकतीर्थावर स्नान करावे म्हणजे स्वर्गप्राप्ती होते. सात जन्म मृत्युलोकात जात नाही. विमल तळ्याजवळील दामोदर तीर्थात पौष शुद्ध १२ ला

स्नान करावे म्हणजे सर्व पापक्षय होतो कार्तिक शु. १० ह्या दिवशी श्रीतीर्थावर स्नान केले असता ब्रह्महत्यादि-पातकें नष्ट होतात

## ५९ गोंदवती तीर्थ–सत्पाळे तीर्थ

हे वठार सत्पाळे येथे तलावतीर्थ आहे. तेथे मामावतीदेवीचे मदिर आहे. ही देवी खाडीत सापडली असे म्हणतात. म्हणजे पूर्वी ह्या तीर्थावर दुसरेच कसले मदिर असावे किंवा मामावतीचेच असावे. ह्या तीर्थस्थानाची फलश्रुती सांगितलेली नाही. पर्वकाळही सांगितलेला नाही.

## ६०. गौळवापी तीर्थ

हे ऋषीतीर्थ आहे हे तुगारचे रानात आहे ह्याची फलश्रुती व पर्वकाळ सागितलेला नाही परतु हे महातीर्थ म्हटले आहे

## ६१ भ्रूशुंडतीर्थ–ऋषी तीर्थ

हे कुंडतीर्थ तुगार टेकडीवर आहे. हल्ली ह्याला भवतीकुंड व सरतेशेवटी भातखिडतीर्थही म्हणतात बहुधा भ्रूकुड ऋषीचे निवासस्थान असावे. फलश्रुती व पर्वकाळ सांगितलेला नाही याचे देव-ऋषी अखड सेवन करतात

## ६२ सौध्यपाळ तीर्थ

हे तीर्थ कोठे आहे माहीत नाही ह्याची फलश्रुती व पर्वकाळ सांगितलेला नाही

## ६३. बिल्वफाळे तीर्थ

हे तीर्थ कोठे आहे हे सागता येत नाही परंतु मार्गशीर्ष वद्य २ ह्या दिवशी ह्या तीर्थात स्नान केले असता सर्व दोष नष्ट होतात.

## ६४. रुद्राळे-रुद्रतीर्थ–आमक

हे तीर्थ वैतरणा सगमी आहे. (रेणुकातीर्थाजवळ) ह्या तीर्थांत मार्गशीर्ष वद्य १ ह्या दिवशी स्नान केले असता सर्व महादोष नष्ट होतात, रुद्रलोक प्राप्त होतो मार्गशीर्ष वद्य १२ ह्या दिवशी तीर्थावर स्नान केले असता रुद्रलोक प्राप्त होतो

## ६५. प्रेतनदीसंगम तीर्थ-रुद्रतीर्थ-आमक

हे तीर्थ वैतरणा संगमी आहे. कार्तिक वद्य एकादशी ह्या पुण्यकाळी ह्या तीर्थावर स्नानदान, पितृश्राद्ध-तिळतर्पण करावे म्हणजे पितर संतुष्ट होतात. धनधान्यवृद्धी होते

### ६६ पद्मालय ६७ शंखतीर्थ ६८ वैराणी

ही तीर्थे अद्भुत आहेत ह्यांत स्नान केल्याने सर्व दोष नष्ट होतात, परंतु ह्याची स्थाननिश्चिती नाही, तसेच पर्वकाळही सांगितलेला नाही

### ६९ प्रभावती तीर्थ ७० गोमतीर्थ

ही तीर्थे अदभुत आहेत, स्थाननिश्चिती नाही.

### ७१ केतकी तीर्थ

हे तीर्थ तुगार पर्वतावर आहे ह्याच नावाने प्रसिद्ध आहे पवित्र तीर्थ आहे परंतु फलश्रुती व पर्वणीकाळ दिलेला नाही

वरील कुंडांखेरीज गोखिवरे येथे एक, उमेळे येथे एक, माणीकपूरजवळ भावोला ऊर्फ भृगु. बोळींज येथील देवहरा, गीरीज येथील तलाव, वसई किल्ला येथील १, तुगार येथे न उल्लेखिलेली २२ कुंडे, गासहद्दीतील माटेला काळुजा, एंडाळे, कुक्कट डेरा, मराळे, तळपा, कोरला, मासळई, केळाय, सातारी, डेवणी, कोरलमान असे आमचे निरीक्षणात आलेले तलाव आहेत परंतु त्यांची तीर्थनामे माहीत नाहीत मिळतही नाहीत तीर्थनामे नसलेले एकूण ४१ तलाव आहेत म्हणजे वरील ७१ तलावापैकी त्या त्या नांवांची पुनरुक्ती सोडली तर ज्यांना नावे नाहीत अशी स्थाने वरील ४१ मध्ये असतील. म्हणजे स्थूलमानाने जी १०८ कुंडे ह्या परिसरात आहेत असे म्हटले आहे ते खरे असावे

卐 卐 卐

## १४. कांहीं संदर्भ ग्रंथ


(१) श्रीपरशुरामचरित्र, ले. कै प्रा श्री म. माटे
(२) सह्याद्री खंड (स्कंदपुराण), संपादक श्री गायतोंडे
(३) पद्मपुराण
(४) प्राचीन महाराष्ट्र, ले डॉ. श्री. व्यं केतकर
(५) The Rastrakutas and their Times, Dr A S Altekar.
(६) The Shilahars of Western India Dr A. S Altekar.
(७) शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख,
ले डॉ वा वि. मिराशी


६९ ३१७।९६

( ८ ) Gazeteer of Thana, Vol XIV Places of Interest
( ९ ) सातवाहनकुल, प्रो पंढरीनाथ रानडे
(१०) वाल्मिकीरामायण
(११) महाभारत, संपादक श्री. चिं. वि वैद्य
(१२) साष्टीची बखर ले. अणजूरकर–नाईक
(१३) सह्याद्री, ले कँ स आ. जोगळेकर
(१४) Indian Antiquerry.
(१५) Notes on the Ancient Geography and Civilization
(१६) हरिदास कविकृत श्री शंकराचार्यसंमत ' निर्मळमाहात्म्य '
(१७) वाडेश्वरोदय काव्य
(१८) सह्याद्रिखंड– श्री. जोशी
(१९) ब्रह्मपुराण
(२०) भागवतपुराण
(२१) वामनपुराण
(२२) वायुपुराण
(२३) प्राचीन भारतीय चरित्र कोश–डॉ. चित्राव
(२४) प्राचीन भारतीय स्थलकोश–डॉ. चित्राव
(२५) देवी भागवत
(२६) कथाकल्पतरु भाग १ ते ४
(२७) श्री परशुरामचरित्र - गणपुले
(२८) महाराष्ट्रीय ज्ञानकोश
(२९) धर्मशास्त्राचा इतिहास, डॉ पां वा काणे
(३०) रामयशोगाथा–ले. श्री. बाबूराव पारखे

卐 卐 卐

REFBK-0025068